# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५३

निर्णय दिनांक १८-०९-२००९

१ सौ. शुभांगी प्रमोद पावसे, : अपिलार्थी

शिंपीगल्ली, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा,

जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, पिंपळगांव

पिसा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा,

तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिलेला निर्णय त्यांना मान्य नसल्यामुळे त्यांनी, विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयास सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषदे-

कडून प्राप्त झालेला निधी व सुरक्षा जननी, उपकेंद्र बळकटीकरण, एनआरएनएम, आरकेएस, कार्यालयीन (सादील) खर्च मूळ देयकाच्या साक्षांकीत प्रती मागितल्या होत्या व निधी कसा खर्च करण्यात आला ही माहिती मागवली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा दिनांक १३-०४-२००९ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०४-२००९ रोजी प्राप्त झाला. तथापि त्यांच्याकडून विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २५-०६-२००९ रोजी निर्णय देऊन आपल्या सुनावणीचे इतिवृत्त जारी केले. या इतिवृत्तावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा, त्यांनी मागणी केलेल्या माहितीबाबतचा खुलासा प्राप्त झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. तसेच आयोगास असे अवगत केले की, त्यांनी मूळ अर्जामध्ये एनआरएनएम या मुद्दयावर मागितलेली माहिती ही त्यांनी नजरचुकीने मागितली असून एनआरएचएम असे शब्द टंकलिखीत करावयाचे होते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील टंकलेखनाची चूक आयोगासमोर कबूल केली. यासंदर्भात त्यांनी आयोगास असेही सांगितले की, त्यांनी या मुद्दयावर खुलासा, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी,जन

माहिती अधिकारी यांना दिला होता. तथापि एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक १३-०४-२००९ रोजीचा अर्ज त्यांना प्रत्यक्षात दिनांक २०-०४-२००९ रोजी प्राप्त झाला. या अर्जास त्यांनी प्रथमतः दिनांक २४-०४-२००९ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीकडून माहिती देण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ मागितली होती. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केला त्यावेळी त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे त्यांना ही कार्यवाही करावी लागली, असे त्यांनी आयोगास स्पष्ट केले व तदनंतर दिनांक ३०-०४-२००९ रोजी त्यांनी अपिलार्थीकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील एनआरएनएम या शब्दाबाबत स्पष्टीकरण मागितले. तथापि या मुद्दयाचे स्पष्टीकरण अपिलार्थीकडून त्यांना आजतागायत प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीच्या अर्जातील इतर मुद्दयावरील माहिती त्यांच्याकडे आजही तयार आहे. परंतु अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्यासारखे होईल म्हणून त्यांनी आजतागायत अपिलार्थीस ही माहिती पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच मुद्दयावर माहिती मागितली होती. या पाच मुद्दयांपैकी चार मुद्दयांवरील माहिती जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देऊ शकले असते, परंतु पाचपैकी चार मुद्दयावर माहिती दिल्यास ती अर्धवट दिल्यासारखी होईल म्हणून त्यांनी अपिलार्थीकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात स्पष्टीकरण मागितले. तथापि अपिलार्थीकडून कोणतेही स्पष्टीकरण प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत व अपिलार्थी या मुद्दयावर स्पष्टीकरण करण्याकरिता आजतागायतही उपलब्ध झाले नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात त्यांच्याकडून झालेल्या चुकीची कबुली आयोगासमोर दिली आहे.

त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून खुलाशाची वाट पाहण्याऐवजी अपिलार्थीस प्रथमतः मुद्दा क्रमांक ३ वगळता उर्वरित चारही मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जर दिली असती व मुद्दा कमांक ३ च्या संदर्भात ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले असते तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास सकारात्मक प्रतिसाद दिला, असे म्हणता आले असते. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दयांचा शब्दच्छल करुन अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले असल्याचे दिसून येत आहे. मुद्दा क्रमांक ३ चा जरी जन माहिती अधिकारी यांना कोणताही अर्थबोध झाला नव्हता तर अपिलार्थीस त्यांनी तसे कळविणे या ठिकाणी गरजेचे होते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे 'एनआरएनएम' या मुद्दयासंदर्भात माहिती मागितली होती, तथापि माहितीबाबत अपिलार्थीकडून टंकलेखनाची चूक झाल्याचे अपिलार्थीने आज आयोगासमोर कबूल केले आहे व या मुद्दयासंदर्भात त्यांना 'एनआरएचएम' असा शब्द टंकलिखीत करावयास हवा होता, असे त्यांनी आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, एनआरएचएम या शब्दाच्या नावाच्या देखील विविध प्रकारच्या योजना चालू असून त्यामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक १, २ व ४ या योजना समाविष्ट आहेत. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एका मुद्दयावर चुकीची माहिती मागविली आहे, परंतु या मुद्दयाचे स्पष्टीकरण प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी अपिलार्थीस संपूर्ण माहिती पुरवू शकले नाहीत. आता निश्चितपणे कोणत्या मुद्दयावरील माहिती त्यांना अपेक्षित आहे हे जन माहिती अधिकारी यांना ज्ञात झाल्यानंतर ते अपिलार्थीस ही माहिती तात्काळ देण्यास तयार आहेत. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. शुभांगी प्रमोद पावसे, शिंपीगल्ली, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, पिंपळगांव पिसा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५४

निर्णय दिनांक १८-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मधुकर रामभाऊ कोरडे,<br>मु. पो. मिरजगांव (कोरडेवस्ती), तालुका कर्जत,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक १७-०६-२००९ रोजीच्या पत्रानुसार माहिती प्राप्त झाली आहे. तथापि ही माहिती खोटी व चुकीची आहे कारण जानेवारी २००३ ते मार्च २००५ या कालावधीमध्ये कर्जत

तालुक्यातील डिकसळ - गुरवपिंप्री या रोजगार हमी योजनेव्दारे करण्यात आलेल्या रस्त्याच्या कामावर उपस्थित मजूर अल्पवयीन व शाळेतील मुलांची नांवे देऊन त्यांची जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल व फसवणूक केली आहे, या कारणास्तव सदरील अपील त्यांनी आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००३ ते मार्च २००५ या कालावधीतील कर्जत तालुक्यातील डिकसळ-गुरवपिंप्री या रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या रस्त्याच्या कामावरील मजुरांचे दैनंदिन हजेरी मस्टर्सच्या व धान्य वाटप रजिस्टर यांच्या साक्षांकीत प्रती मागितल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०६-२००९ रोजीच्या पत्राने सशुल्क माहिती टपालाव्दारे पाठवून दिली. तथापि मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २२-०६-२००९ रोजी आपला निर्णय पारीत केला. जन अपिलीय अधिकारी यांनी हा निर्णय पारीत केला त्यावेळी अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नव्हती, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीचे अपील मंजूर केले. मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १९०६ इतके भरले. नंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-०६-२००९ रोजी पोस्टाने माहिती पाठविली होती. ती माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याची कबूली त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये दिलेली आहे. परंतु अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती खोटी व चुकीची आहे, कारण सदर कामावर अल्पवयीन व शाळेतील मुलांची नावे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविली आहेत. जन माहिती अधिकारी

यांना या मुद्दयावर खुलासा विचारला असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध होती त्याच स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस सशुल्क पुरविली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याबाबतच्या त्यांच्या मुद्दयांचे स्पष्टीकरण करण्यासाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्याची तरतूद या अधिनियमामध्ये आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांचे कर्तव्य पार पाडले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर जर त्यांचे काही आक्षेप असतील तर ते नोंदविण्यासाठी नियोजन विभागाकडे, किंवा विभागीय आयुक्त (महसूल), नाशिक यांच्याकडे या संदर्भात त्यांनी तक्रार करणे उचित राहील, असे आयोगाचे मत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत कार्यवाही केली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर रामभाऊ कोरडे, मु. पो. मिरजगांव (कोरडेवस्ती), तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५५

निर्णय दिनांक  १८-०९-२००९

१ सौ. शुभांगी प्रमोद पावसे, : अपिलार्थी

शिंपीगल्ली, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा,

जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, काष्टी,

तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा,

तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना कारवाईतून वाचविण्यासाठी चुकीचे आदेश दिले व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयास सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषदे-कडून सुरक्षा जननी, उपकेंद्र बळकटीकरण, एनआरएनएम, आरकेएस, या योजनेकरिता प्राप्त निधी व कार्यालयीन (सादील) खर्च मूळ देयकाच्या साक्षांकीत प्रती मागितल्या होत्या व निधी कसा खर्च करण्यात आला ही माहिती मागवली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २५०५ (टपालखर्चासह) त्यांना स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये आवश्यक त्या लेखाशीर्षाखाली भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थी यांनी या शुल्काचा भरणा करण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांच्याकडील अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक ०५-०५-२००९ रोजीच्या पत्रावर आक्षेप घेऊन त्यांना कळविण्यात आलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या, माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर, त्यांना पुरविण्यात येणा-या पार्सलचे वजन व त्याचा दर व पोस्टाचे तसे प्रमाणपत्र ही माहिती उलटपत्राने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली. तथापि हा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळवला नाही व परिणामी अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नाही. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २५-०६-२००९ रोजी निर्णय दिला व अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न होऊ शकल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उभयतांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. या युक्तिवादावरुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे दिसून येते. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांना ही माहिती त्यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही असेही आयोगास आढळून आले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १३-०४-२००९ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद त्यांच्या दिनांक ०५-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे दिला आहे. तथापि या पत्रामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील कळवितांना त्यामध्ये अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची एकूण संख्या व माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर हा तपशील समाविष्ट नाही असे आढळून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०५-२००९ रोजी पाठविलेले पत्र हे अधिनियमातील कलम ७ (३)(क) चा भंग करणारे असल्यामुळे ते चुकीचे ठरत आहे परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने टाळले असल्याचे अथवा अपिलार्थीपासून कोणत्याही दूष्ट हेतूने माहिती दडविल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांची, जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची केलेली विनंती, आयोग मान्य करत नाही.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेल्या तांत्रिक चुकीमुळे ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देय होत आहे. तथापि येथे आयोगास असे स्पष्ट करणे गरजेचे आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने ज्याप्रमाणे त्यांना पुरविण्यात येणा-या माहितीच्या पाकिटाचे वजन, पोस्टाचे प्रमाणपत्र इत्यादी तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिला आहे, अपिलार्थीची अशा प्रकारे माहितीपोटीचे शुल्क न भरता जन माहिती अधिकारी यांच्याकडे अवाजवी खुलासा मागण्याची कृती योग्य नाही, असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. शुभांगी प्रमोद पावसे, शिंपीगल्ली, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, काष्टी, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५६

निर्णय दिनांक १८-०९-२००९

१ सौ. शुभांगी प्रमोद पावसे, : अपिलार्थी
शिंपीगल्ली, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, काष्टी,
तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा,
तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्रीमती एम. एल. काळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, संबधितांना कागदोपत्री कारणे दाखवा नोटीस देऊन केवळ कागदी घोडे नाचविले, त्यांची दिशाभूल केली व संबंधितावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न केल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याच्या उद्देशाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्रीमती एम. एल. काळे (ए. एन. एम.) या त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकाची साक्षांकीत प्रत मागितली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०५-०५-२००९ रोजी प्राप्त झाला. या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण १६४ रुपये इतके शुल्क चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये भरण्याचे सूचित केले. या पत्रानुसार अपिलार्थीने दिनांक २४-०५-२००९ रोजी या शुल्काचा भरणा स्टेट बँक ऑफ इंडिया येथे केला. अपिलार्थीने आवश्यक ती रक्कम बँकेमध्ये भरल्यानंतर बँकेकडून प्राप्त झालेल्या चलनाची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०५-२००९ रोजी उपलब्ध करुन दिली. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०६-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या २५ इतकी असून ही माहिती अपिलार्थीस रजिस्टर पोस्टाने पाठविण्यासाठी त्यांना ३४ रुपये इतका खर्च आलेला आहे.

या प्रकरणी त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक ११-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्या सेवापुस्तकातील नॉमिनेशनचा भाग वगळता उर्वरित भागांच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस देण्यात याव्यात, असे कळविले होते. त्याप्रमाणे नॉमिनेशनचा भाग वगळून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०६-२००९ रोजी माहिती पाठविली.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहितीपोटीच्या आकारलेल्या शुल्काबाबत त्यांचा वाद असल्याचे आयोगास आढळून आले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती मागितली असल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी ३५ दिवसांचा म्हणजेच दिनांक ०९-०६-२००९ पर्यंतचा कालावधी लागला. याच कालावधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६४ इतके कळविले व त्यानंतर अपिलार्थीने सदर शुल्क भरल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०६-२००९ पर्यंत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. याप्रमाणे त्यांनी दिनांक १२-०६-२००९ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जात विनंती केल्याप्रमाणे रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली आहे. जन माहिती अधिकारी यांची सदरची कृती ही अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आहे. जन माहिती अधिकारी यांना माहितीपोटी ८४ रुपये इतके शुल्क लागले. त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु. १६४ पैकी उरलेली रक्कम रुपये ८० इतकी त्वरित अपिलार्थीस परत करणे भाग होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती त्यांनी केली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिलेल्या प्रथम अपील निर्णयामध्ये याचा कोणताही उल्लेख केलेला नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली असली तरी अपिलार्थीकडून स्वीकारलेली माहितीपोटीची उर्वरित रक्कम अपिलार्थीस अद्यापपावेतो परत केलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, ही रक्कम जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्वरित परत करणे त्यांना अनिवार्य आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी ही अपिलार्थीस ही रक्कम रुपये ८० सात दिवसाच्या आत परत करण्याचे कबूल केले आहे. हे पाहता अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी आयोगाकडे संबंधिताविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

तथापि या प्रकरणी अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने जादाचे शुल्क आकारले असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे आयोग आदेशित करत नाही. परंतु येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, अशी सूचना त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले ८० रुपये इतके जादाचे शुल्क अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. शुभांगी प्रमोद पावसे, शिंपीगल्ली, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, काष्टी, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा,

तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५७

निर्णय दिनांक १८-०९-२००९

१ सौ. शुभांगी प्रमोद पावसे, : अपिलार्थी

शिंपीगल्ली, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा,

जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्रीमती मंगल लक्ष्मण काळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. तसेच या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्रीमती मंगल लक्ष्मण काळे, आरोग्य सेवक (महिला) प्राथमिक आरोग्य केंद्र, काष्टी यांच्या दिनांक १६-११-१९९८ रोजीच्या बदली आदेशाची साक्षांकीत प्रत ही माहिती रजिस्टर पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडील त्रयस्थ पक्षाच्या दिनांक १६-११-१९९८ च्या बदली आदेशाच्या साक्षांकीत प्रतीची मागणी आयोगाकडे केली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हजर आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती अद्यापही आवश्यक असल्याचे आयोगास आढळून आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०९-२००९ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा दिनांक ११-०५-२००९ रोजीचा प्रथम अर्ज व दिनांक १६-०६-२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज याकडे

संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी लागलेल्या विलंबाचे कारण आयोगाने विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जुन्या कालावधीशी संबंधित होती व संबंधित रेकॉर्ड जुन्या इमारतीत असल्याने त्यांना ही माहिती शोधण्यासाठी वेळ लागला. तसेच त्यांच्या कार्यालयातर्फे मध्यंतरीच्या काळात सर्वसाधारण बदल्या व त्यानंतर सरळसेवेची भरती प्रक्रिया चालू असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना विलंब लागला व अशा प्रकारची दिरंगाई यापुढे त्यांच्याकडून होणार नाही, असे आयोगास आश्वासित केले.

या प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस उघड करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण नव्हती. परंतु या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जाच्या संबंधात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ मधील तरतुदीनुसार कोणतीही कार्यवाही न करुन आपल्या कार्यशैलीतील कतव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगास दिसून येत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, त्या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४-०९-२००९ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे व त्या माहितीची एक जादा प्रत त्यांनी अपिलार्थीस आयोगाकडील सुनावणीच्या दिवशी विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे, हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक या सर्वांवर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. शुभांगी प्रमोद पावसे, शिंपीगल्ली, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५८

निर्णय दिनांक १८-०९-२००९

१ श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे, : अपिलार्थी
लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०२-२००९ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांना दिनांक ०४-०३-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले आहे की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे ही माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहून घ्यावी. त्याप्रमाणे ते दिनांक ०३-०६-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता कार्यकारी अभियंता, व उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद हे दोघेही गैरहजर होते. यानंतर त्यांनी कार्यकारी

अभियंता यांना त्यांना आवश्यक असलेल्या माहितीबाबत भ्रमणध्वनीवर कल्पना दिली. तथापि कार्यकारी अभियंता यांनी त्यांची भेट घेण्याचे टाळले, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागाच्या संदर्भात दिनांक ०१-०६-२००५ ते १२-०२-२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ११ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेला निधी, तो कसा प्रकारे खर्च केला, एकूण कामे त्यापैकी पूर्ण किती, अपूर्ण किती व चालू किती व त्या कामाची किंमत, काम पूर्ण करण्याची मुदत, शाखा अभियंता निहाय, शाखा अभियंता म्हणून किती वर्षे एकाच ठिकाणी सेवा करता येते, एकूण कर्मचा-यांची संख्या, त्यांना नेमून दिलेली कामे व जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकारात प्राप्त झालेले अर्ज, मागितलेली माहिती, अपिलात काय बाजू मांडली, संदर्भिय निरीक्षण टिपणीची प्रत व निर्णयाची प्रत, शाखा अभियंत्याच्या विरोधात सर्वच तक्रारीच्या छायांकीत प्रती, शाखा अभियंता बदलीच्या ठिकाणी शासकीय निवासस्थानात की खाजगी निवासस्थानात राहतात, त्यांच्या वास्तव्याचा पुरावा, शाखा अभियंता बदलून परत त्याच ठिकाणी रुजू झाला अशा शाखा अभियंत्यांची नांवे, सेवाकाळ पूर्ण झाल्यानंतरही शाखा अभियंत्याची बदलीच्या न होण्याची कारणे आणि सी. आर. आणि एस. आर. ची कामे कोणती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात असल्याने अपिलार्थीने ही माहिती प्रथमतः पाहून घ्यावी असे अपिलार्थीस

सुचविले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०६-२००९ व दिनांक ०७-०८-२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने अपिलार्थीस कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही. मात्र जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीस हजर राहण्याऐवजी अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे. परंतु अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ते अपिलार्थीस माहिती देण्यासाठी वाट पाहत होते, परंतु ही माहिती घेण्यासाठी अपिलार्थी कधीही त्यांच्या कार्यालयात उपस्थित न राहिल्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही. अपिलार्थीने आयोगाकडील केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी हे दिनांक ०३-०६-२००९ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद येथे व्यक्तिशः हजर झाले किंवा कसे यासंदर्भात तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. एस. एम. हुसेन यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी त्या दिवशी ते संपूर्ण दिवस कार्यालयात हजर होते मात्र अपिलार्थी त्यांच्याकडे या माहितीसाठी किंवा अन्य कोणत्याही कामास्तव उपस्थित राहिले नाहीत, असे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व अर्जदाराचे असते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिल्याचे नमूद केले आहे. तथापि यासंदर्भात कोणताही वैध पुरावा त्यांनी आयोगाकडे त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये नोंदविलेला नाही अथवा या मुद्दयावर त्यांची बाजू स्पष्ट करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थी त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिले नाहीत हा युक्तिवाद, आयोग मान्य करत आहे. अपिलार्थीच्या दिनांक १३-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या ११ मुद्दयावरील माहितीपैकी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ८ व १० शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कारणे व स्पष्टीकरणे अपेक्षिली आहेत, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या निर्णयाबाबतची अथवा कृतीबद्दलची कोणतीही कारणे देणे अथवा त्यांचे वैयक्तीक मत अर्जदारास देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील शाखा अभियंत्यांच्या विरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारीच्या छायांकीत प्रती मागितल्या आहेत. यासंदर्भात अपिलार्थी या तक्रारीच्या प्रती त्यांना प्राप्त झाल्यास ते कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत याचे स्पष्टीकरण त्यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जात केलेले नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधित माहिती ही त्रयस्थ पक्षांची वैयक्तीक माहिती आहे, ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. मात्र

उर्वरित मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक ७, ८ व १० शी संबंधित माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसापर्यंत विनामूल्य उपलब्ध करुन ठेवावी व या कालावधीमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत न केल्यास, तदनंतर त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय राहणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ८, व १० शी संबंधित माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसापर्यंत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे, लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,

उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५९

निर्णय दिनांक १८-०९-२००९

१ श्री. महादेव रामभाऊ शिंदे, : अपिलार्थी

अ-२४, गुलमोहर कॉलनी, गुलमोहर रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा शहर अभियंता,

पाणीपुरवठा विभाग, महानगरपालिका, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपायुक्त (सा.प्र.),

अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीचे कारण दर्शवून माहिती नाकारली आहे, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगर शहरास मुळा धरणातून पाणीपुरवठा करणा-या पाईपलाईनसंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -

नगर शहरास पाणीपुरवठा करणा-या मुळा डॅम पासूनची पाईपलाईन मौजे देहरा तालुका जिल्हा अहमदनगर येथील सर्व्हे नंबर २११ मधून पण जुन्या नगर मनमाड रोडच्या कडेने जाते का ? जात असल्यास ती जमीनीखालून जाते की जमिनीवरुन जाते, सर्व्हे नंबर २११ मौजे देवरा तालुका जिल्हा अहमदनगर मधून रोडच्या कडेने पूर्व बाजूने जात नसल्यास ती कशी जाते, सर्व्हे नंबर २११ हा दक्षिण बाजूस रोड टच असताना पाईपलाईनचा शेतात जाण्यासाठी अडथळा होतो का ? व सर्व्हे नंबर २११ मधील उड्डाणपुलाच्या भरावामुळे आपली पाईललाईन गाडली गेली आहे काय ? - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असल्याने व ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. यावर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०६-२००९ रोजी आदेश पारीत करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती अपेक्षिली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप प्रश्नार्थक असे आहे. यावरुन अपिलार्थीस मुळा डॅमवरुन नगर शहराला पाणीपुरवठा

करणा-या पाईपलाईनच्या  प्रत्यक्ष आखणीविषयी  विशेषतः सर्व्हे नंबर २११ च्या क्षेत्रातील माहितीची आवश्यकता असल्याचे दिसून येते.  अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील पाच मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक तीन वगळता उर्वरित चारही मुद्दयाव्दारे प्रश्नार्थक स्वरुपात जन माहिती अधिकारी यांचे मत अपेक्षिणारी माहिती मागितली आहे.  माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहितीच, ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात अर्जदारास देण्यासंदर्भात कार्यवाही करण्याची प्रक्रिया अभिप्रेत आहे.अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना वेगवेगळे प्रश्न विचारणे व त्या प्रश्नांची उत्तरे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही, त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील पाच मुद्दयाव्दारे मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १, २, ४ व ५ ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.  अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ चे अवलोकन करता अपिलार्थीस नगर शहराला पाणीपुरवठा करणा-या पाईप लाईनच्या सर्वे नंबर २११ मधील  आखणीविषयी   माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते. या पाईपलाईनच्या आखणीची  प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध आहे किंवा कसे हे संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही.  सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी मुळा धरणातून नगर शहराला पाणीपुरवठा करणा-या पाईपलाईनची सर्व्हे नंबर २११ मधील  आखणीच्या  नकाशाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध असल्यास ती हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक तीनशी संबंधित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महादेव रामभाऊ शिंदे, अ-२४, गुलमोहर कॉलनी, गुलमोहर रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग, महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६०

निर्णय दिनांक  १८-०९-२००९

१ श्री. ए. के. आनंद, : अपिलार्थी

वर्षा स्टोअर्ससमोर, कॉर्पोरेशन रोड, अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १९-१०-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी अपिलार्थीस वैयक्तीक चर्चेकरिता बोलाविले आणि त्यांच्या मूळ अर्जाच्या प्रतीची मागणी केली. या कारणाने त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - जिल्हा प्रशासनाने अहमदनगर मध्यवर्ती सहकारी भांडार, शोभासदन या मालमत्तेचे मालक यांच्याशी हातमिळवणी केलेले अन्नधान्य वितरण विभागाचे अधिकारी, ट्रक क्रमांक एम. एच. -१६ क्यू-२९६० या ट्रकचा चालक व मालक यांच्यावर गॅस सिलेंडरच्या काळाबाजार प्रकरणी दिनांक १९-०९-२००८ रोजी पकडलेल्या इसमांवर काय कारवाई करण्यात आली - याची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्याचे कळविले.

अपिलार्थीच्या या दिनांक १९-१०-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्या कार्यालयाकडे सादर करण्याचे व तसेच त्यांच्या कार्यालयास संपर्क साधण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक १९-१०-२००८ रोजीचा माहितीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रतिसाद देण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-१२-२००९ रोजी प्रथम अपील केले असता या अर्जासोबत त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाची छायांकीत प्रत पाठविली. या अर्जावर त्यांनी दहा रुपये इतक्या किंमतीचा कोर्ट स्टॅम्प डकविला नाही, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडील दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्ज सादर करण्याचे कळविले होते. तथापि अपिलार्थीने या प्रकरणाविषयी नंतर त्यांच्याशी संपर्क न साधल्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित माहिती ते पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना मूळात प्राप्त झालेला नाही. आयोगाकडे अपिलार्थीने त्यांच्या कथित मूळ अर्जाची प्रत सादर केली आहे त्यावर दहा रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट स्टॅम्प चिकटविल्याचे दिसून येत नाही. तदनंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या-कडे अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले. यावर जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीकडून त्यांच्या मूळ अर्जाची प्रत मागविण्याची कृती ही, अधिनियमातील तरतुदी-नुसार योग्य आहे. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी आता प्रथमतः हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या मूळ अर्जाची प्रत दहा रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटवून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर करावी. अपिलार्थीकडून त्यांच्या मूळ अर्जाची प्रत प्राप्त झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी तीस दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, या अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील अथवा अधिनियमातील कलम १८ नुसार आयोगाकडे तक्रार नोंदवू शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, संबंधित मूळ अर्जाची प्रत अपिलार्थीकडून प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या दिनांक १४-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ए. के. आनंद, वर्षा स्टोअर्ससमोर, कॉर्पोरेशन रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६१

निर्णय दिनांक १८-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. कारभारी मंजाबा जाधव,<br>संजय नगर, वॉर्ड नं. २, इदगाह परिसर, श्रीरामपूर,<br>तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी, थातूरमातूर, अर्धवट व असमाधानकारक माहिती पुरविल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे असेही नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी एकाच कार्यालयातील असल्यामुळे त्यांना वाचविण्याचा प्रकार या प्रकरणी घडलेला आहे व तसेच सुनावणीच्या वेळी ते ती माहिती कशी खोटी आहे याचा पुरावा सादर करतील.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामध्ये नोव्हेंबर २००८ मधील कंत्राटी ग्रामसेवकांच्या भरतीसंदर्भात एकूण १५ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ वगळता उर्वरित सर्व माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली व मुद्दा क्रमांक ९ च्या संदर्भात अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १५ इतके स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा, बीड येथे भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीचा मूळ अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०४-२००९ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ वगळता उर्वरित सर्व माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ९ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शासन निर्णयाची प्रत मागितली आहे. सदर निर्णय पाच पृष्ठांचा असून ही माहिती अपिलार्थीस टपालाने पुरवावयाची झाल्यास झेरॉक्स प्रतीचा खर्च रुपये दहा व टपालाव्दारे पाठविण्याचा खर्च रुपये पाच असे पंधरा रुपये भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. परंतु या शुल्काचा भरणा अद्यापपर्यंत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नसल्याने ते ही माहिती पुरवू शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य माहिती पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ च्या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही माहिती आवश्यक असल्यास अपिलार्थीस एकूण १५ रुपये इतके शुल्क, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १४-०१-२००९ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे, भरावे लागेल. आजतागायत अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती प्राप्त झालेली नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे व सुनावणीच्या वेळी त्यांच्या विधानाच्या पृष्ठ्यर्थ पुरावा आयोगास सादर करण्याचे कबूल केले आहे. तथापि आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या अशा प्रकारे केलेल्या विधानापृष्ठ्यर्थ कोणतीही कागदपत्रे जोडलेली नाहीत.

अपिलार्थीच्या मुलाने ग्रामसेवक या पदाकरिता अर्ज केला होता व बीड जिल्हा परिषदेकडील संबंधित परीक्षा दिली होती. परंतु त्यांच्या मुलाला किमान आवश्यक गुणापेक्षाही कमी गुण प्राप्त झाल्याने त्याची कंत्राटी ग्रामसेवक या पदावर नियुक्ती होऊ शकली नाही, ही आज सुनावणीमध्ये उघड झालेली वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना मागितलेली संपूर्ण माहिती दिली आहे व उर्वरित माहिती अपिलार्थीस प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः च जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्यामुळे अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कारभारी मंजाबा जाधव, संजय नगर, वॉर्ड नं. २, इदगाह परिसर, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६२

निर्णय दिनांक १८-०९-२००९

१ श्री. एस. एस. पवार, : अपिलार्थी

प्लॉट नं. ५०, रेणुकानगर, केडगांव, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी कार्यालय,

अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी कार्यालय,

अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : जिल्हा माहिती अधिकारी, सावेडी, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक (मा) विभागीय माहिती कार्यालय, कान्हेरेवाडी, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे दैनिक वर्तमानपत्र व त्यांच्या मासिक बिलासंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागविली होती. या माहितीचे अवलोकन केले असता ही माहिती संबंधित वर्तमानपत्राचे संपादक व वृत्तपत्राचे वितरक यांच्या व्यवहारासंबंधात मागविल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वृत्तपत्राच्या संदर्भातील असल्यामुळे ती संबंधित वृत्तपत्राचे संपादक यांच्याकडून अपिलार्थीने प्राप्त करुन घ्यावी असे अपिलार्थीस सुचविले. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा दिनांक १८-१०-२००८ रोजीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. यासंदर्भात आयोगाने अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांना दाखविली व या प्रतीवर अर्ज प्राप्त म्हणून सही आहे ती सही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील आहे काय असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता ती सही त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-याची नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती वृत्तपत्राचे संपादक व त्यांचे वितरक यांच्यामध्ये केलेल्या जाणा-या व्यवहाराशी संबधित असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम २००५ हा नागरिकांना सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी

केलेला आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे, या माहितीचे स्वरुप पाहिले असता, संभवत नाही. तसेच अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती फक्त संबंधीत वृत्तपत्राचे संपादक देऊ शकतील हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०१-२००९ रोजी दिलेले उत्तर आयोगास योग्य वाटते. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एस. एस. पवार, प्लॉट नं. ५०, रेणुकानगर, केडगांव, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा माहिती अधिकारी, सावेडी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (मा) विभागीय माहिती कार्यालय, कान्हेरेवाडी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६३

निर्णय दिनांक १८-०९-२००९

१ श्री. अभिजित सी. पुपल, : अपिलार्थी

३०१, आदर्श क्लासिक, खिस्त गल्ली, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपजिल्हाधिकारी (महसूल),

जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तहसीलदार (सा.प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती मिळाली नाही व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या अपील अर्जावर अद्यापपावेतो निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष सिमरतमल कुंदनमाई बोरा, अहमदनगर यांच्या सेवानिवृत्ती वेतनासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षास दरमहा रुपये १५० प्रमाणे दिनांक ०१-०२-१९८२ ते त्यांच्या निधनापर्यंत दरमहा रुपये १५० याप्रमाणे देण्यात आलेली रक्कम, मध्यवर्ती यादीतील अनुक्रमांक ७५ प्रमाणे सिमरतमल कुंदनमाई बोरा यांचे नांव, दिनांक ०१-०८-१९८० ते १०-१२-२००८ पर्यत सिमरतमल कुंदनमाई बोरा यांना देण्यात आलेली कथित पेन्शन याबद्दल दहा मुद्दयाव्दारे मागणी केलेली माहिती - याचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिली अधिकारी यांनी निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे उपस्थित प्रतिनिधी आयोगाने विचारलेल्या प्रश्नांची कोणतीही उत्तरे समाधानकारक सादर करु शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपले आदेश आदेश पारित करणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत नव्याने सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी देऊन, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घ्यावी व आपले आदेश पारित

करावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या अथवा कलम (१८) तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत अगर तदनंतर अनु. राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील अथवा तक्रार सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेले व्दितीय निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत नव्याने सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी देऊन, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, आपले आदेश पारित करावे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अभिजित सी. पुपल, ३०१, आदर्श क्लासिक, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सा.प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६४

निर्णय दिनांक १८-०९-२००९

१ श्री. बाळासाहेब भिवसेन काटे, : अपिलार्थी

मु. पो. आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव,

जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा निरीक्षक (पुरवठा) अधिकारी , तहसील कार्यालय,

शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, शेवगांव,

तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी

नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, शेवगाव,

जि. अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी जाणीवपूर्वक कोणताही निर्णय अद्यापपावेतो दिला नाही. या

प्रकरणाशी संबंधित तहसीलदार, शेवगांव यांनी रॉकेलच्या कोठ्यासंदर्भात संगनमताने काळाबाजार केला असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव या गावामधील रॉकेल व स्वस्त धान्य वितरणासंदर्भात एकूण आठ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक ०९-०१-२००९ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०१-२००९ रोजी प्राप्त झाला असून या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या प्रतिसादावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १२-०१-२००९ रोजी प्राप्त झाला आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मुद्दा क्र ६ च्या संदर्भात कोणतीही माहिती कळविली नाही.

अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक ११-०२-२००९ पूर्वी कोणतीही माहिती न देता एकूण १४ दिवसाच्या विलंबाने अपिलार्थीला अपूर्ण माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०४-२००९ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या बेपर्वा कार्यशैलीची त्यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे महसूल आयुक्त (नाशिक ) यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भातील माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक १८-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाळासाहेब भिवसेन काटे, मु. पो. आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६५

निर्णय दिनांक १९-०९-२००९

१ श्री. बीडे दिलीप शंकर, : अपिलार्थी
मु. पो. एरंडगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, (ग्रामीण) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०७-२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०७-२००९ पर्यंत त्यांनी मागितलेली सर्व माहिती, माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य द्यावी असे त्यांना सूचित केले होते. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि या अपील अर्जामध्ये जन अपिलीय

अधिकारी यांनी दिनांक २०-०७-२००९ रोजी दिलेल्या निर्णयावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही अद्यापावेतो केली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वीज रोहित्राबाबत तीन वर्षाशी संबंधित काही माहिती १५ मुद्दयाव्दारे व रजिस्टर पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०७-२००९ रोजी आपले आदेश पारीत करुन जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जात उध्दृत केल्याप्रमाणे एकूण पाच सूचना दिल्या. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या सूचनांचे अनुपालन न झाल्याचे अपिलार्थीस कळविल्यावरुन त्यांनी व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी असा खुलासा केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०६-२००९ रोजी माहिती दिलेली असून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०-०७-२००९ रोजीच्या सुनावणीच्या वेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे काही मुद्दयावर कार्यवाही चालू आहे.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या पाच सूचनांपैकी चार सूचनांवर कार्यवाही केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी नेमकी कोणती माहिती दिली आहे यासंदर्भात अपिलार्थीस देण्यात आलेली माहिती आणि अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा कमांक ८ चे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील समसूद एरंडगाव येथील कहार डी पी वारंवार जळते त्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी काय उपाययोजना केल्या, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नव्हती. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस ही माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १४ व १५ चे अवलोकन केले असता, या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षिले असल्याचे दिसून येते. या दोन मुद्दयांपैकी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १४ मध्ये समसूद एरंडगांव धरणातील बिडे डीपीमध्ये एक कोटेशन तीन एच. पी. चे आहे, सदर कोटेशन कोणत्या आधारे डी पी मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे याची माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १४ मधील माहितीच्या या भागातील ही माहिती अपिलार्थीस देय आहे मात्र या मुद्दयातील उर्वरित माहिती, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने ती अपिलार्थीस देय नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १५ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोटेशन नसताना सदर जमिनीत पोल व वीजवाहक तारा असण्याचा सविस्तर खुलासा मागितला आहे. ही माहिती देखील अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या

कृतीबद्दलची कारणे अथवा खुलासा मागणे अभिप्रेत नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी अशाप्रकारची "माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत स्वरुपाची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. थोडक्यात अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व १४ मधील वर नमूद केलेली अंशतः माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. ही माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व १४ मधील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक ८ व १४ वरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बीडे दिलीप शंकर, मु. पो. एरंडगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (ग्रामीण) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६६

निर्णय दिनांक १९-०९-२००९

१ सौ. सुनिता बाळासाहेब सानप, : अपिलार्थी
साईसागर निवास, इंजिनिअरींग कॉलेज रोड, लोणी बु.
तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग),
जिल्हा परिषद, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग), जिल्हा परिषद, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, राज्य माहिती आयोगाच्या दिनांक १३-०५-२००९ रोजीच्या आदेशान्वये जन अपिलीय अधिकारी यांना सुनावणी घेण्याचे

आदेशित केले असतानाही त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही व तीस दिवसाच्या आत माहिती दिली नाही. तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती दिली आहे ती दिशाभूल करणारी व विसंगती निर्माण करणारी अशी दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत हसनापूर, तालुका राहाता यांनी केलेली कर विसंगती व दप्तर दिरंगाई व फाईल निपटारा कायद्याखाली कारवाई या विषयावर त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००४ ते २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे दिनांक १३-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे यापूर्वी व्दितीय अपील सादर केले होते. त्या अर्जावर आयोगाने दि.३०-०३-२००९ रोजी सूचित करुनही जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्याने व निर्णय न दिल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगास सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील सुनावणीच्या वेळी आदेशित केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०७-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे दिनांक २९-०६-२००९ रोजी या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याची सूचना दिली. तथापि त्यांनी हा निर्णय अपिलार्थीस लेखी स्वरुपात कळविला नाही. त्यांनी सुनावणी घेतल्याचे व सुनावणीमधील दिलेल्या सूचनांची नोंद त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध आहे व त्याप्रमाणे त्यांनी संबंधित नोंद आयोगास दाखविली.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाने त्यांना आदेशित केल्यानंतर विलंबाने सुनावणी घेतली आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीनंतर दिनांक ०७-०७-२००९ रोजी अपिलार्थीस काही माहिती पुरविली आहे. तथापि आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आवक जावक रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती अद्यापही त्यांना उपलब्ध करुन देण्याच्या राहिल्या असल्याचे आयोगासमोर कबूल केले व या प्रती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगास आश्वासित केले आहे. अपिलार्थीने प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये सबळ पुराव्यासह सिध्द केलेले नाही. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास त्यांच्या म्हणण्याचे समर्थन करण्यासाठी त्या आयोगासमोरही उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीच्या आयोगाकडील केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील प्राप्त माहितीच्या दर्जावर त्यांनी दिलेल्या अभिप्रायावर

आयोगास विचार करण्याचे प्रयोजन उरत नाही. मात्र या प्रकरणी एवढे निःसंशयपणे सिध्द होत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस दिनांक ०७-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपूर्ण माहिती दिली व आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या संदर्भात सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या आवक जावक रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-

प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. सुनिता बाळासाहेब सानप, साईसागर निवास, इंजिनिअरींग कॉलेज रोड, लोणी बु. तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६७

निर्णय दिनांक १९-०९-२००९

१ श्री. साबळे अरुण दौलत, : अपिलार्थी
ग्रामसुरक्षा दल, ढोरजळगांव शे. तालुका शेवगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी,
तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी,
तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांच्या अपील अर्जाची सुनावणी तहसीलदार राहुरी यांनी दिनांक १६-०३-२००९ रोजी ठेवली होती. त्यावेळी त्यांनी त्यांचे म्हणणे लेखी पुराव्यानिशी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मांडले होते. परंतु जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, राहुरी श्री. उमेश बिरारा यांनी पुरावा अपिलार्थीने सादर केलेला दाखल करुन न घेता त्यांची दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या रोजनाम्यावर सही घेतली व त्यांना अद्यापही जन

माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे व त्यांच्यावर शिस्तभंगविषयक व शास्तीची कार्यवाही करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे ढोरजळगांव, तालुका शेवगांव या गावाशी संबंधित काही माहिती एकूण १२ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी १६-०३-२००९ रोजीचा " अपील अर्ज निकाली ठेवण्यात आला आहे " असा आदेश दिला. या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांना काय म्हणावयाचे आहे हे समजत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या अशा प्रकारच्या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. पी. डी. जपे यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास तत्कालीन निवासी नायब तहसीलदार श्री. जे. पी. क्षीरसागर यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही उपविभागीय अधिकारी, राहुरी यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता नागरिकांना शासनाच्या महसूल विभागाकडून माहिती प्राप्त करुन घेतांना कशा प्रकारे वागणूक दिली जाते याचे हे प्रकरण म्हणजे एक मुर्तीमंत उदाहरण आहे असे समजण्यास हरकत नाही. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे. जर ही माहिती दुस-या प्राधिकरणाशी संबंधित होती तर तत्कालीन नायब तहसीलदार यांनी अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदी प्रमाणे उपविभागीय अधिका-याकडे का पाठविला नाही या आयोगाच्या प्रश्नास उपस्थित जन माहिती अधिकारी यांना उत्तर देता आले नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अनाकलनीय निर्णय (?) दिला आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही किंचितही सकारात्मक कार्यवाही केली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कारणमिमांसा न करता वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे कोणासही बोध होणार नाही असा अनाकलनीय निर्णय दिल्याचे आढळून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवण्यासाठी जन माहिती अधिकारी श्री. जे. पी. क्षीरसागर तत्कालीन नायब तहसीलदार हे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी उपविभागीय अधिकारी कार्यालयाशी संबंधित असली तरी निवासी नायब तहसीलदार, राहुरी यांच्यामुळे अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळ वंचित राहावे लागले असल्याने, आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी उप विभागीय अधिकारी, राहुरी यांच्या कार्यालयात स्वत: जाऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती स्वत:

हस्तगत करावी व ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी विनाकारण वंचित ठेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे सिध्द होत आहे. सबब सचिव (महसूल) मुंबई यांना संबंधीत जन माहिती अधिकारी श्री. जे. पी. क्षीरसागर (सध्या जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी श्री. जे. पी. क्षीरसागर (सध्या जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. साबळे अरुण दौलत, ग्रामसुरक्षा दल, ढोरजळगांव शे. तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६८

निर्णय दिनांक १९-०९-२००९

१ श्री. शेख शफीओद्दीन छोटूभाई, : अपिलार्थी
यशोदानगर, मातृपितृछाया बंगल्यासमोर, पाईपलाईन रोड,
सावेडी, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा न्यायाधीश-१ व अति. सत्र न्यायाधीश,
जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून धादांत खोटी, काल्पनिक व अपूर्ण माहिती प्राप्त झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आरटीसी ११६/२००७ हा फौजदारी दावा शेट्टी मॅडम यांच्या कोर्टातून निकम

मॅडम यांच्या कोर्टात कोणत्या कारणास्तव व कोणाच्या आदेशानुसार वर्ग करण्यात आला यासंबंधीची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ज्या आदेशानुसार सदर खटला न्यायमुर्ती शेट्टी यांच्याकडून काढून न्यायमुर्ती निकम यांच्याकडे तो कोणाच्या आदेशानुसार वर्ग केला त्याची प्रमाणित नक्कल, खटला हस्तांतरण करावा असा अर्ज न्यायमुर्ती शेट्टी यांनी दिला असल्यास त्या अर्जाची प्रत व अशा प्रकारचा अर्ज खटल्यातील आरोपी नं. २ शेख मोहंमद हुसेन इकराम पटेल यांनी किंवा त्यांच्या वकिलाने किंवा अन्य कोणीही दिला असल्यास त्या अर्जाची प्रमाणित प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सदरची केस ही प्रशासकीय कारणास्तव जिल्हा न्यायालय आदेश क्रमांक T.W.8758/07 दिनांक 19-11-2007 या आदेशान्वये वर्ग केल्याचे अपिलार्थीस कळविले. ही माहिती अपिलार्थीस जिल्हा न्यायालयाकडून दिनांक २३-०९-२००८ रोजी प्राप्त झाले आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांच्याकडे दिनांक २९-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-११-२००८ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक ०१-१२-२००८ रोजी पारीत केले व " सदरचा खटला आरटीसी क्र. ११६/२००७ हा वर्ग करण्याकरिता श्रीमती शेट्टी, आरोपी नंबर २ किंवा त्यांचे वकील यांनी कोणताही अर्ज दिलेला नव्हता व तो खटला जिल्हा न्यायाधीश अहमदनगर यांनी प्रशासकीय कारणास्तव श्रीमती शेट्टी यांच्या न्यायालयातून श्रीमती निकम यांच्या न्यायालयाकडे वर्ग केला होता " असे अपिलार्थीस कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-१२-२००८ रोजी तसे कळविले. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ०४-१२-२००८ रोजी न्यायालयातर्फे

तामील केली गेली आहे. यानंतर व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आणि अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविली आहे. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, फौजदारी दंडसंहिता १९७३ मधील कलम ४०८ नुसार एका न्यायालयाकडून दुस-या न्यायालया-कडे प्रकरण हस्तांतरीत करण्याचे पूर्ण अधिकार जिल्हा व सत्र न्यायाधीश यांना आहेत व या प्रक्रियेअंतर्गत जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांनी विचाराधीन प्रकरण एका न्यायालयातून दुस-या न्यायालयाकडे हस्तांतरीत केले आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती दिनांक ०८-०९-२००८ रोजी व जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २८-११-२००८ रोजीच्या निर्णयान्वये त्यांना प्राप्त झाली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने ज्या तीन मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती त्या तीनही मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०८-०९-२००८ व दिनांक ०१-१२-२००८ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. परंतु अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही धादांत खोटी व काल्पनिक आहे असे का वाटत आहे, यासंदर्भात त्यांनी कोणतेही समर्थन आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये दिलेले नाही. तसेच त्यांचे हे म्हणणे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीस जिल्हा न्यायालयाकडून पुरविली गेलेली माहिती व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती यांची पडताळणी केली असता, अपिलार्थीस जिल्हा न्यायालयाने सुसंगत

माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख शफीओद्दीन छोटूभाई, यशोदानगर, मातृपितृछाया बंगल्यासमोर, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश-१ व अति. सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६९

निर्णय दिनांक १९-०९-२००९

१ सौ. सविता सुरेश गवारे, : अपिलार्थी
मु. पो. कोकणगांव, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,
मिरजगांव, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कर्जत,
तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी सदरील अपील आयोगाकडे केले आहे व त्यांना खोटी माहिती दिल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ११-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे मिरजगांव तालुका कर्जत येथील प्लॉट नंबर १२ च्या नळ कनेक्शन-

बाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदरील प्लॉट नंबर १२ मधील दक्षिणेकडील बाजूस केलेल्या बेकायदेशीर बांधकामाची नोंद ग्रामपंचायत रेकॉर्डला नाही. मात्र सदर बांधकामास ग्रामपंचायतने मंजूर केलेले नळ कनेक्शनबाबतच्या सर्व कागदपत्राच्या नकला व्यक्तिशः मागितल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने नमूद केलेल्या बांधकामास ग्रामपंचायतीने अधिकृत नळ कनेक्शन दिले नसल्याची माहिती दिली व यासोबत सविता मधुकर कोरडे यांची पाणीपट्टी पावती दिनांक ११-०६-२००८ ची प्रत अपिलार्थीस पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-१२-२००८ रोजी निर्णय देऊन खालीलप्रमाणे आदेश दिले. " तत्कालीन ग्रामविकास अधिका-याने माहिती देण्यास असमर्थता दर्शविल्याने आपण माननीय आयुक्त यांच्याकडे अपील करुन आपले समाधान करुन घेणेत यावे ". जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. त्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती पुरविल्याचे सिध्द केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या बांधकामास दिनांक ११-०६-२००८ रोजी नळ कनेक्शन मंजूर करुनही अपिलार्थीस या बांधकामास नळ कनेक्शन मंजूर केले नसल्याचे कळविले आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर नळ कनेक्शन मंजूर करण्याकरिता

घेतलेल्या ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत, बांधकामाबाबत त्यांच्याकडील रजिस्टरमधील नमुना नंबर ८ चा उतारा आणि नळपट्टीची पावती अपिलार्थीस दिल्याचे आयोगास अवगत केले. अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर मान्य केले. तथापि अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः खोटी माहिती पुरविली असल्याने त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही करण्याची अपिलार्थीने आयोगाकडे विनंती केली आहे. आज रोजी श्री. एस. आर. देशमुख, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, सध्या पाथर्डी येथे कार्यरत, त्यांनी अपिलार्थीस खोटी माहिती दिल्याचे आजच्या सुनावणीमध्ये आढळून आले आहे. सबब श्री. एस. आर. देशमुख, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस खोटी माहिती पुरविल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस खोटी माहिती दिली असल्याचे त्यांना मान्य असल्याचे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती दिली गेली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. श्री. एस. आर. देशमुख, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस खोटी माहिती पुरविल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा

खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. सविता सुरेश गवारे, मु. पो. कोकणगांव, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मिरजगांव, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. एस.आर. देशमुख, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाही (मार्फतः गट विकास अधिकारी, पं.सं. पाथर्डी, जिल्हा अहमदनगर) (नोंदणीकृत टपालाद्वारे)

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७०

निर्णय दिनांक १९-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महेश शिवाजी घोरपडे,<br>मु. पो. शिराळ (चिचोंडी), तालुका पाथर्डी,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा विभागीय कृषि सह संचालक, पुणे विभाग, पुणे | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय कृषि सह संचालक, पुणे विभाग, पुणे | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे |
| | जन अपिलीय अधिकारी | : | प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना चुकीची माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व (१) अनुकंपा धारकाकरिता शासन सूचनेप्रमाणे ठेवलेली प्रतिक्षासूची , (२)

गट "क" संवर्गातील लिपीक पदाकरिता केलेला अर्ज रद्द करण्याबाबत संमती देण्याविषयीची उपाययोजना ही माहिती मागितली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुणे विभागातील कृषि खात्यातील अनुकंपा सेवेसंदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षतः दिनांक २१-०५-२००८ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २४-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ९७ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व यानंतर अपिलार्थीस दिनांक ०२-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सशुल्क माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-१०-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली असल्याचा निष्कर्ष काढला व अपिलार्थीच्या अनुकंपा तत्वावरील नियुक्ती मिळण्याबाबतच्या अर्जाचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे स्वतः कृषि खात्यामधील अनुकंपा तत्वावरील नोकरी मिळण्यासाठी प्रयत्नशील होते. या प्रयत्नांचा भाग

म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना पूर्णतः दिनांक ०२-०८-२००८ रोजी पुरविण्यात आलेली आहे व तसा निष्कर्ष जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या निर्णयात काढला आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी अनुकंपा तत्वावर दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या आदेशाव्दारे कृषि सहायक या पदावर नेमणूक दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व आयोगाकडील सुनावणीसाठी आज रोजी अपिलार्थीची असलेली अनुपस्थिती पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती पूर्ण माहिती मिळाली असल्याचे व विशेषतः त्यांच्या ज्या उद्देशाने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या-कडे माहिती मागविली होती तो उद्देश सफल झाला आहे असे अनमान काढण्यात येत आहे. तथापि आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीचा दिनांक १३-०५-२००८ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २१-०५-२००८ रोजी प्राप्त झाला असला तरी त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) व्दारे विहित केलेल्या मुदतीनंतर त्यांच्याकडील दिनांक २४-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ९७ इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास, अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद देण्याची त्यांची ही कृती चुकीची असल्यामुळे त्यांना आता अपिलार्थीस या प्रकरणी माहितीपोटीचे प्राप्त करुन घेतलेले शुल्क रुपये ९७ इतके अपिलार्थीस परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून

माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ९७ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रुपये ९७ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महेश शिवाजी घोरपडे, मु. पो. शिराळ (चिचोंडी), तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७१

निर्णय दिनांक  १९-०९-२००९

१ श्री. एल. एस. कोल्हे, : अपिलार्थी
इंदिरा पथ, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्य अभियंता,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य अभियंता,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप अभियंता (रस्ते-३), सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : सहायक मुख्य अभियंता (रस्ते), सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जावर काही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये बहुतांश भाग हा अपिलार्थी यांनी केलेल्या प्रश्नार्थक स्वरुपाच्या माहितीने भरलेला आहे. या अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील अधिका-यांनी त्यांचे कर्तव्य बजावण्यात कुचराई केली आहे असे त्यांचे मत आहे. त्याची चौकशी करणार काय व जे अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करतात त्यांच्यावर शिस्तभंग करावा असे आदेश आहेत त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल का ? - या मुद्दयावर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे कळवून अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील, जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेशी सहमती दर्शवून, निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिला गेलेला प्रतिसाद हा दिशाभूल करणारा कसा आहे याचे समर्थन त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये केलेले नाही. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांचा युक्तिवाद करण्यासाठी आयोगासमोर देखील उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संबंधितांवर कारवाई अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी त्यांनी व्यवस्थितरित्या केली नाही. त्याच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही, त्यामुळे मूळात अपिलार्थीस कोणतीही माहिती देय होत नाही. अशा प्रकारे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्जच वैध असल्याचे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीच्या अर्जावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एल. एस. कोल्हे, इंदिरा पथ, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (रस्ते-३), सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक मुख्य अभियंता (रस्ते), सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७२

निर्णय दिनांक १९-०९-२००९

१ श्री. नानासाहेब श्रावण ओहोळ, : अपिलार्थी

रा. संगमनेर खुर्द, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, कार्यालय, कोपरगांव,

तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सहायक वनसंरक्षक, कार्यालय, संगमनेर,

तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे चंदनाची झाडे व निलगिरीची झाडे तोडली असल्यासंदर्भात दिनांक ०३-

०७ व दिनांक १७-०७-२००६ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन व्दितीय अपील केले आहे. तथापि त्यांना प्राप्त झालेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी कशी आहे हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करण्याची खालीलप्रमाणे तरतूद आहे.

" पोटकलम (१) खालील निर्णयाविरुध्दचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल :

परंतु, अपीलकर्त्याला वेळेत अपील दाखल न करण्यास वाजवी कारण होते अशी, यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोगाची किंवा राज्य माहिती आयोगाची खात्री पटली तर, नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याला अपील दाखल करुन घेता येईल. "

वरील तरतुदीचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील अधिनियमातील कलम १९ (३) व्दारे विहित केलेल्या मुदतीनंतर व उशिरा केले आहे. तसेच अपिलार्थीस वेळेत अपील दाखल न करण्यासाठी एखादे वाजवी कारण होते किंवा कसे त्याचाही अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावरुन बोध होत नाही. आजच्या सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. हे पाहता अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील कालबाह्य व पर्यायाने अवैध ठरत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नानासाहेब श्रावण ओहोळ, रा. संगमनेर खुर्द, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, कार्यालय, कोपरगांव, तालुका

कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, कार्यालय, संगमनेर, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ७३/०९ व ७४/०९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७३ व ७४

निर्णय दिनांक १९-०९-२००९

१ श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे, : अपिलार्थी
रा. लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ अपील क्रमांक ७३/२००९
जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम
उपविभाग क्रमांक १, अहमदनगर

२ अपील क्रमांक ७४/२००९
जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर

३ अपील क्रमांक ७३/०९ व ७४/२००९ : प्रतिवादी
जन अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०७-२००९ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी दोनही अपील प्रकरणांशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच दोनही जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे अपिलार्थीची राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेली दिनांक १७-०९-२००९ रोजीची दोन स्वतंत्र पत्रे सादर केली असून या पत्रांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पाहण्याकरिता उपलब्ध करुन दिली आहे व यावरुन त्यांचे समाधान झाले असल्याने त्यांची आयोगाकडे दाखल केलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले क्रमांक ७३/२००९ व ७४/२००९ ही निकाली काढून त्यांचे अपील अर्ज दप्तरी जमा करावे.

खुद्द अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे दाखल केलेली व्दितीय अपिले चालविण्यामध्ये स्वारस्य नसल्यामुळे व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले असल्यामुळे अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ७३/२००९, दिनांक २७-०७-२००९ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ७४/२००९, दिनांक २७-०७-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे, रा. लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग

क्रमांक १, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५२०

निर्णय दिनांक १९-०९-२००९

१ श्री. आंधळे ज्ञानेश्वर शिवनाथ, : अपिलार्थी
" व्दारका " गुरुदत्त हौसिंग सोसायटी,
पोलीस एस.डी.ओ. मागे, मिरी रोड, शेवगांव,
तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
उपविभागीय कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे " दिनांक १६-११-२००७ चे जात प्रमाणपत्र व दिनांक २६-११-२००७ ला

दाखल केलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र १५ दिवसात मिळाले नाही " या विषयावर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" दि. १६-११-०७ व दि. २६-११-०७ पासून अर्जाचा प्रवास कसा कसा झाला, नियमाने विहित मुदतीत प्रमाणपत्र न मिळाल्याबद्दल संबंधीत कर्मचा-यावर कार्यवाही करुन मला माहिती कळवणे व प्रमाणपत्र मिळेपर्यंतचा संपूर्ण तपशील कळवणे."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असल्याने ती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०२-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीविषयी कोणताही समाधानकारक खुलासा आयोगासमोर करता आला नाही. मात्र त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांचे स्वतःचे जात प्रमाणपत्र त्यांनी दिनांक ०२-०५-२००९ रोजी व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र दिनांक १३-०४-२००९ रोजी दिलेले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दिनांक १०-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये विचारलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. अपिलार्थीने या अर्जामध्ये दिनांक १६-११-२००७ चे जात प्रमाणपत्र आणि दिनांक २६-११-२००७ रोजी दाखल केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र कोणाच्या संदर्भात आहे त्याचा कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष माहितीव्दारे अथवा अभिप्रायाद्वारे खुलासा केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीस माहिती नाकारली आहे, जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची व गैर आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची होत असल्याने अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. आंधळे ज्ञानेश्वर शिवनाथ, " व्दारका " गुरुदत्त हौसिंग सोसायटी, पोलीस

एस.डी.ओ. मागे, मिरी रोड, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उपविभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८०३

निर्णय दिनांक १९-०९-२००९

१ श्री. विजय रामराव शिंदे, : अपिलार्थी
मु. पो. सायाळे, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अध्यक्ष, श्री संत जनार्दन स्वामी (मौनगिरी) महाराज
समाधीस्थान व श्री काशी विश्वनाथ महादेव शैक्षणिक व
गोपालन ट्रस्ट बेट, कोपरगांव, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधित ट्रस्टने हेतूतः खोटी माहिती दिली, त्यामुळे त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी माहिती देण्यासाठी आदेश काढल्यानंतरही त्यांना संबंधित ट्रस्टने कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे आणि या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे अध्यक्ष, श्री संत जनार्दन स्वामी (मौनगिरी) महाराज समाधीस्थान व श्री काशी विश्वनाथ महादेव शैक्षणिक व गोपालन ट्रस्ट बेट, कोपरगांव, तालुका कोपरगांव यांच्याकडे त्यांच्या ट्रस्टच्या संदर्भात काही माहिती मागितली होती.

यानंतर ट्रस्टने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती न पुरविल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे दिनांक ३०-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन दिनांक १०-०२-२००९ रोजीच्या त्यांच्या आदेशाव्दारे अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे ट्रस्टच्या अध्यक्षांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०९-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी एका खाजगी ट्रस्टकडे त्या ट्रस्टच्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीअन्वये काही माहिती मागितली आहे. खाजगी ट्रस्टच्याबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ मुख्य विश्वस्त श्री. गोविंद रामानंद समर्थ सदगुरु प्रल्हाद महाराज (रामदासी) संस्थान बुलढाणा विरुध्द राज्य माहिती आयुक्त नागपूर आणि सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,नागपूर, मध्ये दि. २८-०४-२००९ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये खाजगी ट्रस्ट हे माहिती अधिकार अधिनियमा-अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरणाचा व्याख्येच्या व्याप्तीमधे समाविष्ट होत

नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ हा खाजगी ट्रस्टना लावता येणार नाही असा निर्णय दिलेला आहे. या निर्णयाचे अवलोकन केले असता या प्रकरणी अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे तो ट्रस्ट, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजय रामराव शिंदे, मु. पो. सायाळे, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक.

२ अध्यक्ष, श्री संत जनार्दन स्वामी (मौनगिरी) महाराज समाधीस्थान व श्री काशी विश्वनाथ महादेव शैक्षणिक व गोपालन ट्रस्ट बेट, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४१४
निर्णय दिनांकः २२-०९-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ऊर्दू प्राथमिक शाळा,चौफाळा,नांदेड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, मराठवाडा युथ वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, नांदेड मार्फत उर्दू प्राथमिक शाळा, चौफाळा, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांचा दि. ०३.१२.२००७ रोजीचा अर्ज दि. १७.१२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला असता, त्यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी दि. ०७.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी हे प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी या अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दि. २२.१०.२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना, त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे अपेक्षित असलेली संपूर्ण माहिती जन

माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरविली आहे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याने त्यांची या प्रकरणाच्या अपिलासंदर्भात यापुढे कुठलीही तक्रार राहणार नाही, असे नमूद केले आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. १४१४/०८, दि. ०९.०५.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,रा.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ऊर्दू प्राथमिक शाळा, पाण्याच्या टाकीसमोर चौफाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, मराठवाडा युथ वेल्फेअर एज्युकेशन सोसायटी, नांदेड मार्फत उर्दू प्राथमिक शाळा, पाण्याच्या टाकीसमोर, चौफाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४१५
निर्णय दिनांकः २२-०९-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवशक्ती माध्यमिक शाळा, काकांडी,ता.जि. नांदेड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांचा दि. १५.०२.२००८ रोजीचा अर्ज दि. १५.०२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला असता, त्यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी दि. २४.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी हे प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी या अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दि. १०.१२.२००८ रोजीचे (टंकलिखित तारखेमध्ये खाडाखोड

आहे.) पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना, त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे अपेक्षित असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरविली आहे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याचे व त्यांची या प्रकरणाच्या अपिलासंदर्भात यापुढे कुठलीही तक्रार राहणार नाही, असे नमूद केले आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. १४१५/०८, दि.१६.०७.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,मुख्य संपादक सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर,बसस्टॅण्ड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,शिवशक्ती माध्यमिक विद्यालय, काकांडी,ता. जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४१६
निर्णय दिनांक: २२-०९-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजर्षी शाहु महाराज विद्यालय,जवाहरनगर, मौ.तुप्पा,ता.जि.नांदेड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, संत पुंडलिक शैक्षणिक प्रतिष्ठाण, सोमठाणा द्वारा संचलित मार्फत राजर्षी शाहू महाराज विद्यालय,जवाहरनगर,मौ.तुप्पा, ता.जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत दि. २४.११.२००७ रोजी मुख्याध्यापक, राजर्षी शाहू महाराज विद्यालय,जवाहरनगर मौ,तुप्पा यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज पाठविला असता, त्यांनी रजिस्ट्री घेण्याचे नाकारल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, संत पुंडलिक शैक्षणिक प्रतिष्ठाण सोमठाणा यांच्याकडे दि. १७.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले परंतु त्यांनीही अपिलाची रजिस्ट्री जाणूनबुजून परत केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेविषयी काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीस विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.१२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविला. तथापि सदर रजिस्टर्ड अपील अर्ज त्यांच्याकडे परत प्राप्त झाल्याने, व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी व संबंधित संस्थेचे उपाध्यक्ष हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने त्यांच्या वरील म्हणण्यापृष्ठयर्थ त्यांनी मुख्याध्यापक, राजर्षी शाहू महाराज विद्यालय,जवाहरनगर मौ,तुप्पा यांच्याकडे पाठविलेल्या पाकीटाची त्यांना प्राप्त झालेली प्रत आयोगास दाखविली. या प्रतीवर संबंधित पोस्टमनने ते दि. २६.११.२००७, २७.११.२००७ व २८.११.२००७ या शाळेमध्ये गेले असता त्यांना कोणीही व्यक्ती न आढळल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस सदर पाकीट परत केल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व अपील अर्ज त्यांना मूळात प्राप्त झाला नसल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. ते याबाबत पूर्णपणे अनभिज्ञ आहेत. परंतु आता माहितीसाठीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर ते तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तीस दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आश्वासित केले आहे, सबब जन माहिती अधिकारी यांना असे

आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजर्षी शाहू महाराज विद्यालय,जवाहरनगर मौ. तुप्पा, ता.जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, संत पुंडलिक शैक्षणिक प्रतिष्ठाण, सोमठाणा,द्वारा संचलित मार्फत राजर्षी शाहू महाराज विद्यालय,जवाहरनगर,मौ.तुप्पा, ता.जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४१७
निर्णय दिनांकः २२-०९-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. संत नामदेव महाराज विद्यालय, उम्रज, ता.कंधार,जि.नांदेड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ,शेवाळी,मु.पातळगंगा संचलित श्री. संत नामदेव महाराज विद्यालय, उम्रज, ता.कंधार,जि.नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांचा दि. २४.११.२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला असता, त्यांना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. १०.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी हे प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेविषयी काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीस विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १०.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपील अर्जासंदर्भात त्यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये खाजगी विद्यालयासंदर्भातील माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे, हे पाहता, प्रथमतः अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे, त्यांचा दि. १०.०१.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज, आवश्यक त्या सहपत्रासह तात्काळ सादर करावा. सदर अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना प्राप्त झाल्यानंतर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. १०.०१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

अपील क्र. १४१७/०८

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.१०.०१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, सदर अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,मुख्य संपादक सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. संत नामदेव महाराज विद्यालय, उम्रज, ता.कंधार,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४१८
निर्णय दिनांकः २२-०९-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
सरस्वती प्राथमिक शाळा, पावडेवाडी, ता.जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत दि. २८.०१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा माहितीसाठीचा अर्ज रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविला असता, त्यांना कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. ०८.०४.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०५.२००८ व दि.१७.०५.२००८ रोजी सुनावणी ठेवली असता, जन अपिलीय अधिकारी गैरहजर राहिल्यामुळे व परिणामी अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०१.२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविलेल्या दि.

२१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेविषयी काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीस विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०८.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तथापि तदनंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,मुख्य संपादक,सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सरस्वती प्राथमिक शाळा, पावडेवाडी, ता.जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४१९
निर्णय दिनांक: २२-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>श्री.साईनाथ विठ्ठलनाथ विद्यालय,मंगलसांगवी,<br>ता.कंधार,जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, श्री. सत्य शिक्षण क्रांतीकारक गुरु विठ्ठलदास भक्त संत तुकाराम शिक्षण प्रसारक मंडळ, मार्फत श्री. साईनाथ विठ्ठलनाथ विद्यालय, मंगलसांगवी, पोस्ट मंगलसांगवी, ता. कंधार, जि. नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३.११.२००७ रोजी अर्ज पाठवून दिला असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री. सत्य शिक्षण क्रांतीकारक गुरु विठ्ठलदास भक्त संत तुकाराम शिक्षण प्रसारक मंडळ, कंधार,नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांनी सुनावणी न घेता त्यांचे अपील प्रलंबित ठेवल्या कारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आज रोजी या अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दि. १४.०८.२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना, त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे अपेक्षित असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विनामूल्य माहिती पुरविली गेली असल्याचे व या प्रकरणी त्यांची कोणतीही तक्रार व आक्षेप राहिलेले नाहीत, असे नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, दि.०९.०५.२००८ रोजी द्वितीय अपील नोंदविल्यानंतर प्राप्त झाली असावी, असे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १४१९/०८, दि.०९.०५.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,मुख्य संपादक सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर,बसस्टॅण्ड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.साईनाथ विठ्ठलनाथ विद्यालय, मंगल सांगवी, ता.कंधार,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री. सत्य शिक्षण क्रांतीकारक गुरु विठ्ठलदास भक्त संत तुकाराम शिक्षण प्रसारक मंडळ, मार्फत श्री. साईनाथ विठ्ठलनाथ विद्यालय, मंगलसांगवी, पोस्ट मंगलसांगवी, ता. कंधार, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४२०
निर्णय दिनांकः २२-०९-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वसमत, जि.हिंगोली : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत, जि.हिंगोली

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी दि. २४.११.२००७ रोजी अर्ज पाठविला असता, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांच्याकडे दि. ०६.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - वसमत येथील गुलशने मरयम पूर्व प्राथमिक व प्राथमिक ऊर्दू शाळेत जन माहिती अधिकारी यांच्या विभागाकडून २००६-०७ व २००७-०८ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी संख्या तसेच इतर महत्त्वाच्या बाबतीत केल्या गेलेल्या तपासणी अहवालाच्या सत्यप्रती आणि या शाळेस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यात आलेल्या मान्यता आदेशाच्या सत्यप्रती - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०७, २८.०७,१९.०८ व २५.०८.२००८ रोजी सुनावणी ठेवली असता, यापैकी एकाही सुनावणीस अपिलार्थी हजर राहिले नाहीत. त्यांनी यापूर्वीच राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सतत गैरहजर राहिल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये उल्लेखिलेल्या वसमत येथील गुलशन ए मरयम पूर्व प्राथमिक व प्राथमिक ऊर्दू शाळेस शासनाकडून मान्यता देण्यात आलेली नाही. तसेच त्या शाळेतील विद्यार्थी संख्येची व शाळेची कोणतीही तपासणी त्यांनी आजपावेतो केलेली नाही व

त्यांनी तसे अपिलार्थीस दि. ३०.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अंडर सर्टीफिकेटद्वारे कळविले आहे. यासंदर्भातील आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केला. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पुराव्यावरुन जन माहती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०६.०२.२००८ रोजी ही माहिती विनामूल्य पुरविली असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने ज्या शाळेविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीची मागणी केलेली आहे, त्या शाळेस मूळात शासनाकडून कोणतीही मान्यता प्राप्त झाली नसल्यामुळे तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून या शाळेची कोणतीही तपासणी झाली नसल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून 'निरंक' अशा स्वरुपाची माहिती देय होत आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.३०.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना कळविले आहे.

विचाराधीन द्वितीय अपील अर्जात अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जाची तारीख ०६.०२.२००८ दर्शविली आहे व प्रत्यक्षात त्यांनी या प्रकरणातील केलेल्या प्रथम अपील अर्जाची तारीख ३१.०१.२००८ आहे. या विसंगतीशिवाय, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त होऊनही माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद करुन आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी फक्त या सुनावणीसच त्यांचे प्रतिनिधी गैरहजर राहिले आहेत.मात्र आज रोजी आयोजित इतर सुनावणीस ते उपस्थित राहिले आहेत, त्यांच्या अशा विसंगतीपूर्ण वर्तनामुळे त्यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

अपील क्र. १४२०/०८

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,मुख्य संपादक सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर,बसस्टॅण्ड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १४२१/०८ व १४२२/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४२१ व १४२२

निर्णय दिनांक: २२-०९-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, :अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

**<u>अपील क्र.१४२१/०८</u>**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्रियदर्शिनी विद्या संकुल, माध्यमिक शाळा, नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | :प्रतिवादी |

**<u>अपील क्र.१४२२/०८</u>**

| | | |
|---|---|---|
| २. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्रियदर्शिनी विद्या संकुल, प्राथमिक शाळा, नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले, एकाच शाळेशी संबंधित असल्यामुळे, एकत्रित सुनावणीसाठी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**<u>अपील क्र.१४२१/०८:</u>**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्रियदर्शनी विद्या संकुल, माध्यमिक शाळा, नांदेड यांच्याकडे माहिती मागितली असता, मुदतीच्या आत माहिती प्राप्त न

झाल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.नांदेड यांच्याकडे दि. २४.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०४.२००८ रोजी सुनावणी घेऊनही निर्णय प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेत कायम स्वरुपी कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात माध्यमिक शाळा स्थापन झाल्यापासून ते अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील प्रमाणित माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १८.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २२५०/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०३.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याचे दर्शवून वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार असून ते ती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी

दि. १८.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे व प्रथम अपिलावरील सुनावणी झाल्यानंतर परत दि. ०२.०६.२००८ रोजी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २२५०/- भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीचा दि. २१.०१.२००८ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि. २६.०१.२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजेच अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क योग्य त्या तपशीलासह कळविले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले . त्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०२.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करण्याची कधीही तयारी दर्शविली नाही. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती विनामूल्य अपेक्षित असावी, असे दिसते. तथापि अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती विनामूल्य देय असणार नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये ज्या प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्याबाबत कार्यवाही करणे हे जसे कर्तव्य असते, तसेच प्रत्येक अर्जदाराचे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्यानंतर भरणे हे देखील अर्जदाराचे तितकेच महत्त्वाचे कर्तव्य आहे. या प्रकरणी

अपिलार्थीने विशिष्ट स्वरुपाची माहिती मागवूनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा न करणे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देऊनही आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करताना जन अपिलीय अधिकारी यांनी प्रकरण प्रलंबित ठेवल्याचे असत्य विधान करणे, या सर्व बाबी अपिलार्थीच्या वर्तनातील विसंगती स्पष्ट करत आहेत. या बाबी व जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर स्पष्ट केलेली वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीस अद्यापपर्यंत माहिती न मिळण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

**अपील क्र.१४२२/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या अपील क्र. १४२१/०८ मध्ये विनंती केल्याप्रमाणे आयोगास विनंती केलेली आहे. तसेच अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडील प्राथमिक शाळेच्या संदर्भात वरीलप्रमाणेच माहिती मागविली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या शाळेतील कायम स्वरुपी कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याच्या संदर्भात विस्तृत प्रमाणात माहिती मागविली होती व याच संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे दि. १६.०७.२००८ रोजी द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने एकसारखीच माहिती त्यांच्याकडील

माध्यमिक व प्राथमिक शाळेच्या संदर्भात दोन वेगवेगळया अर्जाद्वारे मागितली होती. विचाराधीन प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळविले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्याकडे अद्यापपावेतो न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून ते ती अपिलार्थीस पुरविण्यासाठी तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेल्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी आवश्यक त्या कागदपत्रांच्याअभावी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सशुल्क माहिती द्यावयाची की विनामूल्य माहिती द्यावयाची याचा निर्णय या टप्प्यावर आयोगास घेता येत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीपोटीचे शुल्क जर त्यांनी अपिलार्थीस त्यांचा माहितीसाठीच्या मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत कळविले नसेल तर, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी व जर त्यांनी माहितीपोटीच्या शुल्काची रक्कम तपशीलासह अपिलार्थीस, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत कळविली असेल तर ती सशुल्क पुरवावी. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.नांदेड यांना अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणी परस्परामध्ये झालेल्या पत्रव्यवहाराची तपासणी करण्याचे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सूचना देण्याचे आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.नांदेड यांनी ही कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर उपरोक्त दोनही अपिलांसंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १४२१/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्र. १४२२/०८ निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,प्रियदर्शिनी विद्या संकुल, माध्यमिक शाळा,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,प्रियदर्शिनी विद्या संकुल, प्राथमिक शाळा,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४२३
निर्णय दिनांकः २२-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १. | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा,जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा, जि. नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), लोहा यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित माहिती मिळविण्याकरिता दि. ३०.०४.२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज केला असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०६.२००७ रोजी प्रथम अपील अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठवून दिला, मात्र त्यांनी या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व माहिती देण्यास जाणूनबुजून विलंब लावला व टाळाटाळ केली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०४.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे लोहा तालुक्यातील

धान्य वाटपाबाबत एकूण ३७ स्वस्तधान्य दुकानदारांना दि. १०.०२.२००७ रोजी तहसीलदार लोहा यांनी नोटीस दिल्या होत्या, त्या नोटीसच्या सत्यप्रती, या नोटीसच्या संदर्भात स्वस्त धान्य दुकानदारांनी तहसीलदारास दिलेल्या उत्तराच्या सत्यप्रती आणि त्यांच्याकडून जप्त केलेल्या रेशनकार्डाच्या सत्यप्रती तसेच एकूण ३७ स्वस्त धान्य दुकानदारांवर अन्नधान्याचा काळाबाजार केल्याबद्दल केलेल्या कारवाईची लेखी माहिती, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दि. १०.०२.२००७ ते दि.३१.०३.२००७ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०६.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तदनंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी प्रथमत: अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १२.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,

हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१२.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र. १४२४/०८ व १४२५/०५**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४२४ व १४२५
निर्णय दिनांकः २२-०९-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. :अपिलार्थी

**विरुध्द**

**<u>अपील क्र.१४२४/०८</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी, ता.किनवट,जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड | :प्रतिवादी |

**<u>अपील क्र.१४२५/०८</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, रोहयो विभाग, इस्लापूर, ता.हिमायतनगर,जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले, एकाच विभागाशी संबंधित असल्यामुळे एकत्रित सुनावणीसाठी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपील क्र. १४२४/०८ च्या संदर्भात दि. १३.०३.२००८ रोजी व अपील क्र. १४२५/०८ च्या संदर्भात दि. १८.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी दोनही जन माहिती अधिकारी यांना आठ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे सूचित करुनही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

या प्रकरणात आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. तथापि जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी, ता.किनवट,जि.नांदेड व वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो),इस्लापूर,ता.हिमायतनगर,जि.नांदेड यांनी अपिलार्थीने त्यांना उद्देशून लिहिलेली अनुक्रमे दि. १४.०८.२००८ व दि. १८.०९.२००८ रोजीची पत्रे आयोगास सादर केली असून या दोनही पत्रांमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्यामुळे या प्रकरणी त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्यामुळे त्यांची दोनही अपिले निकाली काढण्यात यावी, अशी जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे. अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या या दोनही पत्रांचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०७.२००८ रोजी विचाराधीन असलेली दोनही अपिले सादर केल्यानंतर अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या पुराव्याचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. १४२४/०८, दि. १६.०७.२००८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्र. १४२५/०८, दि. १६.०७.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,मुख्य संपादक सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी,ता.किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, रोहयो विभाग,इस्लापूर,ता . हिमायतनगर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३९४
निर्णय दिनांक: २३-०९-२००९

१. श्री. दत्तात्रय बाबूराव शिवराये, : अपिलार्थी
रा.खेड, ता. लोहारा, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, लोहारा,जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.०१.२००९ रोजी फेर नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२९.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ.खेड, ता.लोहारा येथील जलस्वराज्य प्रकल्पाबाबतची, सदर प्रकल्प सुरु झाल्यापासून ते दि. २९.१०.२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौ. खेड येथील जलस्वराज्य योजनेअंतर्गत झालेल्या पूर्ण कामाचे अंदाजपत्रक, निविदा,कोटेशन व इतर कायदेशीर तरतुदींचे

कागदपत्र तसेच खर्च केलेल्या पैशाच्या पावत्यासह हिशोबाचा तपशील, सामाजिक लेखा परीक्षण, खरेदी समिती, हिशोब, देखरेख व ग्रामसभा यांच्या संमतीने घेतलेल्या कामाच्या मंजूरीचे मासिक व वार्षिक अहवाल, आतापर्यंत झालेल्या कामाच्या खर्चाचे लेखा परीक्षण, बँकेतील जमाखर्चाचा पासबुकातील सर्व व्यवहारातील तपशील - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०३.२००८ रोजी आपले निर्णय पारित करुन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व अपिलार्थीस दहा दिवसात विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही. त्यामुळे आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतरच्या काळामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली किंवा कसे, हे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा यांच्याकडून ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जर त्यांनी अद्यापपावेतो त्यांच्या दि. २९.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाशी संबंधित कोणतीही माहिती दिली नसेल तर आता ती

अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व जर ही माहिती अपिलार्थीस दिली असेल तर त्याप्रमाणे अपिलार्थीस व आयोगास तसे अवगत करावे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती न देऊन संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित गट विकास अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस त्यांच्या दि. २९.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाशी संबंधित कोणतीही माहिती दिली नसेल तर आता ती अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व जर ही माहिती अपिलार्थीस दिली असेल तर त्याप्रमाणे अपिलार्थीस व आयोगास अवगत करावे.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २३-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय बाबूराव शिवराये, रा.खेड,पो.धानुरी, ता. लोहारा, जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, लोहारा,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जलस्वराज्य प्रकल्प,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३९५
निर्णय दिनांकः २३-०९-२००९

१. श्री. सिध्दार्थ वामनराव थोरात, : अपिलार्थी
रा.मुगट, ता.मुदखेड, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत धनज, ता.मुदखेड,जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मुदखेड,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहितीसाठी केलेला अर्ज प्रथम जन माहिती अधिकारी यांनी नाकारल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यास सांगितले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती दिली. मात्र ही माहिती अपूर्ण व त्यांच्या मूळ अर्जानुसार नाही व तसेच ती मुदतीत दिली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०६.२००८ रोजी आपले म्हणणे लेखी सादर केले. तथापि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अद्यापही निर्णय न

दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे व तसेच संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर कमाल शास्ती लावावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२३.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००५ ते दि.२३.०४.२००८ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यक्षेत्रातील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौ.धनज ग्रामपंचायती अंतर्गत झालेल्या विकास कामाचे प्रकार, गुत्तेदारांची नावे, सर्व कामांच्या मोजमापपुस्तिका अंदाजपत्रके, देयके - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.३०.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०६.२००८ रोजी आपले निर्णय पारित करुन या निर्णयामध्ये अपिलार्थीच्या गैरहजेरीची नोंद घेतली व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याबाबत ताकीद दिली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून हा निर्णय देखील अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस त्यांनी दि. ३०.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली असल्याचे आयोगास अवगत केले मात्र त्यांच्या या युक्तिवादाच्या समर्थनार्थ अपिलार्थीस माहिती मिळाल्याची पोचसही ते आयोगास दाखवू शकले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात संदर्भित केलेल्या कामाच्या अंदाजपत्रकाच्या प्रती देखील मागितल्या होत्या. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीमध्ये संदर्भित अंदाजपत्रकाच्या प्रती समाविष्ट नाहीत.यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने या मुद्याव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सिध्दार्थ वामनराव थोरात, रा.मुगट, ता.मुदखेड, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत धनज, ता.मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३९६
निर्णय दिनांक: २३-०९-२००९

१. श्री. राऊतराव रामराव लालुजी, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य,
पिपल्स कॉलेज,नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
पिपल्स कॉलेज,नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपप्राचार्य,
पिपल्स कॉलेज,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांची बाजू मांडण्यासाठी संधी न दिल्यामुळे तसेच त्यांना अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयाशी संबंधित विस्तृत प्रमाणात एकूण पाच मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०८.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अथवा त्यांच्या अपील अर्जावर त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी न देता दि.०१.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे उर्वरित माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे वकील उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व चुकीची माहिती प्राप्त झाली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी जर त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली असती तर, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीबाबत नेमकी कोणती माहिती अपूर्ण व चुकीची माहिती प्राप्त झाली, हे ते सांगू शकले असते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे वकील श्री. यु.एम.देशपांडे यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः त्यांच्याकडील दि.०८.०२.२००८ रोजी व तदनंतर दि. ०१.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व आज रोजी युक्तिवादामध्ये मांडलेले मुद्दे विचारात घेता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०३.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आयोगास गरजेचे वाटते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०३.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०३.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राऊतराव रामराम लालुजी,४३,"पितृछाया",लालबहादूर शास्त्रीनगर (भाग्यनगर जवळ),नांदेड-४३१ ६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, पिपल्स कॉलेज,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, पिपल्स कॉलेज,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३९७
निर्णय दिनांक: २३-०९-२००९

१. श्री. गोविंद सदबाराव देशमुख, : अपिलार्थी
रा.बेल्लूर बू., ता.धर्माबाद, जि.नांदेड
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तलाठी, बेल्लूर (बु.),
ता.धर्माबाद,जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, धर्माबाद,जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. विठ्ठलराव सदबाराव व श्रीमती जनाबाई माणिकराव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी तहसीलदार,धर्माबाद यांच्याकडे माहिती अधिकाराखाली एक अर्ज सादर केला होता. तथापि तीन महिन्यापासून त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे मिळाली नाहीत. शोध चालू आहे, यापुढे दुसरे उत्तर मिळाले नसल्यामुळे व त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हे हेतुपूरस्सर टाळाटाळ करत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.१७.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जो जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांना दि. २४.०३.२००८ रोजी प्राप्त झाला, त्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"कै. मारोतीराव बाळोजी देशाई, रा.बेल्लुर बु. हे २१-०५-९४ साली मयत झाले. त्यांच्या नावावरची जमिन दोघामध्ये वरिल समान वाटप फेर कोणत्या पेपरच्या आधारे करण्यात आला. तो पेपर देण्यात यावा. तसेच  फेरफार नक्कल देण्यात यावी. फेरफार ज्या वर्षी मंजुर झाला ते वर्ष."

अपिलार्थीस या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मौ. बेलुर (बु.) तालुका धर्माबाद येथील ग.नं.८५, १००, १०२,२७५,२७८ च्या फेरफार क्र.१३७७ ची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२८.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्याच दिवशी म्हणजे दि.२८.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध घेण्याचे काम चालू आहे व कागदपत्रे प्राप्त होताच अपिलार्थीस ती तात्काळ पुरविण्यात येतील, असे अपिलार्थीस कळविले. तहसीलदार,धर्माबाद यांनी अपिलार्थीस अशाप्रकारे आश्वासित करुनही त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ते या पदावर सप्टेंबर, २००८ पासून कार्यरत असून त्यांच्यापूर्वी तलाठी मौ. बेल्लूर (बु.) या पदावर कार्यरत असलेले श्री. नरावाड

(सध्या बिलोली येथे कार्यरत) यांनी या प्रकरणाशी संबंधित आवश्यक ती कागदपत्रे त्यांना हस्तांतरित न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. एवढे असूनही अपिलार्थीस माहिती मिळवून देण्याचे प्रयत्न आजतागायत संबंधित तलाठी अथवा तहसीलदार यांनी कोणत्याही टप्प्यावर कधीही केल्याचे आयोगास आढळून येत नाही. तहसीलदार, धर्माबाद यांनी कागदपत्रे प्राप्त होताच तात्काळ पुरविण्यात येतील, असे अपिलार्थीस दि. २८.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे खोटे आश्वासन दिल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब जिल्हाधिकारी, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी तत्कालीन तलाठी, श्री. नरावाड (सध्या बिलोली येथे कार्यरत) यांच्याकडून त्यांनी सर्व कागदपत्रे हस्तगत करुन घ्यावीत तसेच नरावाड यांनी जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे खरोखरीच स्वतःच्याकडील योग्य तो पदभार हस्तांतरण न केल्याचे सिध्द झाले तर त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी. जर श्री. नरावाड,तलाठी यांच्याकडून या माहितीशी संबंधित अभिलेखे गहाळ केली गेली असतील तर आवश्यकता वाटल्यास त्यांच्यावर हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसात फौजदारी कारवाई करुन एफ.आय.आर.ची प्रत अपिलार्थीस तात्काळ पुरविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्यासंदर्भात संबंधित तहसीलदार, धर्माबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपील क्र.१३९७/२००८

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. तहसीलदार,धर्माबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जिल्हाधिकारी, नांदेड यांनी आवश्यकतेप्रमाणे संबंधित तलाठयावर वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कारवाई करावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोविंद सदबाराव देशमुख,रा.मौ. बेल्लूर (बु.),ता.धर्माबाद,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, मौ. बेल्लूर (बु.),ता.धर्माबाद,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३९८
निर्णय दिनांकः २३-०९-२००९

१. श्री. केशरलाल रामचरण जयस्वाल, : अपिलार्थी
रा. गोकुंदा, ता.किनवट,जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
श्री.बाबासाहेब मुखेर विद्यालय, किनवट,जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. अनंतराव नामदेवराव केशवे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याचे अधिकार राज्य माहिती आयोगास असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणतीही विशिष्ट स्वरुपाची माहिती मागितलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०५.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, त्रयस्थ पक्ष श्री. अनंतराव नामदेवराव केशवे, सहशिक्षक यांचा जिल्हा परिषद,सदस्य (माहुर सर्कल)चा कालावधी व संबंधित कालावधीमध्ये उपस्थिती पटाची सत्यप्रत ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे

मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०६.२००८ रोजी निर्णय घेऊन त्याच दिवशी आवश्यक ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तांतरित करण्यात आली. मात्र अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होऊनही जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकाऱ्यावर शास्तीची कारवाई न केल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यंच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः कधीही उपस्थित न राहिल्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः पुरविता आली नाही. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्या संस्थेमध्ये सहशिक्षक या पदावर कार्यरत होते. संस्थेमध्ये कार्यरत असताना त्यांच्याकडून घडलेल्या प्रमादामुळे संस्थाचालकांनी त्यांना बडतर्फ केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि.१६.०६.२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी व्यक्तिशः व सशुल्क पुरविली. या प्रकरणी

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर यासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व अपिलार्थीचे होते. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी उपस्थित झाले याचा कोणताही सबळ पुरावा आयोगास सादर केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही तसेच त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थितही नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कधीही नाकारले नाही किंवा अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त होण्यापासून कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केली अथवा माहिती दडविली गेल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीसच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित राहणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांचे हे उत्तरदायित्त्व त्यांनी योग्यप्रकारे पार न पाडल्यामुळे विलंबाने माहिती प्राप्त होण्यास अपिलार्थी हे स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २३-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. केशरलाल रामचरण जयस्वाल, व्दारा- श्री. जी.टी. खोत, कल्याणनगर, पेट्रोल पंपाजवळ, वॉर्ड क्र.३, गोकुंदा, ता.किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री.बाबासाहेब मुखेर विद्यालय, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी,

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी,

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३९९
निर्णय दिनांकः २३-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सुभाष शंकरराव दारवंडे,<br>रा.हिमायतनगर,जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, हिमायतनगर, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, हिमायतनगर, जि.नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२५.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००८ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - हिमायतनगर तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांचे नाव, गाव, त्यांना देण्यात येत असलेला गावनिहाय वाहतुक खर्च निधी, प्रत्यक्ष गावात एकूण दुकानदारांची यादी, वाटप अनुदानाची एकूण रक्कम - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती

अपेक्षिली होती व या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१५००/- इतके शासकीय कोषागारात भरुन चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेबरहुकूम कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असून तसे प्रमाणपत्र त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. २५.०३.२००८ रोजीच्या अर्जासोबत जोडले असूनही त्यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांनी माहितीपोटीचे शुल्क रु. १५००/- इतके आकारुन हे शुल्क शासकीय कोषागारात भरण्याचे त्यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द त्यांनी तहसीलदार, हिमायतनगर यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. २५.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या

माहितीपोटीचे शुल्क रु. १५००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे. मात्र अपिलार्थीस असे कळविताना अधिनियमातील कलम ७(३)(एक) प्रमाणे त्यांनी शुल्काचा तपशील उदा. अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या माहितीच्या संभाव्य पृष्ठांची संख्या, माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर इत्यादी अपिलार्थीस कळविलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले दि. ३१.०३.२००८ रोजीचे पत्र हे अवैध ठरत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देय होत आहे. अपिलार्थीस उद्देशून दि. ३१.०३.२००८ रोजीच्या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे पूर्णपणे तयार आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २५.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित तहसीलदार, हिमायतनगर यांनी अपिलार्थीच्या दि. १८.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेऊन स्पष्ट केलेल्या त्यांचा कार्यशैलीतील बेजबाबदारपणाची व कर्तव्य परायणतेच्या अभावाची नोंद जिल्हाधिकारी, नांदेड यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २३-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सुभाष शंकरराव दारवंडे, फुलेनगर, हिमायतनगर,ता.हिमायतनगर,जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, हिमायतनगर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी,

३. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिमायतनगर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी,

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी,

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४००
निर्णय दिनांकः २३-०९-२००९

१. श्री. आसाराम त्रिंबक वाघ, : अपिलार्थी
रा. वैजापूर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग क्र.१,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग क्र. १,औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र.१, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारीः कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र.१, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी दोन महिने पाच दिवस इतक्या विलंबाने माहिती दिली. त्यांनी दि. २४.०४.२००८ रोजी पत्र लिहिले

ते पत्र दि. २८.०५.२००८ रोजी प्रत्यक्षात टाकले व अपिलार्थीस दि. २९.०५.२००८ रोजी प्राप्त झाले, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - शिवनाटाकळीचे काम धोंदलगाव भागातील कोठून सुरु होणार व ते कोठपर्यंत होणार व तसेच धोंदलगाव येथील पाझर तलावाचे ओव्हर फ्लोचे पाणी सोडण्यासाठी मा.आमदार श्री. आर.एम.वाणी यांनी दि. १५.०५.२००७ रोजी पत्र दिल्यानंतर काम केव्हा सुरु करणार - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२१.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस दि. २९.०५.२००८ रोजी प्राप्त झाल्याने अपिलार्थीने दि. ०३.०६.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २/- इतके भरले व त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेतली. माहिती प्राप्त होऊनही अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २७.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जास अपिलार्थीने रु.२०/- इतक्या किमतीचा कोर्ट-फी-स्टॅम्प लावला नसल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांचे दि. २५.०४.२००८ रोजीचे पत्र त्यांना दि. २९.०५.२००८ रोजी प्राप्त झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगाने नियमाप्रमाणे आवश्यक ती कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २/- इतके त्यांच्या कार्यालयात दि. ०३.०६.२००८ रोजी भरल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी त्याच दिवशी माहिती व्यक्तिशः हस्तगत केली. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीची त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाल्याची पोचसही आयोगास सादर केली. यावरुन अपिलार्थीस त्यांनी आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर त्याच दिवशी त्यांना संपूर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. एकदा व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात पुढील घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व अर्जदाराचे असते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्त्व नीटपणे पार पाडले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही, पत्र लिहून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २/- इतके भरणा करण्याचे कळविले आहे. तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.०६.२००८ रोजी अपील अर्ज करताना रु. २०/- ऐवजी केवळ रु. १०/- इतक्या किमतीचे तिकीट लावले असल्यामुळे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज फेटाळला गेला. आता अपिलार्थीस आवश्यक माहिती प्राप्त झाली आहे. केवळ जन माहिती अधिकारी यांचे दि. २१.०४.२००८ रोजीचे पत्र अपिलार्थीस दि. २९.०५.२००८ रोजी प्राप्त झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगाने कारवाई करावी, असे अपिलार्थीस अपेक्षित आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा त्यांनी भरणा केल्याच्या दिवशीच जन

माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाली आहे असे आढळून येत आहे. तसेच पोस्टखात्याच्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करणे आयोग उचित समजत नाही. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आसाराम त्रिंबक वाघ,रा.पाटील गल्ली, वैजापूर, जि.औरंगाबाद -४२३ ७०१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग क्र. १,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५०४
निर्णय दिनांकः २३-०९-२००९

१. श्री. विखार अहमद, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रशासकीय अधिकारी,
महानगरपालिका,औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (महसूल),
महानगरपालिका,औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उपायुक्त (सिडको),
महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०१.२००९ रोजी फेर नोंदणी झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिली नाही व विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर त्यांना जी माहिती पुरविली ती चुकीची व दिशाभूल करणारी अशी देण्यात आली. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत कोणतीही माहिती न देऊन जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन केले आहे. त्यांनी मागणी केलेली माहिती गुंड प्रवृत्तीच्या नगरसेविकेच्या घरासंबंधीची असल्याने महानगरपालिकेचे कर्मचारी हे माहिती लपवून तथाकथित जनप्रतिनिधींना पाठीशी घालत आहेत. या कारणास्तव सर्व

संबंधितांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई आदेशित करुन अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य मिळावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१९.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ऑगस्ट २००६-२००७ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यक्षेत्रामधील अनधिकृत बांधकामासंबंधी काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही औरंगाबाद शहरातील नेहरुनगर प्रभाग क्र.२८ च्या नगरसेविका श्रीमती खान मेहरुन्निसा यांनी राहत कॉलनी येथील आपल्या राहत्या घराचे कथित अनधिकृत बांधकाम केल्यासंबंधीची होती. अपिलार्थीने ही माहिती तीन मुद्यांद्वारे विचारली असून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अनधिकृत बांधकामाच्या पंचनामा करुन उक्त गैरकृत्याची लेखी सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली काय?, असल्यास पंचनामा व लेखी सूचना प्रतीसह व नसेल तर का व त्याची कारणे कोणती?, या संदर्भात न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात आला का? असेल तर नोटीस व कॅव्हेट नंबरची सत्यप्रत व कॅव्हेट दाखल केले नसेल तर का देण्यात आले नाही, याची कारणे कोणती? व राज्य शासनाने अनधिकृत बांधकामास पाणीपुरवठा मंजूर करण्यात येऊ नये अशा लेखी सूचना दिल्या आहेत, त्याप्रमाणे मनपाच्या पाणीपुरवठा विभागास अथवा प्रशासन विभागास अशा लेखी सूचना देण्यात आल्या का? व कारणे कोणती? - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०१.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, मोहल्ला राहत कॉलनी येथील बांधकाम नगरसेविका खान मेहरुन्निसा खान यांचे नसून श्री. यासीन खान यांचे आहे, असे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.३१.०१.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस

१५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतर कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना विलंब लागल्याचे त्यांच्या युक्तिवादामध्ये मान्य केले व या बांधकामाची मालकी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या नगरसेविकेचे नाही, असे त्यांनी आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अनधिकृत बांधकामाबाबत महानगरपालिकेतर्फे आता कारवाई सुरु करण्यात येत आहे.अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या इमारत निरीक्षकांनी या बांधकामाचा पंचनामा केला आहे व बांधकाम मालकास एम.आर.टी.पी. ॲक्टप्रमाणे नोटीसही दिली आहे. तथापि यासंदर्भात त्यांनी कोणतेही कॅव्हेट मा. न्यायालयामध्ये दाखल केलेले नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्र.३ च्या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, संदर्भिय अनधिकृत बांधकामास पाणीपुरवठा करण्यासंदर्भात महानगरपालिकेने पाणीपुरवठा विभागास कोणत्याही लेखी सूचना अद्यापपावेतो दिलेल्या नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १९.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये एकूण तीन मुद्यांद्वारे माहिती मागविली आहे. या तीनही मुद्याव्दारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप संमिश्र असे असल्याचे दिसून येते. या तीन मुद्यांमध्ये अपिलार्थीने, "उक्त गैरकृत्याची सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली का ? नसेल तर त्याची कारणे कोणती ? " अशा स्वरुपाची माहिती मागितली होती. अशा स्वरुपाची माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या निर्णयाची अथवा कृतीची कोणतीही कारणे देणे अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील तीनही मुद्यांद्वारे संबंधित कार्यवाही केली का ? व नसेल तर का नाही, याची कारणे कोणती ? अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मधील - अनधिकृत बांधकामाचा पंचनामा व लेखी सूचनेची प्रत, मुद्दा क्र.२ मधील - कॅव्हेट दाखल करण्यात आले असेल तर त्या कॅव्हेटची प्रत व नोटीसची प्रत आणि मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात- या बांधकामास पाणीपुरवठा करण्यासंदर्भात महानगरपालिकेने संबंधित विभागास दिलेल्या सूचना ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व या निर्णयातील वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा विलंबाने दिलेल्या प्रतिसादामुळे संबंधितांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २३-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्री. विखार अहमद, घर नं. १-१८-४१/५, मंजूरपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५०५
निर्णय दिनांकः २३-०९-२००९

१. श्री. पुंडलिक तुकाराम जोजारे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक आयुक्त (पशुसंवर्धन),
पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय,औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०६.२००९ रोजी फेर नोंदणी झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती दिली होती आणि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात अनावश्यक व मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात कोणतीही माहिती दिली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०२.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील पशुछळ कायदा २००१ (पशुवधगृह) च्या अंमलबजावणीबाबतची माहिती या विषयावर दि. ०१.०८.२००५ ते दि.३१.०७.२००७ या

कालावधीतील काही माहिती चार मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पशुछळ कायदा २००७ (पशुवधगृह) ची अंमलबजावणी करण्यात येते काय, नसल्यास स्थानिक वरिष्ठांनी काय कार्यवाही केली, या कालवधीमध्ये पशुधन विकास अधिकारी यांची स्वाक्षरी असलेल्या आठवडी अहवाल रजिस्टरची साक्षांकित प्रत व या कालावधीमध्ये F.M.D. रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे काय, असल्यास, पशुवधगृहामधील तपासणीसाठी काय बंधने घालण्यात आली, तसेच कार्यक्षेत्र F.M.D. मुक्त असल्याबद्दल कुणी व किती प्रमाणपत्रे दिली - अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२९.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११०/- इतके भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुन ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ३१.०८.२००७ रोजी हस्तांतरित करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.२२.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व संबंधित जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विसंगत माहिती प्राप्त झालेली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी आयोगास असे अवगत केले की,

त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत दि. ०९.०४.२००९ रोजी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,औरंगाबाद यांच्याकडे हीच माहिती मागितली असता, त्यांना जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी त्यांच्या दि. ३०.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याबाबत माहिती दिली होती. जर जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्या कार्यालयात संबंधित नस्ती उपलब्ध नव्हती तर, त्यांनी आता त्यांच्या विचाराधीन मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात चार प्रमाणपत्रे दिली असल्याचा उल्लेख केला आहे, तो कशाच्या आधारावर व याचा अर्थ त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विसंगत माहिती दिली असा होतो.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या स्तरावरील माहिती उपलब्ध करुन दिल्याचा युक्तिवाद केला व तसेच या प्रकरणी अपिलार्थीपासून कोणतीही माहिती दडविली नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विसंगत माहिती प्राप्त झाली आहे. या मुद्यावर उपलब्ध कागदपत्रांची छाननी केली असता, अपिलार्थीने विचाराधीन प्रकरणी सहायक आयुक्त, पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला होता. त्यांनी त्यांच्या स्तरावरील उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत सशुल्क पुरविली आहे. मात्र अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे दि. ०९.०४.२००९ रोजी केलेल्या अर्जासंदर्भात जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविले, मात्र या प्रकरणी अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपील अर्जास प्रतिसाद देण्याकरिता त्यांनी लिहिलेल्या दि. २२.१०.२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी, त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये लाळ-खुरकतमुक्त असल्याबाबत जिल्हा प्रमुख या नात्याने पशुसंवर्धन उपआयुक्त, औरंगाबाद यांनी मे. फ्रिगरी फिको अलाना लि.,गेवराई यांनी मागणी

केल्यानुसार त्यांनी चार प्रमाणपत्रे दिली असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीस जी माहिती विसंगत स्वरुपात प्राप्त झाली आहे, ती जिल्हास्तरावरील आहे. मात्र विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीने सहायक आयुक्त यांच्याकडे माहिती मागविली आहे व त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या स्तरावरील माहिती दिली आहे. त्यामुळे अपिलार्थीस विसंगत माहिती प्राप्त होण्यासाठी सहायक आयुक्त,पशुसंवर्धन यांना जबाबदार धरता येणार नाही. मात्र अपिलार्थीच्या दि. ०९.०४.२००९ रोजीच्या अर्जासंदर्भात उपआयुक्त,पशुसंवर्धन यांनी मात्र अपिलार्थीस विसंगत माहिती दिल्याचे दिसून येते. अर्थात विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीने सहायक आयुक्त पशुसंवर्धन यांच्याकडे प्रथम केलेल्या माहितीसाठीच्या अर्जावर निर्णय देणे अभिप्रेत असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती दिली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पुंडलिक तुकाराम जोजारे, प्लॉट नं. १४, एन-११, सेक्टर-एल,मयुरबन हौसिंग सोसायटी, हडको,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (पशुसंवर्धन), पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५०६
निर्णय दिनांकः २३-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दिलीप रंगनाथराव पोहेकर,<br>रा.पैठण,जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,पैठण, जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी,<br>उपविभागीय कृषि अधिकारी,औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०५.२००९ रोजी फेर नोंदणी झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२७.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००४-०५ ते २००६-०७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - तालुक्यात एकूण किती ठिकाणी नाला बंडिग करण्यात आले व त्यावरील खर्च, बांधबंदिस्तीसाठी किती व

कोठे रक्कम खर्च करण्यात आली, फळबाग योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या प्रत्यक्ष अनुदानधारकांची यादी व रक्कम, अनुदानासाठी तालुक्यासाठीची मंजूरी व वाटप रक्कम, 'मिनीकिट' योजनेअंतर्गत निविष्ठा व वाटप यादी - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.३१.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस दि. ०९.११.२००७ पर्यंत माहिती देण्यात येईल, असे आश्वासित केले व तदनंतर विनादिनांकाच्या पत्राने अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५२४/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. तथापि या प्रकरणी अधिनियमातील कलम ७(६) चा भंग झाल्याचे दर्शवून अपिलार्थीने सदर शुल्क भरण्यास नकार दिला व दि.१९.११.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न होऊ शकल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस साक्षांकित स्वरुपात माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतर प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने  वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती पुरविली व त्यांना जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आली, ती दिशाभूल करणारी आहे.अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेली माहिती दिशाभूल करणारी कशी आहे, हे विचारले असता, अपिलार्थीने आयोगास असे सांगितले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.

३ च्या संदर्भात वेगळीच माहिती दिली असून, या माहितीमध्ये तालुक्यामध्ये सन २००७-०८ या वर्षी किती अनुदान वाटप करण्यात आले, याचा तपशील त्यांनी पुरविलेल्या माहितीमध्ये नाही व तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून साक्षांकित स्वरुपात माहिती पुरविण्यात आलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी विलंब झाल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. त्याप्रमाणे अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १९.११.२००७ रोजी व्यक्तिशः उपस्थित झाले. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यादिवशी माहिती प्राप्त झाली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथमतः दि. २६.११.२००७ रोजी माहिती प्राप्त झाली व ती माहिती त्यांनी परत अपिलार्थीस दि. २७.१२.२००७ रोजी साक्षांकित स्वरुपात पुरविली. यावरुन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी विलंब लावल्याचे व आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे कलम ७(१)चा भंग केल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मागणीशी सुसंगत माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये सन २००७-२००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी संबंधित माहिती अपिलार्थीस दिलेली नाही. यामध्ये जन माहिती अधिकारी यांचा कोणताही दोष नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी असद्‌हेतूने दिशाभूल करणारी माहिती दिली, हे अपिलार्थीचे मत सिध्द होत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिलेली आहे. मात्र ही माहिती अपिलार्थीस विलंबाने उपलब्ध

करुन देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. आयुक्त (कृषि) म.रा.,पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीप रंगनाथराव पोहेकर, ५, पिंपळ,कुचर ओटा,मु.पो.ता.पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि) म.रा.शिवाजीनगर,पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५०७
निर्णय दिनांकः २३-०९-२००९

१. श्री. सुधाकर मोतीराम करोडे, : अपिलार्थी
औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी,
विभागीय समाज कल्याण अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०८.२००८ रोजी फेर नोंदणी झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, शासनाच्या वृत्तपत्रातील मोठमोठया जाहीरातींना बळी पडून सन २००२-०३ पासून सतत ५ ते ६ वर्ष विहित नमुन्यात त्यांच्या सामाजिक कार्याबाबत अटी व शर्थींनी परिपूर्ण प्रस्ताव विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे सादर करुनही त्यांना दलित मित्र पुरस्कार देण्याचा प्रस्ताव प्रशासनाद्वारे का पाठविला जात नाही, हे जाणण्याकरिता त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.११.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना दलित मित्र पुरस्काराकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००२-२००३, २००३-०४, २००४-०५ व २००५-०६ या वर्षी त्यांना दलित मित्र पुरस्कार का

देण्यात आला नाही या विषयी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - उपरोक्त कालावधीमध्ये प्राप्त झालेले प्रस्ताव, पुरस्कार दिलेल्या व्यक्तींची नावे, पुरस्कारास योग्य कसे ठरविले, त्यांचे प्रस्ताव मुदतीत दाखल केले होते का, अपिलार्थीस का डावलण्यात आले, अपिलार्थीच्या प्रस्तावात काय कमी होते, गेल्या ५-६ वर्षात पाठविलेल्या प्रस्तावानुसार अपिलार्थीस दलित मित्र पुरस्कार का दिला नाही, दलित मित्र पुरस्कार निवडीचे काम कोणत्या अधिकाऱ्याकडे आहे व अपिलार्थीचे काम न करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्याचे नाव - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२४.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.११.२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या कार्यालयीन टिपणीच्या प्रती सात दिवसांच्या आत पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १९.११.२००७ रोजी संबंधित समितीच्या बैठकीच्या टिपणीच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे दलित मित्र पुरस्कार प्राप्त करुन घेण्यासाठी सन २००२ ते २००३ या वर्षापासून सतत अर्ज करीत आहेत.परंतु एकाही वर्षी त्यांना हा पुरस्कार का मिळाला नाही, याची कारणे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहेत, असा आयोगासमोर युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २४.०९.२००७ रोजी व जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे दि. १९.११.२००७ रोजी दिलेली आहे. त्यांच्याकडे दलित मित्र पुरस्कारासाठी प्राप्त झालेले प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने गठित केलेल्या समितीद्वारे छाननी केले जातात व नंतर हे प्रस्ताव अंतिमतः शासनास पाठविण्यात येतात. शासन स्तरावर या संदर्भातील अंतिम निर्णय घेतला जातो.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थी हे अनेक वर्षापासून समाज कार्य करत असूनही त्यांना सामाजिक न्याय विभागातर्फे दलित मित्र पुरस्कार प्राप्त न होण्याची कारणे जाणून घेण्यामध्ये अपिलार्थीस स्वारस्य आहे. या टप्प्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णयाबातची कारणे अथवा स्पष्टीकरणे मागविणे माहिती अधिकार अधिनियमातील मूळ तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये, अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कार्यवाही करणे, एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सन २००२-०३ ते २००५-०६ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण प्राप्त प्रस्तावाची संख्या व पुरस्कार प्राप्त व्यक्तींची नावे, अपिलार्थीच्या दि. २५.०१.२००७ रोजीच्या प्रस्तावावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही आणि पुरस्कार निवडीचे काम ज्या अधिकाऱ्यांकडे आहे, त्या अधिकाऱ्यांची नावे एवढीच माहिती देय होत आहे. यापैकी बहुतांश देय माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.०९.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, निवड समितीच्या आदेशाच्या प्रतीचा

समावेश नाही, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांना दलित मित्र पुरस्कार देण्यासंदर्भात शासन आदेशाद्वारे गठीत करण्यात आलेल्या समितीसंदर्भात शासनाकडून जे आदेश प्राप्त झाले आहेत, त्या आदेशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व मुद्यांवर, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य व सुसंगत माहिती पुरविली असली तरी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील इतर मुद्यांसंदर्भात माहिती देण्यासाठी, ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्याने, जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुधाकर मोतीराम करोडे, ३२,राजीव गांधीनगर, मुकुंदवाडी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३२६
निर्णय दिनांक २३/०९/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.अंबादास विनायकराव काळे,<br>नाथनगर (उत्तर), ता.पैठण, जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>चेअरमन,<br>संत ज्ञानेश्वर उद्यान व परिसर विकास कर्मचारी<br>सहकारी पतसंस्था मर्या. नाथनगर (उत्तर),पैठण,<br>ता.पैठण, जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पैठण,<br>जि.औरंगाबाद | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सचिव,
संत ज्ञानेश्वर उद्यान व परिसर विकास
कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.
नाथनगर (उत्तर), पैठण, ता.पैठण,
जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.०३.२००८ रोजी नोंदविलेले अपील आज दिनांक २३.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक १८.१०.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, संत ज्ञानेश्वर उद्यान व परिसर विकास कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. नाथनगर (उत्तर), पैठण, जि.औरंगाबाद यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८४४/-

त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.सदर शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पैठण, जि.औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १०.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पैठण, जि.औरंगाबाद यांनी दि. ३१.१२.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य केले व रु. ८४४/- इतके शुल्क संस्थेच्या बँक खात्यावर त्यांनी भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर

पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १३२६ /०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.अंबादास विनायकराव काळे, नाथनगर (उत्तर), पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, संत ज्ञानेश्वर उद्यान व परिसर विकास कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. नाथनगर (उत्तर), पैठण, जि.औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पैठण, जि.औरंगाबाद

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३२७
निर्णय दिनांक २३/०९/२००९

**१** श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपिलार्थी
हिना मंजील, टाऊन हॉल, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
चेअरमन,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय
कर्मचारी सहकारी पतपेढी संस्था, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०८.२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २३.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०१.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कर्मचारी सहकारी पतपेढी संस्था, औरंगाबाद यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलार्थीने तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २८.०५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी दि. ११.०७.२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस १० दिवसाच्या आत विनामूल्य माहिती

देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि, यानंतरही अपिलार्थीस संबंधित पतसंस्थेकडून संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. १३२७/०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २३-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रतः

१. श्री.सय्यद साबेर सय्यद सरदार, हिना मंजील, टाऊन हॉल, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कर्मचारी सहकारी पतपेढी संस्था, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३२८
निर्णय दिनांक २३/०९/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ.कमलबाई रामकिसन शिरसाठ,<br>अहिल्यादेवी नगर, जुन्या बसस्टँडच्या मागे,<br>गंगापूर, जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>चेअरमन,<br>शिक्षक पतसंस्था, सहकारी संस्था,<br>गंगापूर, जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहाय्यक निबंधक,<br>सहकारी संस्था, गंगापूर, जि.औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलर्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिाांक १२.०२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २३.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक १७.०७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, शिक्षक पतसंस्था,सहकारी संस्था, गंगापूर, जि.औरंगाबाद यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलार्थीने सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,गंगापूर,जि.औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०१.०९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका गंगापूर यांनी दि. ०४.१०.२००७ आपला निर्णय पारित करुन सहकार आयुक्त व

निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या दि. ०८.०२.२००६ रोजीच्या परिपत्रकाच्या आधारे अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकाऱ्यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील क्र. १३२८/०८ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २३-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ.कमलाबाई रामकिसन शिरसाठ, अहिल्यादेवी नगर, जुन्या बसस्टँडच्या मागे, गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, शिक्षक पतसंस्था, सहकारी संस्था, गंगापूर, जि.औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, गंगापूर, जि.औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३२९
निर्णय दिनांक २३/०९/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती संगीता रघुनाथ गायकवाड,<br>वत्सल निवास, भारती प्रोव्हिजन जवळ,<br>नारळी बाग, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक,<br>देवगिरी नागरी पतसंस्था मर्या.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सह निबंधक,<br>सहकारी संस्था, औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०६.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २३.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक ०९.०१.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, देवगिरी नागरी पतसंस्था मर्या. औरंगाबाद यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलार्थीने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १०.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी दि. ०२.०४.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि,

यानंतरही अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधींच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १३२९/०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**

**दिनांक : २३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती संगीता रघुनाथ गायकवाड, वत्सल निवास, भारती प्रोव्हिजन जवळ, नारळी बाग, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, देवगिरी नागरी पतसंस्था मर्या. अर्थ कॉम्पलेक्स, केशरसिंगपुरा, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३३०
निर्णय दिनांक २३/०९/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. प्रदीप आश्रोबा फुटाने,<br>रा.मेन रोड, मोंढा, परळी वैजनाथ, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक निबंधक,<br>सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, बीड | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहकार अधिकारी श्रेणी१,
सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय,
अंबाजोगाई, जि.बीड.

जन अपिलीय अधिकारी : सहायक निबंधक,
सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २४.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक ०९.०१.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित व श्री.ज्ञानेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, परळी, या पतसंस्थेसंदर्भात एकूण पाच मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व त्यांना पतसंस्थेसंदर्भात आवश्यक असलेली माहिती संस्थेकडून

प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. या पत्राबरोबर त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधित संस्थेचे सचिव / चेअरमन यांना पाठवून त्यांना अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांच्याकडे दि. १३.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. जिल्हा उपनिबंधक यांनी त्यांच्या दि.२३.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचे प्रथम अपील, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले व अपिलार्थीस त्यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१७.१२.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी संबंधित पतसंस्थेचे सचिव / अध्यक्ष यांना अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली परिपत्रके पाहण्यासाठी व त्यांनी मागणी केल्यास त्यांच्या प्रती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती व सध्याचे अपिलीय अधिकारी आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड हे उपस्थित आहेत.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दि. ०७.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या कार्यालयातील स्थायी आदेश संचिकेत उपलब्ध असलेल्या परिपत्रकांची पाहणी करुन त्यांना आवश्यक वाटणाऱ्या परिपत्रकांची मागणी करावी, असे सूचित केले होते व उर्वरित माहिती संदर्भात संबंधित संस्थेस अपिलार्थीस माहिती देण्याच्या सूचना केल्या होत्या. जन अपिलीय अधिकारी यांनी  आदेशित करुनही अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे माहितीसाठी अद्यापपावेतो संपर्क साधलेला नाही.

वरील घटनाक्रम, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणासंदर्भात उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधलेला नाही त्यामुळे ही माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचे दिसून येत आहे व संबंधित पतसंस्थेकडून त्यांच्याशी संबंधित माहिती मागवून ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे या अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेवर बंधनकारक नाही. याही पेक्षा महत्वाचे म्हणजे संबंधित पतसंस्थेस माहिती अधिकार अधिनियम, मा.उच्च न्यायालयाने वर नमूद केलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. १३३०/०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २४/०९/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रदिप आश्रोबा फुटाने, मेन रोड, मोंढा, परळी वैजनाथ, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१, सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय, अंबाजोगाई, ता.अंबाजोगाई, जि.बीड

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई, ता.अंबाजोगाई, जि.बीड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७६५
निर्णय दिनांक २३/०९/२००९

१ सौ.शोभना पुंडलीक वारके, : अपिलार्थी
मु.पो.सावदा (काजीपुरा), ता.रावेर, जि.जळगांव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मॅनेजर,
श्री स्वामी समर्थ अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी
लि., सावदा, ता.रावेर, जि.जळगांव

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, रावेर, जि.जळगांव

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलर्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०५.२००७ रोजी नोंदविलेले (दि.१६.०६.२००८ रोजी फेर नोंदणी केलेले) अपील आज दिनांक २३.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक ०२.१२.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा मॅनेजर, श्री स्वामी समर्थ अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. सावदा, ता.रावेर, जि.जळगांव यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलार्थीने सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,रावेर, ता.रावेर, जि.जळगांव यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६.०४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका रावेर यांनी कोणताही निर्णय पारित केला नाही.

यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित पतसंस्थेचे प्रशासक व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित पतसंस्थेचे प्रशासक तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील क्र. २७६५/०७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद                                                  ( वि. बा. बोरगे )
दिनांक :        २३/०९/२००९                               राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ.शोभना पुंडलिक वारके, मु.पो.सावदा (काजीपुरा), ता.रावेर, जि.जळगांव-४२५५०२
२. जन माहिती अधिकारी तथा मॅनेजर, श्री स्वामी समर्थ अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि. सावदा, ता.रावेर, जि.जळगांव
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, रावेर, जि.जळगांव

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४०१

निर्णय दिनांक २४-०९-२००९

१ श्री. रितेश मिलिंद शेळके, : अपिलार्थी

घर नं. ८, लक्ष्मी कॉलनी, सम्राट अशोक नगर,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

मिलिंद कला महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

मिलिंद कला महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००९ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयाशी संबंधित सन २००५ ते २००८ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांची वर्गवारी अनुसार संपूर्ण नांवे व पत्ते, माहिती अधिकार

अधिनियमाअंतर्गत त्यांच्याकडे प्राप्त झालेले अर्ज व या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहितीच्या साक्षांकीत प्रती व महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व अधिकारी यापैकी प्रतिनियुक्तीवर नेमल्या गेलेल्या कर्मचा-यांची, प्राध्यापकांची नांवे, ठिकाण व पद आणि त्यांना महाविद्यालयातून कार्यमुक्त करण्यात आले असल्यास त्याबाबत संपूर्ण माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०९-२००८ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक २९-०९-२००८ रोजी चर्चा करण्यासाठी उपस्थित राहण्याचे सूचित केले. तथापि या चर्चेस अपिलार्थी उपस्थित न राहिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस या सुनावणी-साठी ते गैरहजर राहिल्याचे अपिलार्थीस अवगत केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढून सुनावणीचे इतिवृत्त सोबत जोडल्याचे म्हटले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्या या दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या पत्रासोबत त्यांनी कथित सुनावणीचे इतिवृत्त जोडले नाही. अशा प्रकारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या महाविद्यालयाकडे माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे टाळले. माहिती देण्याच्या ऐवजी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना चर्चेला बोलाविले व आजतागायतही त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्या-कडून ते या महाविद्यालयात माहिती प्राप्त करण्यासाठी घेण्यासाठी हजर राहिले असता, ही माहिती त्यांना प्राप्त होऊ शकली नाही. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, या महाविद्यालया-मध्ये शिक्षकांच्या व प्राध्यापकांच्या नेमणूकांमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून बिंदू नामावलीचे पालन या महाविद्यालयाकडून नोकर भरती करतांना केले जात नाही. तसेच या महाविद्यालयातील कर्मचा-यांच्या बदल्या झाल्यानंतरही त्यांना या महाविद्यालयाकडून कार्यमुक्त केले जात नाही. या महाविद्यालयाच्या संबंधितांनी केलेला भ्रष्टाचार उघडकीस आणण्यासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांची वर्गवारी नुसार माहिती मागविली आहे. या वर्गवारीमध्ये निकष कोणते हे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्यासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या महाविद्यालयाकडून प्राध्यापक व कर्मचारी यांच्या नावाची व पदाची वर्गवारीनुसार यादी उपलब्ध होऊ शकणार नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे अपिलार्थीने " ............. आपल्या महाविद्यालयाने कार्यमुक्त करण्यात आलेले आहे असल्यास त्याबाबत संपूर्ण माहिती देण्यात यावी " अशी मोघम माहिती मागविली आहे. या मुद्दयावर देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडील महाविद्यालयातील कर्मचा-यांच्या फक्त कार्यमुक्त आदेशाच्या प्रती त्यांना देय होत

आहेत. हे लक्षात घेता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ अंशतः व ३ अंशतः ही माहिती अपिलार्थीस वर स्पष्ट केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र प्रथम अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. संबंधित महाविद्यालयास शासनाची मान्यता व नियमितपणे अनुदान प्राप्त होते त्यामुळे हे महाविद्यालय माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, वर स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना आता विनामूल्य पुरवावी लागेल. सबब असे आदेशित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली आहे. त्यामुळे अपिलार्थी महाविद्यालयात माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी व्यक्तिशः किती वेळा उपस्थित राहिले याची आयोगाने अपिलार्थीकडे विचारणा केली असता, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती घेण्यासाठी ते या महाविद्यालयात वेळोवेळी गेल्याचे सांगितले. तथापि या संदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगास सादर केला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीशी केलेल्या पत्रव्यवहारावरुन या प्रकरणी त्यांनी आपली भूमिका माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यवस्थित पार पाडली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने दिनांक २७-०८-२००८ रोजी केलेल्या अपील अर्जावर सुनावणी घेण्याऐवजी त्यांनी अपिलार्थीस फक्त चर्चेसाठी बोलाविले होते. या पत्रामध्ये अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची ते सुनावणी घेत असल्याचा देखील उल्लेख नाही. तसेच अपिलार्थीस दिनांक ३०-०९-२००८ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये सोबत इतिवृत्त जोडले आहे असे नमूद करुनही, कथित इतिवृत्त या पत्रासोबत जोडलेले नाही. एकंदरीत या सर्व प्रकारावरुन मिलिंद कला महाविद्यालयाने अपिलार्थीने मागणी केलेली

साधी माहिती देखील त्यांना द्यावयाची नाही असा एकप्रकारे संकल्प सोडल्याचे आयोगास प्रतीत होत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाही, अशा परिस्थितीत सचिव (उच्च शिक्षण) यांना, त्यांनी अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेल्या माहितीमध्ये समाविष्ट असलेल्या महाविद्यालयातील नोकर भरती या मुद्दयावर त्यांच्या स्तरावर चौकशी करुन आवश्यकतेप्रमाणे प्रचलीत नियमानुसार या महाविद्यालयावर कारवाई अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे. सदर सूचना त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) च्या तरतुदीनुसार देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (उच्च शिक्षण) यांना महाविद्यालयाची प्रचलीत चौकशी करुन आवश्यकतेप्रमाणे नियमानुसार या महाविद्यालयावर यथायोग्य कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रितेश मिलिंद शेळके, घर नं. ८, लक्ष्मी कॉलनी, सम्राट अशोक नगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, मिलिंद कला महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, मिलिंद कला महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (उच्च शिक्षण), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४०२

निर्णय दिनांक २४-०९-२००९

१ श्री. सलिम कासम पटेल वाहेगांवकर, : अपिलार्थी
मलिम अंबर नगर (रहेमानियॉ कॉलनी), किराडपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणत्याही निश्चित स्वरुपाची अशी विनंती केली नसून यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांचे पत्र दिनांक २८ जुलै २००८ मुदतीच्या आत माहिती न मिळाल्याने त्यांनी हे विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची, प्रथम अपील अर्जाची व अपील निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०७-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केल्यानंतर अपिलार्थीस संबंधितांकडून माहिती मिळाली किंवा कसे हे समजण्यास काहीही मार्ग नाही. आवश्यक त्या संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे व कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांना त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्यानंतर मिळाली असल्याचे अनुमान काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सलिम कासम पटेल वाहेगांवकर, मलिम अंबर नगर (रहेमानियॉ कॉलनी), किराडपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी  तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४०३

निर्णय दिनांक २४-०९-२००९

१ श्री. सुरेश व्यंकटराव बुलबुले, : अपिलार्थी
२३/७२, कापड लाईन,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नगर परिषद, लातूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रमुख स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, लातूर

त्रयस्थ पक्ष :
१. श्री. रमेश दयालदास जोधवाणी,
२. श्रीमती राधाबाई दयालदास जोधवाणी,
३. श्री. नानीक दयालदास जोधवाणी,
४. सौ. स्नेहा नानीक जोधवाणी,
५. श्री. कमलेश दयालदास जोधवाणी,
६. श्री. मुकेश दयालदास जोधवाणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी गांभीर्याने नोंद घेतली नाही. त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथील कोर्ट कामासाठी आवश्यक होती. परंतु मुदतीत माहिती न मिळाल्याने उच्च न्यायालयात माहिती सादर करण्यास त्यांना विलंब लागला. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केल्यानंतरही प्राप्त झाली नाही. माहिती अधिकारी यांनी विनंती अर्जाची दखल न घेण्याची कृती अत्यंत बेजबाबदार असल्याने ते दंडास पात्र आहेत, या सर्व कारणामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सहा त्रयस्थ पक्षांच्या नगर परिषदेच्या हद्दीतील मालमत्तेचा तपशील व मुख्याधिका-याने स्वच्छता निरीक्षक श्री. कोरबू यांना दिनांक ०८-०२-२००८ रोजी दिलेल्या ७३२ क्रमांकाच्या नोटिशीला अनुसरुन श्री. कोरबू यांनी जोधवाणी कुटूंबावर बजावलेली नोटिशीची प्रत ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि या माहितीमध्ये श्री. कोरबू यांना दिलेल्या नोटिशीच्या प्रतीचा समावेश नव्हता. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीन दिवसात विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्याप्रमाणे अपिलार्थीस श्री. कोरबू यांनी दिलेली दिनांक २९-०२-२००८ च्या नोटीशीची प्रत दिनांक ०६-०६-२००८ रोजी प्राप्त झाली. तथापि उशीरा माहिती

प्राप्त झाल्याने व संबंधित अधिका-याला जन अपिलीय अधिकारी यांनी शास्ती न लावल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, त्रयस्थ पक्ष श्री. नानीक जोधवाणी हजर व जन अपिलीय अधिकारी आणि इतर पाच त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी श्री. कोरबू - जन माहिती अधिकारी यांचे सहाय्यक - यांनी उशिरा माहिती दिल्यामुळे त्यांच्या कोर्ट कामांचा खोळंबा झाला त्यामुळे श्री. कोरबू हे दंडास पात्र आहेत व त्याप्रमाणे आयोगाने श्री. कोरबू यांना दंड लावावा अशी मागणी आयोगासमोर केली.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस श्री. कोरबू यांनी दिलेल्या नोटिशीची त्यांना प्रत दिनांक ०६-०६-२००८ रोजी दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने दिनांक १०-०३-२००८ रोजी मागणी केलेल्या माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ प्रमाणे दिनांक ०९-०४-२००८ रोजी अगर तत्पूर्वी निर्णय घेणे भाग होते. त्याप्रमाणे त्यांनी दिनांक १०-०४-२००८ रोजी निर्णय घेतला परंतु तो अपिलार्थीस प्राप्त झाला नाही आणि त्यातील माहितीही अपूर्ण होती. तदनंतर श्री. कोरबू यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०६-०६-२००८ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ५७ दिवस इतक्या विलंबाने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व संबंधित कर्मचारी /सहायक यांना माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता, अपिलार्थीस ५७ दिवस इतक्या विलंबाने

माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचे सहायक श्री. कोरबू हे जबाबदार असल्याचे दिसून येते. श्री. कोरबू यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सहायक श्री. कोरबू, स्वच्छता निरीक्षक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे सहायक श्री. कोरबू स्वच्छता निरीक्षक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुरेश व्यंकटराव बुलबुले, २३/७२, कापड लाईन, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४०४

निर्णय दिनांक २४-०९-२००९

१ श्री. राजेंद्र सत्यनारायण कांबळे, : अपिलार्थी
भिमगड, देशमुखनगर, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपकुलसचिव, विशेष कक्ष, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. रावसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय, पाचपिंपळी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास कोणत्याही स्वरुपाची विशिष्ट विनंती केलेली नाही अथवा त्यांचे लेखी म्हणणे या अर्जासोबत वेगळया टिपणीव्दारे अथवा पत्राव्दारे जोडलेले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या विद्यापीठाअंतर्गत कार्यरत असलेल्या रावसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय, पाचपिंपळी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड या महाविद्यालयातील एकूण कर्मचा-यांची संख्या, त्यांचे पद, नेमणूक दिनांक, निवृत्ती दिनांक, त्यांच्या मूळ गावचा पूर्ण पत्ता, नियुक्तीचा प्रवर्ग, जन्मतारीख व जात, ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्राप्त अर्ज संबंधित महाविद्यालयाकडे त्यांच्या दिनांक ३०-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांच्याकडे दिनांक २९-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी परत अपिलार्थीचा अर्ज सह संचालक, विभागीय सह संचालक कार्यालय, नांदेड यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जाचे पुढे काय झाले हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. मात्र यानंतर व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावरुन अपिलार्थीची आयोगास केलेली विनंती स्पष्ट होत नाही. तसेच अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर आजपर्यंतच्या मधल्या काळात संबंधितांकडून त्यांना माहिती प्राप्त झाली किंवा कसे हेही आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. सबब आवश्यक त्या

कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे आणि सर्व संबंधितांच्या आजच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर आयोगास कोणताही निर्णय घेणे शक्य नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र सत्यनारायण कांबळे, (तालुका अध्यक्ष भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, तालुका बिलोली), भीमगड, देशमुखनगर, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, विशेष कक्ष, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४०५

निर्णय दिनांक २४-०९-२००९

१ श्री. नारायण कोंडीबा क्षिरसागर, : अपिलार्थी

ढोकी रोड,कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कळंब,

तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २६-०८-२००८ रोजीच्या निर्णयाप्रमाणे माहिती दिलेली नसून, दिलेली माहिती ही स्पष्ट बोध होणारी नाही, तसेच ही माहिती अपिलार्थीस तीस दिवसात आत मिळणे आवश्यक असतांना त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद करुन त्यांनी या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी उशीर केल्यामुळे दंड करण्याची व अपिलार्थीस या प्रकरणी नुकसानभरपाईपोटी १००० रुपये इतकी नुकसानभरपाई देण्याची आणि

खरी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दिनांक २८-०५-२००८ रोजी एम. एच. २५ एन. ११० क्रमांकाची ॲपे टॅक्सी जप्त केल्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मोटार व्हेईकल ॲक्ट कलम १२२/१७७ व १३०/१७७ च्या तरतुदीनुसार ॲपे जप्त करता येते का, पैशाची मागणी करता येते का व अपिलार्थीने दिनांक २८-०५-२००८ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०८-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यापूर्वी मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०८-२००८ रोजी प्रथमतः काही माहिती पुरविली होती व . निर्णयानंतर दिनांक ११-०९-२००८ रोजी काही माहिती पुरविली. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने त्यांना खोटी माहिती पुरविली आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कार्यवाही आदेशित करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दिनांक १४-०८-२००८ रोजी माहिती दिली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कळंब पोलीस स्टेशनकडून त्यांना प्राप्त झाली नाही. शेवटी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्यावेळी श्री. सुरवशे नावाचे पोलीस निरीक्षक सदर पोलीस स्टेशनचा पदभार साभांळत होते. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०८-२००८ व दिनांक ११-०९-२००८ रोजी पुरविलेली माहिती आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या एकूण तीन मुद्यापैकी मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या-कडून मूळात देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय ,स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारणे व अर्जदाराच्या अशा प्रश्नांना उत्तरे देणे वा यासंदर्भात आपले मत प्रदर्शित करणे अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे त्यांनी विचारलेली, त्यांच्या दिनांक २८-०५-२००८ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, ही माहिती ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

माहिती अधिकारी अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधीत देय असलेली माहिती, म्हणजे अपिलार्थीच्या दिनांक २८-०५-२००८ रोजी

प्राप्त झालेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी वेगवेगळ्या प्राधिकरणाशी या प्रकरणी संदर्भित केलेला पत्रव्यवहार, या प्रकरणाशी संबंधित त्यांच्याकडील अभिलेख्यावर वेगवेगळ्या अधिका-यांनी केलेल्या नोंदी आणि हे प्रकरण मा. न्यायालयात सादर करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी तयार केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती ही होय. अपिलार्थीने या अर्जामध्ये याच कागदपत्रांची मागणी केली आहे व ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती पुरविली आहे असा युक्तिवाद केला आहे. या युक्तिवादाच्या पृष्ठ्यर्थ अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, मोटार व्हेईकल ॲक्टमधील कलम १७७ खाली जन माहिती अधिकारी यांना मोटार वाहन जप्त करण्याचा अधिकार नसतांनाही या कलमाखाली त्यांनी अपिलार्थीचे वाहन जप्त केले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी माहिती पुरविली आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे वाहन मोटार व्हेईकल ॲक्टनुसार एकदा जप्त केल्यानंतर त्यावर कोणत्या कलमान्वये गुन्हा नोंदवावयाचा हा निर्णय संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या पातळीवर घ्यावयाचा आहे. अपिलार्थीस जर या कायदेशीर मुद्दयावर काही आक्षेप असतील तर त्यांनी हा मुद्दा सक्षम प्राधिकरणाकडे उपस्थित करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी या प्रकरणी कोणत्या कलमानुसार कारवाई करावी, हे आदेशित करण्याची अधिकारिता आयोगास नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध होती त्या स्वरुपात ती दिली आहे. त्यामुळे ती खोटी आहे असे म्हणता येणार नाही. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचा त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये व आयोगाकडे केलेल्या अर्जामध्ये उल्लेख केलेला आहे. आयोगास उपलब्ध

करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीस ही माहिती दिनांक १२-०७-२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे माहिती अधिकार अधिनियमानुसार क्रमप्राप्त होते. तथापि ही माहिती अपिलार्थीस दिनांक १४-०८-२००८ व दिनांक ११-०९-२००८ रोजी प्राप्त झाली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये स्पष्टीकरण दिले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक / कर्मचारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे, हे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधीत त्यांचे सहायक हे सर्वजण अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी एकत्रितपणे जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. सबब जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले या प्रकरणाशी संबंधीत त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-

विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नारायण कोंडीबा क्षिरसागर, ढोकी रोड,कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४०६

निर्णय दिनांक २४-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गोरख सोपान गायकवाड,<br>रा. शिंगोली, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांनी २३ दिवसांनी त्यांना परत केला. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीसाठीची कारणे स्पष्ट करण्याची आवश्यकता नसतांना त्यांना माहितीसाठीची कारणे विचारण्यात आली. त्यांना चुकीची व अपूर्ण माहिती अतिविलंबाने देण्यात आल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या पध्दतीविषयी अनेक तक्रारी केल्या आहेत तथापि

त्यांचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी संबंध नसल्याने त्या विचारात घेण्यात येत नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. मोरे, परिचर, डॉ. मगर, डॉ. गाल्टे, श्री. अनसिंगकर, परिचर यांच्या प्रतिनियुक्तीच्या आदेशाच्या प्रती, डॉ. मगर, श्री. मोरे, परिचर किती वर्षापासून पशूसंवर्धन विभागात काम करत आहेत, या मुद्दयांची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीकडे माहिती मागण्याच्या प्रयोजनाची विचारणा केली. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०८-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे सूचित केले. सुनावणीमध्ये दिलेल्या सूचनेनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०८-२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांच्या म्हणण्याशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ११-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहितीचे कारण विचारल्याची चूक आयोगासमोर कबूल केली व आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०८-२००८ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे संपूर्ण उपलब्ध माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे अपिलार्थीच्या दिनांक १९-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०७-२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविणे त्यांना अनिवार्य होते. तथापि असे करण्याऐवजी त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती कोणत्या प्रयोजनासाठी हवी आहे याचा उल्लेख न केल्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे परत पाठविला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेली ही कृती सर्वथा गैर व चूकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (२) नुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना माहितीचे प्रयोजन त्यामध्ये नमूद करणे अर्जदारास आवश्यक नाही या साध्या तरतुदीची देखील जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी होऊन तीन वर्षाचा कालावधी होऊन त्याची माहिती नसावी याचे आयोगास सखेद आश्चर्य वाटते. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती पुरविल्याचे निश्चितपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दिल्याचे आढळून येत आहे. तसेच ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचेही दिसून येत

आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील डॉ. मगर व श्री. मोरे, परिचर हे त्यांच्या कार्यालयामध्ये कोणत्या तारखेपासून कार्यरत आहेत याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या माहितीमध्ये दिली नसल्याचे दिसून येत आहे. तेव्हा या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रत्येक अर्जावर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे इत:पर कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्रयस्थ पक्ष डॉ. मगर व श्री. मोरे, परिचर यांच्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोरख सोपान गायकवाड, रा. शिंगोली, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४०७
निर्णय दिनांकः २४-०९-२००९

१. श्री. ननवरे पी.एस. : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
जन अपिलीय अधिकारी : मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
त्रयस्थ पक्षः श्री. काझी एम.ए.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती न दिल्यामुळे,त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माजी शिक्षण विस्तार अधिकारी (ऊर्दू) श्री. काझी एम.ए. सईद, जिल्हा

परिषद,उस्मानाबाद यांच्या गैरकारभाराची चौकशी करण्याबाबत नेमलेल्या चौकशी समितीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या चौकशी अहवालाची सत्यप्रत मागितली होती. या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि.१७.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि चौकशी समितीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करेपर्यंत त्यांना प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेला चौकशी अहवाल दि. २७.०२.२००९ रोजी प्राप्त झाला व तदनंतर त्यांनी अपिलार्थीस दि. ०५.०३.२००९ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य पुरविली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन आणि अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचसही जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेली आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. १४०७/०८, दि.३०.०९.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ननवरे पी.एस.'योगेश निवास' बी.फॉर्मसी कॉलेजजवळ,बार्शी रोड,उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४०८
निर्णय दिनांकः २४-०९-२००९

१. श्री. नकुल देवराव गजरमल, : अपिलार्थी
रा.चिंचपूर खु.,ता.परंडा,जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत चिंचपूर (खु.),ता.परंडा,
जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,परंडा,
जि.उस्मानाबाद.

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, परंडा,जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपर्यंत माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१९.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००५-०६, २००६-०७ व २००७-०८ या

कालावधीत उपलब्ध झालेला निधी, यशवंत ग्राम समृध्दी योजना, दलीतवस्ती सुधार योजना व बारावा वित्त आयोग याकरिता प्राप्त झालेला निधी, यातील कामांची मूल्यांकने व अंदाजपत्रके, ही माहिती मागितली होती.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी ही माहिती दि. ०२.०३.२००९ रोजी दिली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याबद्दल अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दि. ०२.०३.२००९ रोजीच्या पत्राची प्रत त्यांनी आयोगास सादर केली असून या पत्रामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०२.०३.२००९ रोजी खरी व बरोबर माहिती मिळाल्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीचे हे कबूलीपत्र पाहता, अपिलार्थीचा आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करण्याचा हेतू सफल झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. १४०८/०८, दि.१५.०९.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१.	श्री. नकूल देवराव गजरमल, मु. चिंचपूर (खु.), पो. वाटेफळ, ता.परंडा, जि.उस्मानाबाद.

२.	जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिंचपूर (खु.), ता. परंडा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, परंडा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४०९
निर्णय दिनांक: २४-०९-२००९

१. श्री. किरण माणिकराव यादव, : अपिलार्थी
रा.आराधवाडी, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कर्यालय, गुजनूर, ता.तुळजापूर,
जि.उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज परत आला. जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही व या प्रकरणातील सर्व संबंधितांनी माहिती अधिकार अधिनियमाची पायमल्ली केली असल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या ग्रामपंचायती अंतर्गत सन २०००-२००८ या कालावधीमध्ये झालेल्या विकास कामांसंदर्भात एकूण १६ मुद्यांद्वारे व्यापक व्याप्ती असलेली माहिती मागितली होती.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०४.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भातील निर्णय अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेला नाही त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.०७.२००८ रोजीच्या अपील अर्जावर निर्णय दिला किंवा कसे, याबाबत आयोगास कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही. अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे दि. १३.०८.२००८ रोजी द्वितीय अपील सादर केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली आहे किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे आवश्यक त्या कागदपत्रांच्या आणि अपिलार्थीच्या उपस्थितीअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव, मु.पो. आराधवाडी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत गुजनूर,ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,पंचायत समिती, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४१०
निर्णय दिनांक: २४-०९-२००९

१. श्री. किरण माणिकराव यादव, : अपिलार्थी
रा.आराधवाडी, ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अध्यक्ष/सचिव,
ग्रामीण पाणी पुरवठा योजना,
ग्रामपंचायत, नांदूरी,ता.तुळजापूर,
जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद ग्रामिण पाणीपुरवठा उपविभाग,
तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०९.२००८रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाची संबंधितांनी दखल घेतली नाही व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व माहिती अधिकार कायद्याची पायमल्ली केल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.०४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे अध्यक्ष/सचिव,

ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत कार्यालय,नांदुरी,ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांच्याकडे भारत निर्माण योजनेअंतर्गत त्यांच्या गावामध्ये चालू असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामाची सन २००६ ते दि. ०४.०७.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण १० मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधितांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, तुळजापूर यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.०९.२००८ रोजी आदेश पारित करुन पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष, यांच्यावर योग्य कारवाई होणे उचित राहिल, असे आदेशित केले. त्यांनी हे आदेश कोणास उद्देशून केले आहेत, याचा त्यांच्या अपील निर्णयावरुन बोध होत नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी या निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही निर्देश कोणालाही दिल्याचे दिसून येत नाही. तथापि यानंतर अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत कार्यालय, नांदुरी, ता. तुळजापूर,जि.उस्मानाबाद व अपिलीय अधिकारी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत कार्यालय, नांदुरी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून केलेले आहे व ज्यावेळी त्यांनी ही माहिती पाहिली, त्यावेळी "आता मला लेखी माहितीची गरज नाही व माहितीने समाधान झाले आहे " असे त्यांच्याजवळ कबूल केले. तथापि आयोगाची त्यांच्या द्वितीय अपील

प्रकरणातील सुनावणीची नोटीस त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीकडे त्यांच्या विसंगतीपूर्ण वर्तनाचा खुलासा विचारला असता, अपिलार्थीने आयोगाकडे केलेला द्वितीय अपील अर्ज कसा केला हे त्यांना ठाऊक नसल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सांगितले.

अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत कार्यालय,नांदुरी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांनी वरीलप्रमाणे केलेल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ त्यांच्याकडे एखादा पुरावा उपलब्ध आहे काय याची विचारणा केली असता, त्यांच्याकडे अशाप्रकारचा कोणताही पुरावा नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले व त्याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत, असेही त्यांनी आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत कार्यालय, नांदुरी, यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यांचे अवलोकन करता अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत कार्यालय, नांदुरी, यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये संबंधित अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत कार्यालय, नांदुरी, यांच्यावर आयोगाने शास्ती आदेशित करावी अशी आयोगाकडे विनंती केली आहे. या मुद्यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या योजनेविषयी माहिती मागितली आहे त्या योजनेअंतर्गत चालू असलेल्या योजनांचे स्वरुप शासनातर्फे वेळोवेळी पार पाडण्यात येणाऱ्या योजनांपेक्षा वेगळे आहे. या योजनेमध्ये संबंधित ग्रामस्थांनी लोकवर्गणी गोळा करुन शासनाच्या सहाय्याने ही योजना स्वत: पार पाडावयाची आहे. याकरिता ग्रामस्थांनी त्यांच्या गावाकरिता ग्रामस्थांमधून निवडलेल्या काही ग्रामस्थांच्या समितीमार्फत या योजनेचे

बांधकामाचे नियोजन व अंमलबजावणी करावयाची आहे. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्या समितीकडे उपलब्ध आहे. समितीचे सर्व सदस्य या खाजगी व्यक्ति आहेत. ते या प्रकरणाशी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्मचारी नाहीत. अशा समितीच्या खाजगी सदस्यांवर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई आदेशित करणे हे आयोगाच्या अधिकारीतेच्या बाहेरचे आहे, त्यामुळे अपिलार्थीची ही विनंती आयोगास मान्य करता येणार नाही. परंतु या प्रकरणाशी संबंधित पाणी पुरवठा समितीच्या अध्यक्षांनी त्यांच्या मागील पृष्ठावरील युक्तिवादामध्ये अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत कार्यालय,नांदुरी, ता. तुळजापूर, जि.उस्मानााबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव, रा.आराधवाडी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. अध्यक्ष,ग्रामीण पाणी पुरवठा योजना,ग्रामपंचायत, नांदूरी, ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,जिल्हा परिषद ग्रामिण पाणीपुरवठा उपविभाग, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४११
निर्णय दिनांकः २४-०९-२००९

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, : अपिलार्थी
रा.टेंभुर्णी, ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळीच माहिती उपलब्ध न करुन देऊन कर्तव्यात कसूर केला असल्यामुळे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे दंड लावण्यात यावा व रु.२०००/- शास्ती लावण्यात यावी व खातेनिहाय चौकशी करुन सदरील अधिकाऱ्याविरुध्द गोपनीय अहवाल वरिष्ठांना पाठवावा व दंडाची रक्कम अपिलार्थीच्या खर्चापोटी अपिलार्थीस देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०५.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मौ. टेंभुर्णी, ता. अहमदपूर येथील दलीत वस्तीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या विभागाकडून केल्या गेलेल्या सिमेंट खडी रस्त्याच्या बांधकामाबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीशी संबंधित कालावधी माहे जानेवारी २००७ ते मार्च २००८ असा होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, या अर्जातील तीनही मुद्यांद्वारे अपिलार्थीने बहुतांश मोघम स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्याचे दिसून येते. यापैकी अपिलार्थीस सदरील रस्त्याच्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर चौकशी होऊन सादर केलेल्या अहवालाची प्रत, ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासंबंधी जिल्हा परिषदेकडे पाठविलेला प्रस्ताव व जिल्हा परिषदेकडून त्यांना प्राप्त झालेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत एवढयाच मुद्यावरील माहिती देय असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०५.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि.२६.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.०८.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०२.०५.२००८ रोजी त्यांच्याकडील संपूर्ण उपलब्ध माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस

माहिती पुरविण्याच्या जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीमध्ये आवश्यक तो पुरावा सादर न केल्याचे नमूद करुन निर्णय दिला होता. यावर उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी ते मुख्यालयी उपस्थित नव्हते. त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना जन अपिलीय अधिकारी यांना पुरावा दाखविता न आल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी तसे आदेश दिले आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांच्या अर्जाच्यासंदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करण्याकरिता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अर्जदाराने स्वतः उपस्थित राहून व्यक्तिशः माहिती हस्तगत करणे अधिनियमाद्वारे अभिप्रेत असून, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने त्यांनी अशाप्रकारे कार्यवाही करणे हे त्यांचे उत्तरदायित्त्व आहे. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०२.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली आहे व यासंदर्भातील आवश्यक तो पुरावा देखील सादर केला आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर विविध प्रकारच्या भ्रष्टाचाराचे आरोप कोणत्याही पुराव्याशिवाय केले असून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सत्य माहिती अपेक्षित असल्याचे त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही असत्य कशी आहे, या मुद्यावर त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये कोणतेही भाष्य केलेले नाही अथवा यासंदर्भात युक्तिवाद करण्यासाठी ते आयोगासमोर आज उपस्थित नाहीत. अपिलार्थीस वेळेत

माहिती उपलब्ध होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात त्यांना स्वतः उपस्थित होणे गरजेचे होते. परंतु ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडला नाही, हे पाहता, आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, अध्यक्ष पुनर्वसन समिती, मु. टेंभुर्णी पो.ता.अहमदपूर, जि. लातूर-४१३ ५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४१२
निर्णय दिनांक: २४-०९-२००९

१. श्री. विलास समर्थराव कदम, : अपिलार्थी
रा.मुखेड,ता.मुखेड,जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, एकलारा, ता.मुखेड,
जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मुखेड,
जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०६.२००८रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.१८.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामाच्या संदर्भात सन २००४-२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि ही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने

अपिलार्थीने  अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.११.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी दि. ०५.०९.२००९ रोजी अपिलार्थीस दिली असून अपिलार्थीने ही माहिती मिळाल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील मागे घेतले आहे व तसे अभिप्राय त्यांच्या दि. ०५.०९.२००९ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्रावर अपिलार्थीने नमूद केले आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या म्हणण्यापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दि. ५.०९.२००९ रोजीचे पत्र व त्यावरील अपिलार्थीचे अभिप्राय आयोगास अवलोकनास्तव सादर केले असून, जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीने या पत्रावर त्यांचे अभिप्राय लिहिले आहेत. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे देखील आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद मान्य करण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. १४१२/०८, दि.१९.०६.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कदम विलास समर्थराव, तगलाईन गल्ली, झेंडा चौक, मुखेड,ता.मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत एकलारा,ता.मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३३१
निर्णय दिनांक २४/०९/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.दिलीप आत्माराम पाटील,<br>रा.खलाणे, ता.शिंदखेडा, जि.धुळे. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मॅनेजर,<br>धनदाई ग्रामिण बिगर शेती पतसंस्था, खलाणे,<br>ता.शिंदखेडा, जि.धुळे. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिंदखेडा,<br>ता.शिंदखेडा, जि.धुळे. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०७.२००८ रोजी नोंदविलेले अपील आज दिनांक २४.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक २२.१२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा मॅनेजर, धनदाई ग्रामिण बिगर शेती पतसंस्था, खलाणे, ता.शिंदखेडा, जि.धुळे यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिंदखेडा, जि.धुळे यांचेकडे दिनांक २६.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिंदखेडा, जि.धुळे यांनी दि. २३.०५.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. आपल्या या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अमान्य केल्याने व्यथित

होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १३३१ /०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीप आत्माराम पाटील, रा.खलाणे, ता.शिंदखेडा, जि.धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा मॅनेजर, धनदाई बिगर शेती पतसंस्था, खलाणे, ता.शिंदेखेडा, जि.धुळे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३३२
निर्णय दिनांक २४/०९/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | श्री. रविंद्र नारायण सोनार,<br>मु.पो.वरणगांव, पोस्ट ऑफिसजवळ,<br>ता.भुसावळ, जि.जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>चेअरमन / व्यवस्थापक/प्रशासक,<br>धनवर्धीनी ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था<br>मर्या. वरणगांव, ता.भुसावळ, जि.जळगांव | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जळगांव | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २४.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक ३०.०५.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा चेअरमन /व्यवस्थापक /प्रशासक, धनवर्धीनी ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. वरणगांव, ता. भुसावळ, जि.जळगांव यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २८.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांनी दि. ०४.०८.२००८

रोजी  आपले आदेश पारित केले व जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक यांना ८ दिवसात योग्य ती उचीत कार्यवाही करण्याचे आदेश दिले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.  १३३२/०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.रविंद्र नारायण सोनार, मु.पो.वरणगांव, पोस्ट ऑफिसजवळ, ता.भुसावळ, जि.जळगांव

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, धनवर्धीनी ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., वरणगांव, ता.भुसावळ, जि.जळगांव

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३३३
निर्णय दिनांक २४/०९/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.ख्यालीलाल पुनमचंद सालवी,<br>इंद्रलक्ष्मी, ब्लॉक नं-३, कस्तुरीनगर, भुसावळ,<br>ता.भुसावळ, जि.जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>चेअरमन,<br>कुबेर अर्बन को-ऑप.केडिट सोसायटी लि.<br>भुसावळ, ता.भुसावळ, जि.जळगांव | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहाय्यक निबंधक,<br>सहकारी संस्था, भुसावळ, जि.जळगांव | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०७.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २४.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक २०.११.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, कुबेर अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि. भुसावळ, जि.जळगांव यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ, जि.जळगांव यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ, जि.जळगांव यांनी प्रथमतः त्यांच्या

दि. ०२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस, त्यांनी मागितलेली माहिती संस्थास्तरावरील असल्याने ती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसून, सदर माहिती संबंधित संस्थेकडून उपलब्ध करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित करुन त्यांचा अर्ज निकाली काढत असल्याचे त्यांना कळविले. तद्नंतर दि.१५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित पतसंस्थेस अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना त्वरित पुरविण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकाऱ्यांच्या या प्रतिसादाने व माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १३३३/०८ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.ख्यालीलाल पुनमचंद सालवी, इंद्रलक्ष्मी, ब्लॉक नं.३, कस्तुरीनगर, भुसावळ, ता.भुसावळ, जि.जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, कुबेर अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. भुसावळ, ता.भुसावळ, जि.जळगांव

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ, ता.भुसावळ, जि.जळगांव

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३३८

निर्णय दिनांक : २४.०९.२००९

१. सौ. सुमन अशोक भुसारी : अपिलार्थी
मु.पो. सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, नगर, ता.जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सह निबंधक,
सहकारी संस्था, नाशिक

त्रयस्थ पक्ष : रावसाहेब पटवर्धन नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १४.०३.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २४.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक ०६.०१.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांचेकडे त्रयस्थ पक्षासंदर्भात एकूण चार मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीचा हा अर्ज, उपनिबंधक, सहकारी संस्था, नगर तालुका, अहमदनगर यांनी त्यांच्या दि. २३.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे पाठविला व या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित केली. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी त्यांच्या दि. २५.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित संस्थेसंदर्भात

असल्याने त्या संस्थेच्या जन माहिती अधिकाऱ्याकडे अपिलार्थीचा अर्ज पाठवून अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित करुन त्यांना संबंधित संस्थेच्या जन माहिती अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. त्रयस्थ पक्ष, रावसाहेब पटवर्धन नागरी सहकारी पतसंस्थेच्या मॅनेजर यांनी त्यांच्या वकिलामार्फत केलेला लेखी युक्तिवाद आयोगास सादर करण्यात आला असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा त्यांच्या पतसंस्थेस लागू होत नाही. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ५६६६/२००७ मध्ये माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी नोंदणीकृत पतसंस्थेस लागू होत नसल्याची भूमिका घेतलेली आहे. या बाबी पाहता, अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात यावे.

वरील घटनाक्रम, त्रयस्थ पक्षाचा लेखी युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणासंदर्भात उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधीच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्र. ५६६६ /०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को.ऑप.बॅक. अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि. १३.०१.२००९ निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी

बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तिय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम -२००५ आता उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्ताऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल. तसेच अपिलार्थीने या प्रकरणी दि. ०३.०४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपिलापासून जास्तीत जास्त १२० दिवसात व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असतांना ते दि. ०४.०३.२००८ रोजी, म्हणजे अनुज्ञेय कालावधीनंतर साधारणतः सात महिने इतक्या विलंबाने दाखल केले असल्याने ते मुदतबाह्य ठरत आहे. या बाबी पाहता, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १३३८/०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ.सुमन अशोक भुसारी, मु.पो.सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, नगर, ता.जि.अहमदनगर
३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नाशिक

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३३९
निर्णय दिनांक २४/०९/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रावसाहेब बाबु फुलमाळी,<br>मु.पो.सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, नेवासा, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०५.०४.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक २४.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक १८.०६.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण सहा मुद्यांव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७८/- इतक्या रकमेचा भरणा करण्याचे कळविले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे दि. ०८.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. जिल्हा उपनिबंधक यांनी दि. ११.१०.२००७ रोजी या अपील अर्जावर निर्णय घेऊन अपिलार्थीचे प्रथम अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस सशुल्क

माहिती घेण्याचे सूचित केले. अपिलार्थीने माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक माहिती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोष्टाद्वारे पुरविली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर माहितीपोटीचे शुल्क भरुनही माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद करुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दि. २७.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असणाऱ्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७८/- भरणा करण्याचे सूचित केले होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपिलावरील आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांना दि. ०५.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे रजिस्टर्ड पोष्टाने माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. १८.०६.२००७ रोजीच्या प्रथम अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजेच, दि. २७.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले होते. तथापि सदर शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. ११.१०.२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीने माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर, त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पुरविली आहे. यासंदर्भातील आवश्यक तो पुरावा,

रजिस्टर्ड पोष्टाची पावती, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०५.११.२००७ रोजी माहिती पुरविल्याचा त्यांचा युक्तिवाद, अपिलार्थी या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी उपस्थित नसल्याने, ग्राह्य धरण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविल्याचे सिध्द झाल्याने, तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर आदेश दिल्यानंतर ९० दिवसांच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असतांना, त्यांनी विचाराधीन व्दितीय अपील २ महिने २५ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले असल्याने, ते फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.रावसाहेब बाबु फुलमाळी, मु.पो.सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, नेवासा, जि.अहमदनगर
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १४२६/२००८, १४२७/२००८ व १४२८/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४२६, १४२७, १४२८

निर्णय दिनांक २५-०९-२००९

१ श्री. मो. मोईज खान पठाण, : अपिलार्थी
व्दारा - राम संगनवार, "ओम निवास " प्र. नि. हा. शाळे-
जवळ, कैलासनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड
जन अपिलीय अधिकारी : प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०७-२००८ रोजी नोंदविलेली तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांची जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करुन त्यांना माहिती देण्यासाठी नाकारल्याने त्यांनी विचाराधीन तीनही अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या तीन स्वतंत्र मूळ अर्जाव्दारे

जन माहिती अधिकारी यांच्याकडे (१) शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या प्रदुषण चाचणीच्या संदर्भात नांदेड शहरात सन २००० ते २००७ मध्ये झालेल्या प्रदुषण चाचणीची माहिती (२) ट्रॅव्हल्स व टॅक्सी यांना देण्यात येणारे वेगवेगळे परवाने व लागू असलेल्या नियमावलीची सत्यप्रत, (३) ऑल इंडिया परमिट परवानाधारक ट्रॅव्हल्स मालक व कंपनी यांना ठराविक ठिकाणी दररोज ट्रॅव्हल्स चालविण्याची परवानगी आहे काय ? असल्यास सत्यप्रतीसह माहिती अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या तीनही अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या अपील क्रमांक १४२६/२००८ शी संबंधीत प्रथम अर्जाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीबाबत," संबंधित विषय महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अखत्यारीतील आहे व अभिलेख्याची पाहणी सशुल्क करता येईल", असे उत्तर दिले. अपिलार्थीच्या व्दितीय अपील क्रमांक १४२७/२००८ व १४२८/२००८ च्या संदर्भातील प्रथम अर्जांच्या संदर्भात याच दिवशी अपिलार्थीस "मोटार वाहन कायदा १९८८ व तदअनुषंगिक नियम यांचे अवलोकन करावे व कार्यालयीन अभिलेख्याची तपासणी सशुल्क करता येईल", असे उत्तर दिले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तरांनी समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०३-२००८ रोजी तीन स्वतंत्र प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०४-२००८ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीची तीनही अपिले निकाली काढली. या तीनही अपील निकालात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने ठराविक स्वरुपाच्या माहितीची मागणी केल्यास अपिलार्थीस माहिती देण्यात यावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २५-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील क्रमांक १४२६/२००८ च्या संदर्भातील प्रथम अर्जाव्दारे त्यांच्याकडे नांदेड शहरात झालेल्या प्रदुषण चाचणीची माहिती मागितली होती. तथापि अशा प्रकारच्या चाचण्या प्रादेशिक परविहन कार्यालय घेत नसल्यामुळे ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. परंतु अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये प्रदुषण चाचणी घेऊन नोंदणी केलेल्या वाहनांची संख्या त्यांना अपिलार्थीस पुरविता येणे शक्य आहे. अपिलार्थीच्या अपील क्रमांक १४२७/२००८ व १४२८/२००८ च्या संदर्भात असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या अर्जांव्दारे सर्वसाधारण स्वरुपाच्या माहितीची मागणी केली आहे. त्यांनी कोठल्याही एका विशिष्ट वाहनाच्या संदर्भात माहिती मागितली नाही. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे ट्रॉव्हल टॅक्सी व ऑल इंडिया परमिट करिता मोटार व्हेईकल ॲक्टमध्ये काही तरतुदी केल्या आहेत या तरतुदींची प्रत अपिलार्थीस त्यांना पुरविता येणे शक्य आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या तीनही अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिलेला आहे. तथापि हा प्रतिसाद अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्याच्या दृष्टीने आवश्यक तेवढा सकारात्मक नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थीच्या प्रथम अर्जासंदर्भात आवश्यक ती माहिती

अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही विशिष्ट स्वरुपाची मागणी केलेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेली माहिती दिल्यास अपिलार्थीचा कार्यभाग साध्य होऊ शकेल असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेली तीनही व्दितीय अपिले (अपील क्रमांक १४२६/२००८, १४२७/२००८ व १४२८/२००८) अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १४२६/२००८, १४२७/२००८ व १४२८/२००८ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मो. मोईज खान पठाण, व्दारा - राम संगनवार, "ओम निवास " प्र. नि. हा. शाळे जवळ, कैलासनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४२९

निर्णय दिनांक २५-०९-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, : अपिलार्थी
रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, नीति निकेतन माध्यमिक व उच्च
माध्यमिक विद्यालय, जांब बु., तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००८ रोजी अर्ज केल्यानंतर त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता त्यांनी दिनांक २६-०३-२००८ रोजी सुनावणी घेऊनही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नावांची यादी, त्यांचा नेमणूक दिनांक, त्यांच्या नियुक्तीसाठी वृत्तपत्रामध्ये दिलेल्या जाहिरातीच्या प्रती इत्यादी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय स्थापन झाल्यापासून ते दिनांक ३१ डिसेंबर २००७ या कालावधीशी संबंधित होती. अपिलार्थीने ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क टपालाखर्चासह रुपये ३२६७ इतके अपिलार्थीस भरणा करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता जन माहिती अधिकारी यांच्याकडे या शुल्काचा तपशील त्यांच्याकडील दिनांक २८-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे मागितला. सदर तपशील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २०-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०३-२००८ रोजी सुनावणी ठेवल्याचे पत्र आयोगास अपिलार्थीतर्फे उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणता निर्णय दिला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थी यांच्या मते जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना व्यापक जनहित साध्य करण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण घटनाक्रम त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगास अवगत केला व त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्याचा पुनरुच्चार केला.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे प्रतिसाद दिला आहे. तथापि अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस कळवितांना जन माहिती अधिकारी यांनी या शुल्काचा तपशील त्यांना न कळवून अधिनियमातील कलम ७ (३) (क) मधील तरतुदीचा भंग केल्याचे, या प्रकरणाचे अवलोकन केले असता दिसून येते. अधिनियमातील कलम ७ (३) (क) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळवितांना जो तपशील अपिलार्थीस देणे, त्यांना अनिवार्य आहे तो तपशील उदा. संभावित पृष्ठांची संख्या, माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर, शुल्काचा भरणा कोठे व कशा पध्दतीने करावा याची कोणीतीही कल्पना त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस दिली नाही. त्यामुळे आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक ०३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नीति निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जांब बु., तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४३०

निर्णय दिनांक २५-०९-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, अपिलार्थी
रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, महात्मा कबीर प्राथमिक शाळा,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, पंकज एज्युकेशन सोसायटी,
मार्फत महात्मा कबीर प्राथमिक शाळा, सहयोगनगर,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

वरील अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने जन माहिती अधिका-यास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २२-०६-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिनांक २२-

०६-२००९ रोजी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असल्याचे कबूल यासंदर्भात त्यांची कोणतही तक्रार किंवा आक्षेप राहिला नसल्याचे नमूद केले आहे. या पत्राव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांचे अपील निकाली काढण्याची विनंती केली आहे. अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याने त्यांचे समाधान झाले आहे व आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १४३०/२००८, दिनांक १२-०३-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०९-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा कबीर प्राथमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, पंकज एज्युकेशन सोसायटी, मार्फत महात्मा कबीर प्राथमिक शाळा, सहयोगनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४३१

निर्णय दिनांक २५-०९-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, : अपिलार्थी
रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, हकीम अजमल खॉ उर्दू प्राथमिक
शाळा, रहेमतनगर, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, अल अजीम एज्युकेशन कल्चरल
ॲण्ड वेल्फेअर सोसायटी मार्फत हकीम अजमल खॉ
उर्दू प्राथमिक शाळा, रहेमतनगर, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मुख्याध्यापक, हकीम अजमल खॉ उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतदीनुसार दिनांक ०१-१२-२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत महिती न दिल्याने त्यांनी सचिव, अल अजीम एज्युकेशन कल्चरल ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, नांदेड

यांच्याकडे दिनांक १७-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले असता प्रथम अपिलावर सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मुख्याध्यापक, हकीम अजमल खॉ उर्दू प्राथमिक शाळा, रहेमतनगर, नांदेड यांच्याकडे त्यांच्या शाळेच्या संदर्भात, शैक्षणिक वर्षे २००० ते २००७ या कालावधीशी संबंधित, विस्तृत प्रमाणात माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सचिव, अल अजीम एज्युकेशन कल्चरल ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, नांदेड यांच्याकडे दिनांक १८-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीचा मूळ अर्ज व अपील अर्ज अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केल्याचा कोणताही पुरावा त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये सादर केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज संबधितांकडे प्राप्त झाला किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. याहीपेक्षा दुसरी महत्वाची बाब अशी आहे की, शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे सर्व

शिक्षण संस्थांच्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी म्हणून संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी यांना नेमले आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थी यांचा कथित दिनांक १८-०१-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज संस्थेच्या सचिवाकडे म्हणजेच चुकीच्या प्राधिकरणाकडे केल्याचे दिसून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस, त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर त्यांना माहिती मिळाली किंवा कसे हे आयोगास सर्व संबधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्राणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हकीम अजमल खॉ उर्दू प्राथमिक शाळा, रहेमतनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, अल अजीम एज्युकेशन कल्चरल ॲण्ड वेल्फेअर सोसायटी मार्फत हकीम अजमल खॉ उर्दू प्राथमिक शाळा, रहेमतनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १४३२/०८ व १४३३/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४३२ व १४३३
निर्णय दिनांक २५-०९-२००९

१ श्री.सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

अपील क्र.१४३२/०८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (प्राथ.),<br>जिल्हा परिषद, नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथ.),<br>जिल्हा परिषद, नांदेड | :प्रतिवादी |

अपील क्र.१४३३/०८

| | | | |
|---|---|---|---|
| २ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (माध्य.),<br>जिल्हा परिषद, नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्य.),<br>जिल्हा परिषद, नांदेड | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.९.०५.२००८ रोजी नोंदविलेली एकूण दोन स्वतंत्र द्वितीय अपिले, क्र. १४३२/०८ व १४३३/०८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्र. १४३२/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०१.१२.२००७ रोजी माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १०.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे मुख्याध्यापक, हकीम अजमल खॉ.उर्दू प्राथमिक शाळा,रहेमतनगर नांदेड यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याबाबत लेखी कळविले असता, आजपर्यंत संबंधित मुख्याध्यापक यांनी त्यांना कोणतीही

माहिती दिली नाही, त्यामुळे अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद,नांदेड यांच्याकडे दि. ०८.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रकरणाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या नियंत्रणाखालील हकीम अजमल खॉ.उर्दू प्राथमिक शाळा, रहेमतनगर,नांदेड यांच्या संदर्भात माहिती मागितली होती. तथापि ही माहिती उपशिक्षणाधिकारी यांच्या ताब्यात नसल्यामुळे त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दि. १०.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये शाळेच्या मुख्याध्यापकांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. परंतु अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,नांदेड यांच्याकडे दि. ०८.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०२.२००८ रोजी सुनावणी ठेवली असता, सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी हेच हजर नसल्यामुळे, या प्रकरणाची सुनावणी होऊ शकली नाही व त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त होऊ शकला नाही. त्यांनी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना दि. १८.०२.२००८ रोजी दिलेले पत्र, आयोगास पुरावा म्हणून सादर केले आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती पाहता, या टप्प्यावर अपिलार्थीच्या दि. ०८.०१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे योग्य राहील, असे आयोगास वाटते.

**<u>अपील क्र.१४३३/०८:</u>**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे माहितीसाठी अर्ज दाखल केला असता, जन माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आत माहिती न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक ), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपिलेट अधिकारी यांनी दि. ०७.०२.२००८ रोजी सुनावणी ठेवून अपिलार्थीस बोलावले असता, अपिलाची सुनावणी न घेता, प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.नांदेड यांच्याकडे त्यांच्या नियंत्रणाखालील नोबल उर्दू हायस्कुल,मुखेड या शाळेविषयी काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली, हे कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे व जन माहिती अधिकारी यांच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. परंतु अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,नांदेड यांच्याकडे दि. ०८.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय प्राप्त न

झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती पाहता, या टप्प्यावर अपिलार्थीच्या दि. ०८.०१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक ), जिल्हा परिषद, नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे योग्य राहील, असे आयोगास वाटते.

सबब अपील क्र. १४३२/०८ व १४३३/०८ शी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०१.२००८ रोजीच्या त्यांच्याशी संबंधित प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या उपरोक्त दोनही अपिलांसंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.१४३२/०८ व १४३३/०८ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त दोन द्वितीय अपील प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीच्या दि.०८.०१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा.समिराबाग,खडकपुराच्या पाठीमागे,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६२४
निर्णय दिनांक २५-०९-२००९

१ श्री. सय्यद याकूब सय्यद मसूद , : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
फातेमा गर्ल्स हायस्कूल, कैसर कॉलनी,औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

त्रयस्थ पक्ष : सौ. नाशिद फरझाना स. याकूब

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०७.२००८ रोजी अपील दाखल केले असतानाही अद्यापपावेतो अपिलार्थीच्या अपिलावर त्यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती नाहिद फरझाना स. याकूब यांच्या माहे फेब्रु, मार्च, एप्रिल

व मे २००८ या महिन्याचे पगारपत्रक व ऑगस्ट,२००७ चे २०% वेतन प्रमाणपत्राच्या प्रती मागितल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित कार्यालयाकडे सादर केल्याने अपिलार्थीस संबंधित कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. तथापि अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दि. ०२.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०८.२००८ व दि. २५.०८.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी यासंदर्भात दिलेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये आढळून येत नाही. अपिलार्थी यांच्या मते जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय त्यांच्या प्रथम अपिलाच्या संदर्भात न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. २५.०९.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास प्राप्त झाले असून अपिलार्थी काही कामासाठी बाहेरगावी असल्यामुळे ते आजच्या सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही, त्यामुळे आजच्या सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याची त्यांनी आयोगास या पत्रामध्ये विनंती केली आहे. अपिलार्थीची ही विनंती अमान्य करण्यात येत असून आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आजची सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी आता, अपिलार्थीकडून रु.२००/- इतके शुल्क आकारुन दि. १४.११.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. ०२.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०६.०८.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीच्या विनंतीनुसार दि. २५.०८.२००८ रोजी परत दुसरी सुनावणी ठेवण्यात आली. तथापि या सुनावणीमध्ये निश्चितपणे कोणता निर्णय झाला, यासंदर्भातील कागदपत्रे त्यांच्या अभिलेख्यावर उपलब्ध नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजेच, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याच्या दृष्टीने सकारात्मक आहे, असे मानता येणार नाही. वास्तविक पाहता, शाळेतील सर्व शिक्षकांच्या पगारपत्रकाच्या प्रतींची स्थळप्रत शाळेकडे उपलब्ध असताना देखील हे अभिलेखे जिल्हा परिषदेकडील वेतन पडताळणी पथकाकडे पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले.जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस अशाप्रकारे कळविण्याची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. यापेक्षा दुसरे असे महत्त्वाचे आहे की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जास त्यांच्या दि. ०५.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे कळविले. अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी ही कृती केली आहे. यानंतर दि.१२.११.२००८ रोजी अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दि. १४.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी आयोगास असे अवगत केले की, शिक्षकांच्या वेतनपत्रकाच्या स्थळप्रती या शाळेच्या मुख्याध्यापकाकडे नेहमीच उपलब्ध असतात. शिक्षणाधिकारी यांचे हे अभिप्राय पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम चुकीची माहिती दिली. उशिराने माहितीपोटीचे शुल्क कळवून अपिलार्थीस विनामूल्य माहिती देय असताना देखील त्यांच्याकडून रु.२००/- इतक्या शुल्काची आकारणी केली. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या चुकीच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब अध्यक्ष, उर्दू एज्युकेशन सोसायटी यांना संबंधित मुख्याध्यापक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

तसेच जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून अवैधरित्या स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु. २००/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु. २००/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

३. अध्यक्ष, ऊर्दू एज्युकेशन सोसायटी,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद याकूब सय्यद मसूद, प्लॉट नं.१४, क्रिसेन्ट हौसिंग सोसायटी, सिडको,एन-१२, रोझाबाग, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, फातेमा गर्ल्स हायस्कूल, कैसर कॉलनी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७९८
निर्णय दिनांक २५-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मौलाना आझाद ऊर्दू हायस्कुल, मुदखेड, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, भारत एज्युकेशन सोसायटी, मुदखेड, जि.नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत व अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी या अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. २५.०९.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी विचाराधीन अपिलाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने ते विचाराधीन अपील स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद केले आहे व विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे, अशी त्यांनी या पत्रामध्ये आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील क्र. २७९८/०७, दि.१३.११.२००७ मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीची विनंती मान्य करण्यात येत आहे.

वरील वस्तुस्थिती व विशेषतः अपिलार्थीस आवश्यक माहिती प्राप्त झाली आहे, हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. २७९८/०७, दि.१३.११.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा.समिराबाग,खडकपूराच्या पाठीमागे,नांदेड, जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,मौलाना आझाद ऊर्दू हायस्कुल, मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. अध्यक्ष, भारत एज्युकेशन सोसायटी, मार्फत मौलाना आझाद ऊर्दू हायस्कूल, मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७९९
निर्णय दिनांक २५-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>इकरा ऊर्दू प्राथमिक शाळा,नांदेड, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव,गुलजार एज्युकेशन सोसायटी, नांदेड,<br>जि.नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी (संस्थेचे सचिव) व संबंधित संस्थेचे अध्यक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी या अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दि. २२.०३.२००९ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे व प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांची कोणतीही तक्रार नाही, असे त्यांनी आयोगास त्यांच्या दि. २२.०३.२००९ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे अवगत केले असून त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे कारण विचारले असता,जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली होती, परंतु अपिलार्थीस ती प्राप्त न झाल्याने त्यांनी परत दि.२२.०३.२००९ रोजी माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील वस्तुस्थिती व विशेषतः अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. २७९९/०७, दि.११.०९.२००७ खारीज करण्यात येत आहे.

-

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा.समिराबाग,खडकपूराच्या पाठीमागे,नांदेड, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इकरा ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. सचिव,गुलजार एज्युकेशन सोसायटी, मार्फत इकरा ऊर्दू प्राथमिक शाळा, हैदरबाग नं.२ नांदेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८००
निर्णय दिनांक २५-०९-२००९

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
हदगाव, जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव, ज्ञानदिप शिक्षण मंडळ, हदगाव, जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०७.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत माहिती मिळविण्याकरिता जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,हदगाव, जि.नांदेड यांच्याकडे दि. ०२.०४.२००७ रोजी पोस्टाने अर्ज पाठविला असता, मुदत संपल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी सचिव, ज्ञानदिप शिक्षण मंडळ संचलित यांच्याकडे दि. २५.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि सदर अपील अर्जाची पोस्ट रजिस्ट्री, या नावाच्या व्यक्तीची भेट होत नसल्यामुळे अपिलार्थीस परत प्राप्त झाली. या प्रकारामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या शाळेच्या संदर्भात जून २००५ ते मार्च २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.०५.२००७ रोजी सचिव, ज्ञानदिप शिक्षण मंडळ हदगाव संचलित विवेकानंद विद्यालय, हदगाव यांच्याकडे प्रथम अपील केले होते. परंतु ही व्यक्ती पोस्टमनला सापडली नसल्यामुळे व अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय त्यांना प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा कथित माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना आजतागायत प्राप्त झाला नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची कल्पना त्यांना आयोगाने आज रोजीच्या सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे कळविलेल्या नोटिशीसोबत प्राप्त झालेल्या अर्जाच्या प्रतींवरुन आली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाने अर्ज केला होता, असे त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. तथापि या संदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील

अर्जासोबत सादर केलेला नाही. त्याचप्रमाणे शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये शिक्षण संस्थांच्या संदर्भात प्रथम अपिलीय प्राधिकरण म्हणून प्रत्येक जिल्हयाच्या जिल्हा परिषदेतील संबंधित शिक्षणाधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. अपिलार्थीने त्यांचा दि. २५.०५.२००७ रोजीचा कथित प्रथम अपील अर्ज सचिव, ज्ञानदिप शिक्षण मंडळ हदगाव संचलित विवेकानंद विद्यालय, हदगाव यांच्याकडे केला आहे. अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे केल्याचाही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील आवश्यक त्या पुराव्याअभावी फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

-

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड, जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,हदगाव जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. सचिव, ज्ञानदिप शिक्षण मंडळ, हदगाव जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८०१
निर्णय दिनांक २५-०९-२००९

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
नोबल ऊर्दू हायस्कूल, नांदेड जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव, नोबल एज्युकेशन सोसायटी मार्फत ऊर्दू
हायस्कूल,नांदेड, जि.नांदेड
प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०७.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी मुख्याध्यापक, नोबल ऊर्दू हायस्कूल यांच्याकडे दि. ०९.०४.२००७ रोजी माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, नोबल एज्यूकेशन सोसायटी, नांदेड यांच्याकडे दि. ११.०६.२००७ रोजी त्यांचे दि. ०७.०६.२००७ रोजीचे प्रथम अपील रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविले असता संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांनी सदरील संस्थेचे सचिव नसल्याचे कारण दर्शवून त्यांची रजिस्ट्री परत केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शाळेच्या मुख्याध्यापकांविषयी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संस्थेच्या कायद्यानुसार कोणत्या संस्थेच्या पदाधिकाऱ्याला किंवा संचालक मंडळाला शाळेच्या मुख्याध्यापकाची वार्षिक वेतनवाढी देण्याचे अधिकार आहेत,त्या नियम (कायद्या)ची सत्यप्रत, मुख्याध्यापकाच्या सेवापुस्तकाची साक्षांकित सत्यप्रत,मुख्याध्यापकांचे पूर्ण वेतनवाढीचे नोंदीसह तसेच महाराष्ट्र दर्शन देयकाच्या मुख्याध्यापकाच्या अर्जांवर शिक्षण संस्थेच्या संचालकांची स्वाक्षरी असलेल्या सत्यप्रती आणि मुख्याध्यापक यांनी नजिकच्या काळात भविष्य निर्वाह निधी मधून उचल करण्यासाठी केलेल्या अर्जावर शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाच्या स्वाक्षऱ्या असलेल्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार संस्थेच्या सचिवांकडे दि. ०७.०६.२००७ प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित संस्थेच्या सचिवांनी निश्चित कोणता निर्णय दिला व अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती प्राप्त झाली किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही. अपिलार्थीने आयोगाकडे त्यांचा द्वितीय अपील अर्ज, माहितीसाठीचा अर्ज व प्रथम अपील अर्ज या कागदपत्रांशिवाय इतर कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे व प्रथम अपील

अर्जाचे अवलोकन केले असता, मूळात हे अर्ज अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाने खरोखरीच सादर केले आहेत किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. तसेच शिक्षण संस्थेच्या संदर्भात जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून शिक्षण संचालनालयाने त्यांच्या पत्र क्र. संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये नेमणूक केली असताना अपिलार्थीने त्यांचा प्रथम अपील अर्ज संबंधित संस्थेच्या सचिवांकडे केला आहे. हे पाहता, अपिलार्थीस आता त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेण्यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे त्यांचे संबंधित प्रथम अपील करावे लागेल. त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांचा या प्रकरणाशी संबंधित दि. ०७.०६.२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम सादर करावा. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीचा दि. ०७.०६.२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे सादर झाल्यानंतर तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०७.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, सदर अपील अर्ज अपिलार्थीकडून त्यांना प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड, जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,नोबल ऊर्दू हायस्कूल, नांदेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४५२

निर्णय दिनांक २९-०९-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने दिनांक २२-०२-२००८ रोजीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला असता जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे सुनावणी-करिता गैरहजर राहिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित पालक शिक्षक संघाची स्थापना केल्यापासूनच्या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पालक शिक्षक संघ रजिस्टराच्या सत्यप्रती, खरेदी केलेल्या संगणकाच्या पावत्या, ज्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यात आले त्या विद्यार्थ्यांची यादी, इत्यादी - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी, शैक्षणिक वर्ष २००१ ते २००७-०८ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणता प्रतिसाद दिला हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास आयोगास मार्ग नाही. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी प्रथम अपील केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी वेळोवेळी सुनावण्या ठेवल्या होत्या. तथापि काही सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी गैरहजर व काही सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर राहिल्याने व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून ठेवलेल्या दिनांक १६-०५-२००८, ०३-०६-२००८, २७-०६-२००८ या तीनही सुनावणीमध्ये अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या

माहितीपोटीचे शुल्क त्यांना अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे कळविले आहे किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सर्वसाधारणपणे सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ही माहिती देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस पुरवावी. जर अपिलार्थीस त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीप्रमाणे कळविले असल्यास अपिलार्थीस ही माहिती सशुल्क पुरवावी अन्यथा त्यांना ही माहिती विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,

मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४५३

निर्णय दिनांक  २९-०९-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, मौलाना आझाद उर्दू प्राथमिक शाळा,
हानेगांव, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव सेवालाल शिक्षण संस्था मार्फत मौलाना आझाद
उर्दू प्राथमिक शाळा, हानेगांव, तालुका देगलूर
जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष :
१. सुलतानी रफियोद्दिन
२. अहमद बेगम
३. बुशरा बेगम सय्यद अकबर
४. शेख महेमूद आबेदअली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मौलाना आझाद उर्दू प्राथमिक शाळा, हानेगांव, तालुका देगलूर यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने दिनांक ३०-०८-२००७ रोजी अर्ज पाठविला असता त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलेट अधिकारी तथा सचिव सेवादास शिक्षण संस्था यांच्याकडे दिनांक २३-१०-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली होती व तदनंतर अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे दिनांक ३०-०८-२००७ व दिनांक २३-१०-२००७ रोजी रजिस्ट्री क्रमांक ५७५० व ४६७३ अन्वये अर्ज पाठविल्याचे नमूद केले आहे. तथापि त्यांच्या या म्हणण्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीने कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर हजर नाहीत. हे पाहता अपिलार्थीने मूळात माहितीसाठीचा मूळ अर्ज व तदनंतरचा अपील अर्ज जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे खरोखरच सादर केला होता किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. अशा प्रकारे योग्य त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मौलाना आझाद उर्दू प्राथमिक शाळा हानेगांव, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव सेवालाल शिक्षण संस्था मार्फत मौलाना आझाद उर्दू प्राथमिक शाळा, हानेगांव, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४५४

निर्णय दिनांक २९-०९-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक/प्राचार्य, जवाहरलाल नेहरु माध्यमिक व
उच्च माध्यमिक विद्यालय, बरबडा, तालुका नायगांव (खै.),
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, जवाहरलाल नेहरु शिक्षण समिती संचलित,
जवाहरलाल नेहरु माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
बरबडा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-११-२००७ रोजी अर्ज पाठवून दिला असता विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, जवाहरलाल नेहरु शिक्षण समिती संचलित, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाव्दारे दिनांक १६-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २४-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती.
अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५०० इतके डी. डी. व्दारे अथवा मनीऑर्डरव्दारे विद्यालयास पाठविण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने याप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचे अपील जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, जवाहरलाल नेहरु शिक्षण समिती, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांच्याकडे केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११६० त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. परंतु याही पत्राच्या सूचनेचे पालन न करता अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे वकील हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज करतेवेळी संबंधित संस्थेचे सचिव हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले नव्हते. शिक्षण

संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे सर्व शिक्षण संस्थांच्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी म्हणून संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी यांची नेमणूक केली आहे. असे असतांना देखील अपिलार्थीने त्यांचे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये करावयाचे प्रथम अपील मूळात चुकीच्या प्राधिकरणाकडे केले असल्यामुळे अपिलार्थीस संबधितांकडून कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही. सबब या टप्प्यावर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत नव्याने अर्ज करुन त्यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यास त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथमतः प्रथम अपील अर्ज करावा व जर त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही निर्णय दिला नाही अथवा त्यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीप्रमाणे सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत नव्याने अर्ज करुन त्यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यास त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथमतः प्रथम अपील अर्ज करावा व जर त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही निर्णय दिला नाही अथवा त्यांचा निर्णय

अपिलार्थीस मान्य न झाल्यास ते, अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीप्रमाणे सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक/प्राचार्य, जवाहरलाल नेहरु माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बरबडा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, जवाहरलाल नेहरु शिक्षण समिती संचलित, जवाहरलाल नेहरु माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बरबडा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४५५

निर्णय दिनांक २९-०९-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, सावित्रीबाई फुले हायस्कूल वाजेगांव,
तालुका जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, शिवाजी शैक्षणिक प्रतिष्ठान टाकळी संचलित
मार्फत सावित्रीबाई फुले हायस्कूल वाजेगांव,
तालुका जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मुख्याध्यापक, सावित्रीबाई फुले हायस्कूल वाजेगांव, तालुका जिल्हा नांदेड यांच्याकडे माहिती मागितली असता त्यांना मुदतीमध्ये माहिती न दिल्याने त्यांनी प्रथम अपिलेट अधिकारी तथा सचिव, शिवाजी शैक्षणिक प्रतिष्ठान टाकळी संचलित यांच्याकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी प्रथम अपील दाखल

केले. तथापि प्रथम अपिलेट अधिका-याने प्रथम अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेत कार्यरत असलेल्या एकूण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या आस्थापनाविषयक बार्बीशी संबंधित, शाळा स्थापन झाल्यापासून ते ऑक्टोबर २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. परंतु ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. मात्र अपिलार्थीच्या मते जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी आयोगास त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज या व्यतिरिक्त इतर कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जरी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पत्रव्यवहार केल्याचे म्हटले असले तरीही यासंदर्भातील कोणताही सबळ पुरावा म्हणजे रजिस्टर्ड पोस्टाच्या पावतीच्या झेरॉक्स प्रती इत्यादी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या नाहीत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर हजर नाहीत, हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर

वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सावित्रीबाई फुले हायस्कूल वाजेगांव, तालुका जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, शिवाजी शैक्षणिक प्रतिष्ठान टाकळी संचलित मार्फत सावित्रीबाई फुले हायस्कूल वाजेगांव, तालुका जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४५६

निर्णय दिनांक २९-०९-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, : अपिलार्थी
रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. डी. बी. सोनटक्के

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १७-१२-२००७ रोजी अर्ज केला असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी प्रथम अपिलेट अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०१-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि त्यांच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्या कारणामुळे त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे संजय गांधी हायस्कूल पुणेगांव या शाळेचे मुख्याध्यापक श्री. सोनटक्के हे १९९४ पासून रजेवर असतांना त्यांना दिल्या गेलेल्या पगाराच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी शैक्षणिक वर्षे १९९४ ते २००७ असा होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. मात्र अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी हे आयोगास या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती देण्यासाठी असमर्थ असल्याचे आढळल्यावरुन तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-

०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४५७

निर्णय दिनांक   २९-०९-२००९

१ श्री. रिजवान अहेसन कुरेशी, : अपिलार्थी

हॉटेल गुलमर्ग, मौलाना आझाद चौक, एम. जी. रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक,

मदरसे मिलीया उच्च प्राथमिक शाळा उर्दू, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मुख्याध्यापक, मदरसे मिलीया उच्च प्राथमिक शाळा उर्दू, नांदेड यांच्याकडे दिनांक २५-०३-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाव्दारे काही माहिती मागविली असता त्यांनी माहिती न दिल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता हे प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेची सिव्हील लिस्टची प्रत, शालेय समितीच्या बोर्डाची छायांकीत प्रत व शिक्षकांच्या डी. एड्. पास झाल्याचे प्रमाणपत्र ही माहिती पोस्टाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००७-२००८ असा होता. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०५ व १६-०६-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी झाली किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाशी संबंधित त्यांना कोणतीही माहिती नाही असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या शाळेची सिव्हील लिस्ट एवढीच माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील 'शालेय समितीच्या बॉडीची छायांकीत प्रत' म्हणजे अपिलार्थीस नेमके काय म्हणावयाचे आहे याचा आयोगास बोध होत नाही. तसेच अपिलार्थीस 'शिक्षकाच्या डी. एड्. पास झाल्याचे प्रमाणपत्र' या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दयावरुन अपिलार्थीस कोणत्या शिक्षकांचे, सर्व शिक्षकांचे डी. एड्. प्रमाणपत्र हवे आहे की एखाद्या विशिष्ट शिक्षकाच्या प्रमाणपत्राच्या प्रती हव्या आहेत याचाही बोध होत नाही. त्यामुळे या

दोनही मुद्दयांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. अशा प्रकारे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत अशी माहितीच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी त्यांच्या शाळेशी संबंधित सन २००७-२००८ च्या सिव्हील लिस्टची प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व पोस्टाव्दारे पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रिजवान अहेसन कुरेशी, कार्याध्यक्ष, ऑफ इंडिया मुस्लीम, ओ. बी. सी. ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया, हॉटेल गुलमर्ग, मौलाना आझाद चौक, एम. जी. रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदरसे मिलीया उच्च प्राथमिक शाळा उर्दू,

निजाम कॉलनी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४४६
निर्णय दिनांकः २९.०९.२००९

१. श्री. शेख अफसर शेख बाबू, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : लेखाधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ,नांदेड.

जन अपिलीय अधिकारी : वित्त व लेखा अधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असून त्यांच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत सोबत जोडली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या त्यांच्या दारिद्रयरेषेच्या प्रमाणपत्राची पाहणी करता हे प्रमाणपत्र अत्यंत अस्पष्ट व न वाचताजोगे असल्याचे

दिसून येते. तसेच अपिलार्थीने या अपील अर्जावर रु.२०/- इतक्या किंमतीचा कोर्ट-फी-स्टॅम्प देखील चिटकवलेला नाही. सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. आर.टी.आय.२००५ /सी.आर, ३१५/०५/५, दि. ११.१०.२००५च्या अधिसूचनेतील तरतुदीप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करताना या अधिसूचनेतील जोडपत्रामध्ये विहित केलेल्या परिपत्रकामध्ये अपिलार्थीने अर्ज करणे गरजेचे आहे. अपिलार्थीने या परिपत्रकामध्ये आयोगाकडे अर्ज केला आहे. परंतु रु.२०/- इतक्या किंमतीचे न्यायालयीन फीचे तिकीट चिटकवले नाही. यामुळे अपिलार्थीचा आयोगाकडे केलेला मूळ अपील अर्जच अवैध ठरत आहे.अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत रु.२०/- इतक्या किमतीचे कोर्ट-फी-स्टॅम्प अथवा या रकमेचा भरणा आयोगाकडे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या दुसऱ्या कोणत्याही माध्यमाद्वारे पुरविला नसल्याने, तसेच आज रोजी सुनावणीसाठी अथवा या मुद्यावर भाष्य करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख अफसर शेख बाबु, रा.हमालपुरा, मस्जीदजवळ,नांदेड-४३१ ६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वित्त व लेखाधिकारी,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४४७
निर्णय दिनांकः २९-०९-२००९

१. श्री. शेख अफसर शेख बाबू, रा.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी, परीक्षा विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपकुलसचिव, परीक्षा विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : परीक्षा नियंत्रक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०७.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे विद्यापीठाशी संबंधित सन २००७-०८ या कालावधीतील नांदेड शहरातील अभियांत्रिकी, बी.सी.एस. व बी.सी.ए. अभ्यासक्रमातील किती विद्यार्थ्यांच्या निकालात गुणपडताळणीनंतर बदल झाला, यासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - बदल झालेल्या उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती, पडताळणी प्रक्रियेतील अधिकाऱ्यांची सविस्तर माहिती व निकालात बदल झालेल्या विद्यार्थ्यांची सविस्तर माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ज्या विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये बदल झाला आहे, अशा विद्यार्थ्यांच्या संख्येच्या संदर्भात अपिलार्थीस परीक्षानिहाय माहिती पुरविली व तसेच विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती अपिलार्थीस देण्याचे नाकारले.या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस गुणपडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावासंदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (जी) चा आधार घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०५.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दि. ०२.०६.२००८ रोजी पारीत केले व जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेशी सुसंगत भूमिका घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी (वकील) उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी ॲड.एम.आर.चौधरी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी अधिनियमाद्वारे देय असलेली माहिती दि. ०५.०५.२००८ रोजी पुरविली असून उर्वरित माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय नसल्यामुळे त्यांना ती पुरविता आली नाही. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, कोणत्याही परीक्षेच्या उत्तरपत्रिका जतन करुन ठेवण्याचा कालावधी सहा महिने इतका असतो व ही उत्तरपत्रिका फक्त अपिलार्थीसच उपलब्ध केली जाते. तथापि अपिलार्थीने मार्च-एप्रिल,२००७ च्या परीक्षेच्या संदर्भातील उत्तरपत्रिकांची मागणी त्यांच्या दि. ०७.०४.२००८ रोजीच्या अर्जान्वये केली आहे. त्यामुळे ही माहिती त्यांना अपिलार्थीस पुरविता येणार नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम,जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीन मुद्यांवर माहिती मागविली आहे. त्यापैकी पहिला मुद्दा म्हणजे ज्या विद्यार्थ्यांच्या निकालात बदल झाला आहे, अशा विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका, हा होय. या संदर्भात येथे असे स्पष्ट करण्यात येते की, उत्तरपत्रिकांच्या संदर्भात केंद्रीय माहिती आयोग व वेगवेगळया राज्य माहिती आयोगाने तसेच मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी आपले निर्णय पारित केले आहेत. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिकांच्या प्रती विद्यार्थ्यांना देय होत नसल्याचा निर्वाळा सर्व संबंधितांनी दिलेला आहे व तसेच अपिलार्थीस ज्या उत्तरपत्रिकांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहेत त्या उत्तरपत्रिका मूळात जतन करुन ठेवण्याच्या कालावधी समाप्त झाल्यामुळे त्या अपिलार्थीने अर्ज करते वेळी अस्तित्त्वातच नसल्याने अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ अन्वये अपिलार्थीने पडताळणी प्रक्रियेतील अधिकाऱ्यांची व विद्यार्थ्यांची सविस्तर माहिती मागविली आहे. 'सविस्तर माहिती'

म्हणजे नेमक्या कोणत्या मुद्यावरील माहिती हे अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जात स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती मोघम स्वरुपाची ठरत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना विशिष्ट मुद्यावरच माहिती मागणे हे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसारखी मोघम स्वरुपाची माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मूळात वैध "माहिती" असू शकत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या या मुद्यांवर देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय असणार नाही. याहीउपर जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८(जी) चा आधार घेऊन ही माहिती अपिलार्थीस देण्याचे नाकारले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी नकार देताना घेतलेल्या या मुद्याचा आधार या प्रकरणी आयोगास योग्य वाटतो.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय असलेली माहिती, मुदतीत दिली आहे. उर्वरित माहिती अपिलार्थीस देय होत नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जास अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये योग्य तो प्रतिसाद दिलेला असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख अफसर शेख बाबू, रा.हमालपुरा, मस्जीदजवळ,नांदेड-४३१ ६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव,परीक्षा विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४४८
निर्णय दिनांक: २९-०९-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, असास पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा,वसमतनगर, जि. हिंगोली : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, आदर्श महिला सेवाभावी संस्था,वसमतनगर, जि.हिंगोली.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२४.११.२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज पोस्टाने पाठवून दिला असता, त्यावर जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपील अपिलीय अधिकारी यांच्याकडे केले होते. तथापि त्यांनीही या प्रकरणात कोणतीही सुनावणी न घेता त्यांचे प्रथम अपील प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२४.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेच्या संदर्भातील, शाळा स्थापन झाल्यापासून ते दि. २४.११.२००७ पर्यंतच्या कालावधीतील विस्तृत प्रमाणात काही माहिती मागितली होती. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सचिव, आदर्श महिला सेवा संस्था वसमतनगर, ता.वसमत जि.हिंगोली यांच्याकडे दि.३१.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भात कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधीही आयोगासमोर उपस्थित नाहीत

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जरी त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने अर्ज पाठविल्याचा उल्लेख केला आहे. तरीही यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांत आढळून येत नाही. तसेच शिक्षण संस्थांशी संबंधित प्रथम अपिलांच्या संदर्भात,शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांकःसंकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.)जिल्हा परिषद यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे. तथापि एवढे असूनही अपिलार्थीने मूळात या प्रकरणाशी संबंधित त्यांचा प्रथम अपील अर्ज संस्थेच्या सचिवांकडे म्हणजेच चुकीच्या प्राधिकरणाकडे केला आहे. अपिलार्थीच्या आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जातील

या त्रुटी व विशेषतः अपिलार्थी व इतर संबंधितांची आज सुनावणीच्या वेळी असलेली अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,असास पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा, पठाण मोहल्ला,वसमतनगर,मु.पो.वसमत,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,आदर्श महिला सेवाभावी संस्था संचालित,असास पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा, पठाण मोहल्ला,वसमतनगर,मु.पो.वसमत,जि.हिंगोली.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४४९
निर्णय दिनांकः २९-०९-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
संत परबत महाराज हायस्कूल,
मालेगाव,ता.अर्धापूर, जि. नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०६.२००८रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि.११.०२.२००८ रोजी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काही माहिती मागविली असता त्यांना मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर सुनावणी घेऊनही जन अपिलीय अधिकारी यांनी त्यावर निर्णय प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.११.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संत परबत महाराज हायस्कूल,मालेगाव, ता.अर्धापूर, जि.नांदेड यांच्याकडे हायस्कुल स्थापन झाल्यापासून ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंतच्या कालावधीशी संबंधित, त्यांच्या शाळेमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी संबंधित काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०१.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.७४०/-इतके त्यांना मुख्याध्यापक,संत परबत महाराज हायस्कूल,मालेगाव या नावाने डी.डी.द्वारे अथवा शाळेच्या कार्यालयात रोखीने भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे शुल्क भरण्याची कार्यवाही न करता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देऊनही जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाचे प्रकरण प्रलंबित ठेवण्याचे कारण देऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क पुरविण्यास तयार आहेत. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ते शुल्क कळविले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद हा वस्तुस्थितीशी सुसंगत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या दि. ०१.०३.२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील, जसे संभावित माहितीच्या पृष्ठांची अंदाजीत संख्या व माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर हा दिलेला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(३)(क) मधील तरतुदीनुसार असा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे, त्यांना अनिवार्य आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि.०१.०३.२००८ रोजीच्या पत्रामध्ये हा तपशील दिला गेला नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दि. ०१.०३.२००८ रोजीचे पत्र अवैध होत आहे. सबब त्यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश कृ.मा.प.४...
दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संत परबत महाराज हायस्कूल, मालेगाव, ता.अर्धापूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४५०
निर्णय दिनांकः २९-०९-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या
शाळा, धर्माबाद, जि. नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे दि.१७.०४.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दि.२४.०७.२००८ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद कले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून क्र.१७८४, दि.३१.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती संपूर्ण माहिती पोस्टाने विनामूल्य प्राप्त झाली असून त्यांनी दि. १७.०४.२००८ रोजी नजरचुकीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले होते. प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही आक्षेप अथवा यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.१४५०/०८,दि.०९.०५.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या शाळा, धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४५१
निर्णय दिनांकः २९-०९-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राणी लक्ष्मीबाई मुलींचे हायस्कूल, नांदेड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि.१८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काही माहिती मागविली असता त्यांना मुदतीच्या आत माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (माध्य.),जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. २२.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०३.२००८ रोजी सुनावणी घेऊन त्यावर निर्णय प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राणी लक्ष्मीबाई मुलींचे हायस्कूल, नांदेड यांच्याकडे त्यांच्या शाळेमध्ये कायमस्वरुपी कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबीच्या संदर्भात, सदर शाळा स्थापन झाल्यापासून ते अपिलार्थीने मूळ अर्ज दाखल करेपर्यंतच्या कालावधीशी संबंधित माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२६०/-इतके त्यांना शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले व भरलेल्या चलनाची एक प्रत शाळेस देण्याचे कळविले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे शुल्क भरण्याची कार्यवाही न करता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. यानंतर अपिलार्थीस दि. १०.०४.२००८ रोजी माहिती देऊनही अपिलार्थीने अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविल्याचे त्यांना वाटल्यावरुन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी प्रथम त्यांच्या शाळेतील प्रयोगशाळा परिचर श्री. सी.के.शेख यांच्यामार्फत दि. ०९.०४.२००८ रोजी व दि. १०.०४.२००८ रोजी देण्याचा

प्रयत्न करुनही अपिलार्थीने ही माहिती घेण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस दि. १०.०४.२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठवून दिली. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील सुनावणीमध्ये निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीस दि. २५.०३.२००८ रोजी म्हणजेच सुनावणीच्या दिवशी उर्वरित दोनही मुद्यांवरील माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी दि. २५.०३.२००८ रोजी दिलेल्या माहितीमध्ये त्यांच्या संस्थेच्या शिक्षक नियुक्तीच्या जाहीरातीची प्रत व मुलाखतीस बोलावण्यात आलेल्या उमेदवारांची यादी या दोन मुद्यांवरील माहिती द्यावयाची राहिली होती. ही माहिती अपिलार्थीस दि.१०.०४.२००८ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे विनामूल्य पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दि. १५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२६०/- त्यांना शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्याची तयारी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर दर्शविली नाही. इतकेच नव्हेतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०९.०४.२००८ व दि. १०.०४.२००८ रोजी व्यक्तिशः त्यांच्या शाळेतील श्री. सी.के.शेख, प्रयोगशाळा परिचर यांच्यामार्फत माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले. त्यामुळे नाईलाजाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे दि. १०.०४.२००८ रोजी ही माहिती अपिलार्थीस पाठविली. आता अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे, असे कारण दर्शवून राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील करीत आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चित कोणत्या मुद्यावर अद्यापपर्यंत माहिती प्राप्त होणे बाकी आहे व प्राप्त माहितीने त्यांची कशाप्रकारे दिशाभूल होत आहे, हे

आयोगास स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीचा, त्यांनी आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली हा उपस्थित केलेला मुद्दा आवश्यक त्या पुराव्याअभावी सिध्द होऊ शकत नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,राणी लक्ष्मीबाई मुलींचे हायस्कूल, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९७/०९
निर्णय दिनांक २९/ ०९/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नानासाहेब श्रावण ओहोळ, रा. संगमनेर जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक कार्यालय संगमनेर जि. अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा उपवन संरक्षक अहमदनगर वनविभाग औरंगाबाद रोड अहमदनगर. | | |

**निर्णय**

श्री. नानासाहेब श्रावण ओहोळ यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ११.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १६.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५ महिने २२ दिवस इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळणे योग्य असल्याचे आयोगाचे मत असून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. नानासाहेब श्रावण ओहोळ, संगमनेर (खुर्द) ता. संगमनेर जि. अहमदनगर.

२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक कार्यालय संगमनेर जि. अहमदनगर.

३) जन अपिलीय अधिकारी तथा, उपवन संरक्षक अहमदनगर वन विभाग औरंगाबाद रोड अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६३९/०८
निर्णय दिनांक २९/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक सरस्वती विद्यालय मुखेड जि. नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव, विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ मुखेड
जि. नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०९.०५.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २९.१०.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २८.१२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १०१ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळणे योग्य असल्याचे आयोगाचे मत असून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.

२) जन माहिती अधिकारी तथा, मुख्याध्यापक सरस्वती विद्यालय मुखेड जि. नांदेड.

३) जन अपिलीय अधिकारी तथा, सचिव, विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ मुखेड जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४०/०८
निर्णय दिनांक २९/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक नोबल उर्दू हायस्कूल लेबर कॉलनी
नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २९.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २१.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ८३ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळणे योग्य असल्याचे आयोगाचे मत असून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २९/०९/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा, मुख्याध्यापक नोबल उर्दू हायस्कूल लेबर कॉलनी नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४१/०९
निर्णय दिनांक २९/०९/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ,<br>मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड<br>नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक सना उर्दू प्राथमिक शाळा<br>नोमानियानगर नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १०.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १०.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ९३ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळणे योग्य असल्याचे आयोगाचे मत असून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा, मुख्याध्यापक सना उर्दू प्राथमिक शाळा नोमानियानगर नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४२/०८
निर्णय दिनांक २९/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी , कार्यालय औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १०.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २१.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २० इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळणे योग्य असल्याचे आयोगाचे मत असून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

द्वितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा, उपविभागीय अधिकारी , कार्यालय औरंगाबाद.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४३/०८
निर्णय दिनांक २९/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद
नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १३.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६० इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळणे योग्य असल्याचे आयोगाचे मत असून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४४/०८
निर्णय दिनांक २९/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण बिलोली
तालुका कार्यालय बिलोली जि. नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक सामाजिक वनीकरण कार्यालय नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ११.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १३.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. सदर प्रथम अपीलावरील निर्णयाने समाधान न झाल्याने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ९० इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळणे योग्य असल्याचे आयोगाचे मत असून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा, लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण बिलोली तालुका कार्यालय बिलोली जि. नांदेड

३. जन अपिलीय अधिकारी तथा, उपसंचालक सामाजिक वनीकरण कार्यालय नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५४/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद नांदेड.

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २२.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १६.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २१.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ९२ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५५/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ,<br>मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड<br>नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २४.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०५.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७८ जास्त दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५६/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती
विकास महामंडळ मर्या. नांदेड जिल्हा नांदेड
वसंतनगर नवा मोंढा नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा व्यवस्थापक वसंतराव नाईक विमुक्त जाती
व भटक्या जमाती महामंडळ मर्या. नांदेड जिल्हा
कार्यालय नवा मोंढा नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २१.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०५.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. सदर प्रथम

अपीलावरील निर्णयाने समाधान न झाल्याने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७८ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा, वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या. नांदेड जिल्हा नांदेड वसंतनगर नवा मोंढा नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा, जिल्हा व्यवस्थापक वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ मर्या. नांदेड जिल्हा कार्यालय नवा मोंढा नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५७/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, (प्राथमिक)
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, (प्राथमिक)
मंत्रालय (विस्तार) भवन, मुंबई-३२

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १०.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २८.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ११५ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, (प्राथमिक) मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
३. जन अपिलीय अधिकारी तथा, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, (प्राथमिक) मंत्रालय (विस्तार) भवन, मुंबई-३२

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५८/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद
नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ३०.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०४.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १८ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०/०९/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५९/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद
नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.१२.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १३.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७० इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६०/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अध्यक्ष, सना एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी,
नोमानियानगर, तरोडा नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २५.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २० इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा, अध्यक्ष, सना एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी, नोमानियानगर, तरोडा नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६१/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास
महामंडळ, कार्यालय देवगिरी विश्रामगृह नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास
महामंडळ देवगिरी विश्रामगृह नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०६.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ९७ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, कार्यालय देवगिरी विश्रामगृह नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ देवगिरी विश्रामगृह नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६२/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक नंदीग्राम निवासी अपंग शाळा
जवाहरनगर सुप्पा ता.जि. नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
समाजकल्याण अधिकारी कार्यालय, आनंदनगर
नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०१.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०८.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय

अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १२४ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा, मुख्याध्यापक नंदीग्राम निवासी अपंग शाळा जवाहरनगर सुप्पा ता.जि. नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण अधिकारी कार्यालय, आनंदनगर नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६३/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ,<br>मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड<br>नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक संचालक सामाजिक वनीकरण,<br>आनंदनगर रोड नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक सामाजिक वनीकरण विभाग नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ११.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १३.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६० इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा, सहायक संचालक सामाजिक वनीकरण, आनंदनगर रोड नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, उपसंचालक सामाजिक वनीकरण विभाग नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६४/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद
नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १५.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २८ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६५/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, म.रा. रस्ते विकास महामंडळ
कार्यालय, देवगिरी विश्रामगृह नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता, म.रा.रस्ते विकास महामंडळ
नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०६.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ९६ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा, कार्यकारी अभियंता, म.रा. रस्ते विकास महामंडळ कार्यालय, देवगिरी विश्रामगृह नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, अधिक्षक अभियंता, म.रा.रस्ते विकास महामंडळ नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६६/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद
नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.१२.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १३.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६० इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६७/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास
महामंडळ, नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास
महामंडळ, बांधकाम भवन औरंगाबाद.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १७.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०६.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ९७ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा, अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा, मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, बांधकाम भवन औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६८/०८
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल रा. नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.१२.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १३.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६० इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर बसस्टँडरोड नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७११/०८
निर्णय दिनांक २९/ ०९/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा. नांदेड, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१.०९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०२.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २२.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ११० दिवस इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक : २९-०९-२००९** **खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.मुख्य संपादक साप्ताहिक सत्यवृत्त मिल कॉर्नर प्रशिक्षण रोड नांदेड, जि. नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

३. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८१२/०७
निर्णय दिनांक २९/०९/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अनिल कृष्णराव पाटील,<br>रा. पाचोरा, जि. जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी गिरक रोड पाचोरा | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मार्केट यार्ड<br>अजिंठा रोड जळगांव | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. अनिल कृष्णराव पाटील यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २६.१०.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १७.११.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. सदर प्रथम अपीलावरील निर्णयाने समाधान न झाल्याने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील

दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ४८ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळणे योग्य असल्याचे आयोगाचे मत असून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिल कृष्णराव पाटील इंदिरानगर पाचोरा जि. जळगांव.
२. जन माहिती अधिकारी तथा, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी गिरक रोड पाचोरा
३. जन अपिलीय अधिकारी तथा, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्केट यार्ड अजिंठा रोड जळगांव

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८१३/०७
निर्णय दिनांक २९/०९/२००९

१ श्री. बापू शामराव बैरागी, C/o जी.व्ही.बी.८२ : अपिलार्थी
सप्तशृंगी मंदीर, गजवक्रनगर अश्वमेधनगर
आरटीओ ऑफीस समोर पेठ नाशिक-४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विभागीय जात पडताळणी समिती नाशिक.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष विभागीय जात पडताळणी समिती नाशिक.

**निर्णय**

श्री. बापू शामराव बैरागी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २५.०६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २१.०८.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १९.०९.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १५६ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळणे योग्य असल्याचे आयोगाचे मत असून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बापू शामराव बैरागी, C/o जी.व्ही.बी.८२ सप्तशृंगी मंदीर, गजवक्रनगर अश्वमेधनगर आरटीओ ऑफीस समोर पेठ नाशिक-४

२. जन माहिती अधिकारी तथा, विभागीय जात पडताळणी समिती नाशिक.

३. जन अपिलीय अधिकारी तथा, अध्यक्ष विभागीय जात पडताळणी समिती नाशिक.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८१४/०७
निर्णय दिनांक  २९/०९/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विष्णू विठ्ठल साबळे,<br>रा. विंचूर, ता. निफाड, जि. नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक निबंधक सह. संस्था निफाड जि. नाशिक. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सह. निबंधक सह संस्था निफाड जि.<br>नाशिक. | | |

**निर्णय**

श्री. विष्णू विठ्ठल साबळे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २९.०६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.१२.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २३.०१.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील

दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपिलाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ४५ इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २९/०९/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विष्णू विठ्ठल साबळे, रा. विंचूर, ता. निफाड, जि.नाशिक.
२. जन माहिती अधिकारी तथा, सहाय्यक निबंधक सह. संस्था निफाड जि. नाशिक.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, विभागीय सह. निबंधक सह संस्था निफाड जि. नाशिक.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८१५/०७
निर्णय दिनांक २९/०९/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विष्णू विठ्ठल साबळे,<br>रा. विंचूर, ता. निफाड, जि. नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक निबंधक सह. संस्था निफाड जि. नाशिक. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सह. निबंधक सह संस्था निफाड जि.<br>नाशिक. | | |

**निर्णय**

श्री. विष्णू विठ्ठल साबळे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २९.०६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.१२.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २३.०१.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. सदर प्रथम अपीलावरील दिनांक १४.०२.२००७ रोजीच्या निर्णयाने समाधान न झाल्याने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील

दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, या प्रकरणी दिनांक १४.०२.२००७ रोजीचे जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ११.०४.२००७ रोजी प्राप्त झाल्याबद्दल कोणताही पुरावा अपिलार्थी यांनी सादर केला नाही तसेच अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यावरुन दिनांक १३.०३.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्याचे दिसते. जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केल्यानंतर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे उशीरात उशीरा अपिलार्थीने आयोगाकडे १२० दिवसाचे आत व्दितीय अपील करणे त्यांना भाग होते परंतु त्यांनी आयोगाकडे अधिनियमातील विहित वेळेत अपील सादर न करता ते विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर १८ दिवसाच्या विलंबाने केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विष्णू विठ्ठल साबळे, रा. विंचूर, ता. निफाड, जि.नाशिक.
२. जन माहिती अधिकारी तथा, सहाय्यक निबंधक सह. संस्था निफाड जि. नाशिक.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, विभागीय सह. निबंधक सह संस्था निफाड जि. नाशिक.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८१६/०७

निर्णय दिनांक : २९-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १) श्री. सुखदेव कृष्णाजी सोनवणे<br>रा.सटाणा, ता.बागलाण, जि.नाशिक | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १) जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, सटाणा, जि.नाशिक. | : | जन माहिती अधिकारी |
| २) जन अपिलीय अधिकारी तथा<br>आयुक्त तथा संचालक,<br>नगर परिषद प्रशासन संचालनालय,<br>वरळी, मुंबई-३० | : | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री. सुखदेव कृष्णाजी सोनवणे रा. सटाणा, जि. नाशिक यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १०-०७-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २३-०६-२००५ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २७-०८-२००५ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १३-०४-२००६ रोजी पारित केले आहे. सदरचे आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक १०-०७-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, प्रस्तुतचे अपील जून्या कायद्याखाली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी उशीरा निर्णय दिला असल्याचे दिसते. तथापि त्यानंतर मूळ कायदा निरसित झाला असल्यामुळे त्या कायद्याखालील माहितीच्या अर्जासंबंधी आयोगाकडे नविन कायद्यानुसार द्वितीय अपील करता येत नाही. जी द्वितीय अपिले, विहीत तारखेपर्यत म्हणजेच १२ ऑक्टोबर,२००५ पर्यत दाखल झाली असतील त्यावरच उपलोकायुक्त यांनी निर्णय देणे अपेक्षित होते. व या तारखेनंतर जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या माहितीच्या अर्जासंदर्भात कलम १९ मधील प्रक्रिया पूर्ण करुन सादर केलेल्या व्दितीय अपिलावर आयोगाने निर्णय देणे अपेक्षित आहे. प्रस्तुत अपील विहीत मुदतीनंतर सादर केले असल्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुखदेव कृष्णाजी सोनवणे, कार्याध्यक्ष नागरीक समस्या निवारण समिती, उपासणी रोड, सटाणा, ता. बागलाण, जि. नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद सटाणा, जि. नाशिक.

३. जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय शासकिय परिवहन सेवा इमारत ३रा मजला सर पोचखानवाला मार्ग, वरळी मुंबई -३०

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८१७/०७
निर्णय दिनांक २९/०९/२००९

१ श्री. यशवंत उखा बोरसे : अपिलार्थी
रा. सटाणा जि. नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहाय्यक निबंधक सह. संस्था सटाणा जि. नाशिक.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक सह. संस्था नाशिक.

**निर्णय**

श्री. यशवंत अखा बोरसे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २५.०७.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १९.११.२००५ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २२.१२.२००५ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. सदर प्रथम अपीलावरील निर्णयाने समाधान न झाल्याने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली

असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा १३० इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

व्दितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २९/०९/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. यशवंत उखा बोरसे व्ही. पी. नाईक विद्यालयासमोर मौलाना आझाद रोड सटाणा जि. नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा, सहाय्यक निबंधक सह. संस्था सटाणा जि. नाशिक.

३. जन अपिलीय अधिकारी तथा, उपनिबंधक सह. संस्था नाशिक.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८१८/०७
निर्णय दिनांक २९/०९/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गोरखनाथ धोंडीराम वतारे<br>रा. मिरजगांव जि. अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी कर्जत जि. अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषी अधिकारी कर्जत जि.<br>अहमदनगर. | | |

**निर्णय**

श्री. गोरखनाथ धोंडीराम वतारे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २१.०९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २०.०२.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १०.०४.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. सदर अपीलावरील दिनांक २४.०४.२००६ रोजीच्या निर्णयाने समाधान न झाल्याने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्य आत व्दितीय

अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ६० इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीय कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्या योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

द्वितीय अपील मुदतबाह्य झाल्याने फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोरखनाथ धोंडीराम वतारे रा. मिरजगांव जि. अहमदनगर .

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी कर्जत जि. अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा, उपविभागीय कृषी अधिकारी कर्जत जि. अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८१९/०७
निर्णय दिनांक २९/०९/२००९

१ श्री. डॉ. जी. एम. वैद्य, : अपिलार्थी
रा. निंबाळकर गल्ली अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप प्र-प्राचार्य गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेद
महाविद्यालय अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य गंगाधर शास्त्री गुणे, आयुर्वेद महाविद्यालय
अहमदनगर.

**निर्णय**

श्री. डॉ. जी. एम. वैद्य रा. अहमदनगर यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १७/०६/२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २६.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ३०.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. सदर प्रथम अपीलावरील निर्णयाचे समाधान न झाल्याने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापी, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील प्रथम अपीलाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा २०६ दिवस इतके दिवस विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी त्यांना कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे व पत्रव्यवहारातील दिरंगाईमुळे झाला असल्याचे त्यांच्या १६.०६.२००८ च्या पत्राद्वारे कळवून झालेला विलंब क्षमापित करण्याची विनंती केली आहे. परंतु "कायद्याचे अज्ञान" हे ६ महिन्यापेक्षा जास्त विलंब क्षमापित करण्यासाठी संयुक्तीक कारण वाटत नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. डॉ. जी. एम. वैद्य, रा. निंबाळकर गल्ली, जि. अहमदनगर.
२. जन माहिती अधिकारी तथा, उप प्र-प्राचार्य गंगाधर शास्त्री गुणे, आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा, प्राचार्य गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय अहमदनगर .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३३४

निर्णय दिनांक ३०-०९-२००९

१ श्री. भरत प्रभाकर शिंपी, : अपिलार्थी

प्लॉट नं. ७, गणेशवाडी, परमार्थ साधना मंदिरासमोर,

जिल्हा पेठ, जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपनिबंधक (ना. सह. पतसंस्था), सहकार आयुक्त व

निबंधक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अपर निबंधक, सहकारी संस्था (तपासणी व

निवडणुका), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती ईमारत, पुणे - ०१

त्रयस्थ पक्ष : पूर्णवाद नागरी सह पतसंस्था मर्यादित, शिरसोली, जळगांव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असते. तथापि त्यांना अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही. तसेच ही माहिती देण्यासाठी संबंधित संस्था देखील टाळाटाळ व कालापव्यय करत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते ०३-०७-२००८ पर्यंतच्या कालावधीतील पूर्णवाद नागरी सह पतसंस्था मर्यादित, शिरसोली, जळगांव या संस्थेच्या संदर्भात एकूण २४ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती ही संस्थेच्या दैनंदिन व्यवहाराशी संबधित असल्याचे व संस्थेच्या दैनदिन व्यवहाराविषयी माहिती त्यांच्याकडे संकलीत केली जात नसल्याचे अपिलार्थीस कळविले व तसेच अपिलार्थीस जर ते संबंधित संस्थेचे सभासद असतील तर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ३२ व नियम ३१ अन्वये अपिलार्थीस ही माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०९-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व १७ आणि त्यासंबंधीत माहिती, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव व विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, नाशिक यांच्या कार्यालयातून उपलब्ध करुन ती अपिलार्थीस पुरविण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व १७ शी संबधित संपूर्ण माहिती अपेक्षित असल्याचे आयोगास अवगत केले. तथापि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १७ शी संबधित संपूर्ण माहिती जिल्हा उपनिबंधक, जळगांव यांच्याकडून व सहकार आयुक्त यांच्या कार्यालयातून प्राप्त झाली असल्याचे अपिलार्थीने कबूल केले व आता त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अपिलार्थीने संस्थेच्या संचालकाच्या स्टॅम्प पेपर वरील बंधपत्राच्या प्रती ही माहिती ते अपिलार्थीस सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन देऊ शकतात. अपिलार्थीस मूळ तक्रार अर्जाची नोंद त्यांनी घेतली असून यासंदर्भात त्यांनी जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांना आवश्यक त्या सूचना दिल्या असून पूर्णवाद नागरी सह पतसंस्था मर्यादित, शिरसोली, जळगांवच्या सर्व संचालकाचे स्टॅम्पपेपरवरील बंधपत्राच्या प्रती ते अपिलार्थीस उपलब्ध करुन देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली एवढीच माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे अपेक्षित आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रामंक १ चे अवलोकन केले असता " ............................ बंधपत्रासोबत त्यांच्या स्थावर मालमत्तेचे विवरण संलघ्न केले आहे काय ? " या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होणार नाही. कारण अशा प्रकारची माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे. तथापि बंधपत्राच्या प्रतीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे ती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. वास्तविक पाहता ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नाही, तथापि त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांच्याकडून ही

माहिती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कायद्यातील तरतुदीच्या आधारे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या मधील संबंधित संचालकांच्या स्थावर मालमत्तेचे विवरण या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होणार नाही, कारण ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही व सहकारी पतसंस्थेमध्ये देखील त्यांच्या वैयक्तीक मालमत्तेच्या विवरण संदर्भात कागदपत्रे ठेवली जात नाही असे आयोगास अवगत करण्यात आले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ मधील अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भरत प्रभाकर शिंपी, प्लॉट नं. ७, गणेशवाडी, परमार्थ साधना मंदिरासमोर, जिल्हा

पेठ, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक (ना. सह. पतसंस्था), सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था (तपासणी व निवडणुका), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती ईमारत, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३३६

निर्णय दिनांक ३०-०९-२००९

१ श्री. संतोष नामदेव परतणे, : अपिलार्थी
रा. विद्यानगर, भुसावळ रोड, फैजपूर, तालुका यावल,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र
राज्य, पुणे - ०१

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र
राज्य, पुणे - ०१

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप निबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

जन अपिलीय अधिकारी : अपर निबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

त्रयस्थ पक्ष : सहकार मित्र श्री. चंद्रकांत हरी बढे सर पतसंस्था, वरणगाव, ता. भुसावळ, जि. जळगाव

# निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०७-०३-२००८ रोजी केलेल्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली असल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता या अपिलाची सुनावणी अद्यापपर्यंत जन अपिलीय अधिकारी यांनी घेतली नसल्याने वा यासंदर्भात कोणताही आदेश पारीत न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहकार मित्र श्री. चंद्रकांत हरी बढे सर पतसंस्था वरणगांव, तालुका भुसावळ या संस्थेच्या संदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस कळविले व त्याप्रमाणे अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क रुपये १३७० इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २८-०४-२००८ रोजी भरले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन त्यांना या संदर्भात कोणतेही आदेश न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संतोष नामदेव परतणे, रा. विद्यानगर, भुसावळ रोड, फैजपूर, तालुका यावल, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४४०

निर्णय दिनांक ३०-०९-२००९

१ श्री. जेटेवाड राजेश्वर नागोजी, : अपिलार्थी
मु. पो. बरबडा, तालुका नायगाव (खै.),
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव (खै.), तालुका नायगाव (खै.), जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न देता तारखा वाढविल्या परंतु निर्णय दिला नाही व त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे बरबडा, तालुका नायगांव (खै.) येथील घर क्रमांक ३६९ या घरावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिलेल्या शासकीय अनुदानाची प्रत व या गावातील कुटूंब जनगणना २००२ च्या दारिद्र्यरेषेखालील कुटूंबाच्या यादीची छायांकीत प्रत अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांनी दिनांक ०४-०६, ०४-०७ व १५-०७-२००८ रोजी सुनावण्या ठेवल्या होत्या, मात्र या संदर्भात त्यांनी कोणतेही आदेश पारीत न केल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस त्यांनी अद्यापपावेतो माहिती पुरविली नसल्याचे आयोगास स्पष्ट केले. अपिलार्थीस माहिती न पुरविण्याची कारणे त्यांना विचारली असता त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याची कोणतीही कारणे नाहीत असे बेजबाबदारपणाचे उत्तर आयोगास दिले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये माहितीशी संबंधित कालावधी या सदरासमोर " दहा दिवस " असे त्यांचे अभिप्राय नोंदविले आहेत. सदरचे अभिप्राय हे माहितीच्या अर्जाशी सुसंगत नसून ते चुकीचे आहेत. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील शासकीय अनुदानासंदर्भातील आवश्यक माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र बरबडा गावातील सन २००२ च्या जनगणनेप्रमाणे दारिद्र्यरेषेखालील कुटूंबांच्या व्यक्तींची यादी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे देय होत आहे. या यादीची प्रत आठ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची व अपील अर्जाची या प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी पुरेपूर उपेक्षा करुन त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, याची आयोगास खात्री पटली आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी उपस्थित असलेल्या विस्तार अधिका-याने आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी हे श्री. पी. आर. कुरुंदकर, सध्या अमरावती आयुक्त कार्यालयामध्ये उप आयुक्त विकास या पदावर कार्यरत हे आहेत. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही. हे पाहता तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही

प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्यामुळे त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही हे त्यांना मान्य आहे, असा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्यामुळे त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस

दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जेटेवाड राजेश्वर नागोजी, मु. पो. बरबडा, तालुका नायगाव (खै.), जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव (खै.), तालुका नायगाव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. पी.आर. करुंदकर, उपायुक्त विकास, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४४१

निर्णय दिनांक ३०-०९-२००९

१ श्री. एस. एस. जाधव, : अपिलार्थी

पटेलनगर, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा विभागीय जात पडताळणी अधिकारी

तथा समाजकल्याण अधिकारी, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा विभागीय जात पडताळणी अधिकारी

तथा समाजकल्याण अधिकारी, लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर

जन अपिलीय अधिकारी : विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रप), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर

त्रयस्थ पक्ष : कु. राजेश्री श्रीराम जाधव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष कु. राजेश्री जाधव यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी करुन देण्यासाठी लागणा-या विलंबाच्या कारणांसंबंधात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मुलीचे जात प्रमाणपत्र पडताळणीच्या विलंबाची कारणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना न कळविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी त्रयस्थ पक्ष कु. राजेश्री जाधव यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र दिनांक ०९-०९-२००९ रोजी जारी केले आहे. अपिलार्थीचे जात पडताळणीचे प्रमाणपत्र त्यांना प्राप्त झाले. तथापि याबरोबर त्यांचे जातीचे मूळ प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मुलीचे जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासाठी लागलेला विलंबाची कारणे आणि तिचे जातीचे मूळ प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे दिसून येत आहे. यापैकी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्षास देण्यात आलेल्या जात पडताळणी प्रमाणपत्राच्या विलंबाची कारणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाहीत. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीच्या बाहेरची आहे. त्रयस्थ पक्षाच्या जातीच्या पडताळणी प्रमाणपत्राबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्रयस्थ पक्ष यांच्याकडून जात पडताळणी प्रमाणपत्राविषयी अर्ज सादर करतांना त्यांच्या मूळ जातीचे मूळ प्रमाणपत्र जोडले नसल्यामुळे त्यांना अपिलार्थीस ते प्रमाणपत्र उपलब्ध करुन देता आले नाही. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोगास योग्य वाटतो. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये, अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या जातीच्या मूळ प्रमाणपत्राची व्दितीय प्रत तसीलदाराकडून उपलब्ध करुन घेता येईल, असे आयोगास अवगत केले. मूळात अपिलार्थीने त्यांच्या मुलीचे जात पडताळणी प्रकरणी सोबत मूळ जात प्रमाणपत्र जोडले नसल्याने ही माहिती अर्थातच जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय असणार नाही. एवढे जरी असले तरीही येथे एक बाब प्रामुख्याने विचारात घेणे आयोगास आवश्यक वाटते ती म्हणजे अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२००८ च्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा

त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा, असे आदेशित करण्यात येत आहे. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती न दिल्याचे त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एस. एस. जाधव, पटेलनगर, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रप), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४४२

निर्णय दिनांक ३०-०९-२००९

१ श्री. शिवकांत कृष्णाथराव पुरमवार, : अपिलार्थी

राघवेंद्र अपार्टमेंट, दयानंदनगर, व्हि. आय. पी. रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,

जिल्हा परिषद बांधकाम विभाग, दक्षिण, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

जिल्हा परिषद, बांधकाम, (दक्षिण) विभाग, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम, (दक्षिण) विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०४-२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज दाखल केला असता त्यांनी मुदतीच्या आत माहिती न दिल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०६-२००८ रोजी प्रथम अपील

दाखल केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड जिल्ह्यातील तालुका नायगांवमधील मुगांव फाटा ते मुगांव या गावापर्यंत झालेल्या रस्त्याच्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कामाकरिता वृत्तपत्रात दिलेल्या निविदेच्या सत्यप्रती, प्राप्त निविदांच्या सत्यप्रती, मंजूर निविदांच्या सत्यप्रती, अंदाजपत्रके, कार्यारंभ आदेश, मोजमाप पुस्तिकेच्या सत्यप्रती, रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण याकरिता आजपर्यंत या भागाच्या किती टक्के काम करण्यात आले आणि एकूण अंदाजपत्रकापैकी किती देयके संबंधितांना देण्यात आली त्या देयकाच्या सत्यप्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाशी संबंधित होती.

अपिलार्थीचा हा अर्ज प्राप्त झाल्यानंतर कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तुत कार्यालयातील पी. बी. शाखा प्रमुखास दिनांक ०८-०५-२००८ रोजी पत्र लिहून चार दिवसाच्या आत सदर माहिती त्यांच्या कार्यालयातील सांख्यिकी शाखेस सादर करण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. मात्र त्यांच्याकडील दिनांक १८-०६-२००७ (२००७ हा आकडा चुकीने टंकलिखित केला असावा) च्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६० इतके त्यांच्या कार्यालयात भरुन माहिती हस्तगत करण्याचे सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मुगांव फाटा ते मुगांव या रस्त्यासंदर्भात माहिती मागविली होती. परंतु मुगांव फाटा ते मुगांव या रस्त्यावर त्यांच्या खात्यातर्फे कोणतेही काम करण्यात आलेले नाही. परंतु त्यांच्या कार्यालयाकडून पिंपळगाव होटाळा मुगांव फाटा या रस्त्याच्या कि. मी. १० ते ११ या भागामध्ये रस्त्याचे काम करण्यात आले. कदाचित अपिलार्थीस या रस्त्याच्या कामाविषयी माहिती अपेक्षित असावी असे वाटल्याने वरुन त्यांनी अपिलार्थीस ६० रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुगांव फाटा ते मुगांव या रस्त्याचे कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. या रस्त्याच्या या लांबीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून कोणतेही काम केले गेलेले नाही. याचा अर्थ असा की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारे अस्तित्वात असणे संभवत नाही. असे असतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (८) मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कारणे देऊन, अपिलार्थीस जर ती माहिती नाकारली असती तर त्यांचा कार्यभाग साध्य होऊ शकला असता. परंतु त्यांनी तसे न करता अपिलार्थीस दुस-या रस्त्याविषयी माहिती अपेक्षित असावी असे स्वतःच अनुमान काढून अपिलार्थीस त्यांनी मागणी न केलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले. यावरुन संबंधित जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट होत आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य प्रकारे व विहित मुदतीत प्रतिसाद न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला हे पाहता सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. आर. आर. आडे, उप कार्यकारी अभियंता सध्या उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बिलोली या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती मूळात देय नसल्याने, यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. आर. आर. आडे, उप कार्यकारी अभियंता सध्या उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बिलोली या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवकांत कृष्णाथराव पुरमवार, मुख्य संपादक, सा. महाराष्ट्र दपर्ण, राघवेंद्र अपार्टमेंट, दयानंदनगर, व्हि. आय. पी. रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम, (दक्षिण) विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम, (दक्षिण) विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४४३

निर्णय दिनांक ३०-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिंदे लक्ष्मणराव मुगाजी<br>रा. नेवरी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद, नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिल्यामुळे त्यांच्यावर दंडाची कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०१-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००२ पासून अनुसूचित जमातीच्या

कर्मचा-यांना कनिष्ठ सहायक व वरिष्ठ सहायक पदावर दिलेल्या पदोन्नतीसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले असता या अपिलासंदर्भात दिनांक १४-०७-२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस काही माहिती देण्यात आली व पूर्वी दिनांक २१-०५-२००८ रोजी काही माहिती दिली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. तथापि तदनंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी याकरिता वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती प्रथमतः दिनांक २१-०५-२००८ व तदनंतर दिनांक १४-०७-२००८ रोजी पुरविल्याचे आयोगास अवगत केले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ३१-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीस प्रथमतः त्यांनी दिनांक २१-०५-२००८ रोजी म्हणजे माहिती देण्यासाठीचा देय कालावधी व्यपगत झाल्यानंतर अंदाजे तीन महिने इतक्या उशिराने त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविली आहे आणि तदनंतर दीड महिन्याने उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अशा प्रकारे प्रथमतः अपूर्ण व नंतर टप्याटप्याने देऊन त्यांनी आपल्या या प्रकारच्या कृतीव्दारे स्वतःला

माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस नि:संशयपणे पात्र ठरविले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक कर्मचारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे, हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देण्याकरिता माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक (जावक लिपिकासह) हे जबाबदार ठरत आहेत. सबब या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक कर्मचारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिंदे लक्ष्मणराव मुगाजी रा. नेवरी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४४४

निर्णय दिनांक ३०-०९-२००९

१ श्री. मलंग अब्दुल रहेमान पि. मो. इस्माईल, अपिलार्थी
रा. दबीरपुरा, उदगीर घर क्रमांक १-३-५८,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

वरील अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीस जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २९-०९-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, आवश्यक ती माहिती शिक्षणाधिकारी

(माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर व संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त झाली असल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील आयोगाने निकाली काढावे.

अपिलार्थीस अपेक्षित असलेली सर्व माहिती प्राप्त झाली असल्याने व अपिलार्थीने आयोगास त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची विनंती केली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक १४४४/२००८, दिनांक ३०-०६-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०९-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मलंग अब्दुल रहेमान पि. मो. इस्माईल, रा. दबीरपुरा, उदगीर घर क्रमांक १-३-५८, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४४५

निर्णय दिनांक ३०-०९-२००९

१ श्री. मोहमद अनवरउल्ला खान, : अपिलार्थी

९-४-४५५,कय्युम प्लॉटस्, नांदेड - ४३१ ६०४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यालय,

नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त (सा. प्र. वि.), नांदेड वाघाळा शहर

महानगरपालिका, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या चुकीच्या माहितीच्या संदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०६-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले

असता त्यांनी, आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करेपर्यंत देखील प्रथम अपील सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे राज्य माहिती आयोगाच्या दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या निर्णयावर आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस राज्य माहिती आयोग, औरंगाबाद यांनी दिनांक १०-०९-२००७ रोजी दिलेल्या अपील निर्णयाची प्रत पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेऊन कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०६-२००८

रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्या-पासून ९० दिवसाच्या आत ते राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १०-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहमद अनवरउल्ला खान, ९-४-४५५,कय्युम प्लॉटस् नांदेड - ४३१ ६०४.

२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६२५

निर्णय दिनांक ३०-०९-२००९

१ श्री. मधुकर बापुदेव धर्माधिकारी, : अपिलार्थी

एल आय जी ९१, रामकृपा कॉलनी, म्हाडा वसाहत,

शहानूरवाडी रोड, प्रतापनगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन),

जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण चार मुद्दयावर माहिती मागितली असता त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, अपिलीय अधिकारी यांचे स्पष्ट आदेश असतांना देखील जन माहिती अधिकारी यांनी या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस दिलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित व अपिलार्थी विरुध्द केलेल्या चौकशीशी संबंधित सन १९८९ ते १९९२ या कालावधीतील  काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहिती-पोटीचे शुल्क रुपये २७ इतके भरुन त्यांच्या कार्यालयातून माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले व अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १  व  ३ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यामध्ये नमूद केले.  जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २०-०२-२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ४ शी संबंधित माहिती हस्तगत केली.  या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ३०-०८-२००८ रोजी निर्णय पारीत करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.  या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीन आठड्याच्या आत विनामूल्य पुरविण्याचे सूचित केले व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस दिनांक ०८-१०-२००८ रोजी पुरविली तथापि त्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले होते.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना मुदतीच्या आत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसतांना देखील त्यांनी ती न्यायालयात जाऊन गोर्डे पाटील समितीच्या अहवालाची प्रत अपिलार्थीस दिनांक ०८-१०-२००८ रोजी व्यक्तिशः हस्तांतरीत केली आहे, असा युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे त्यांनी मागितलेल्या गोर्डे पाटील समितीच्या अहवालाची प्रत व मुद्दा क्रमांक ३ व्दारे गठीत केलेल्या समितीस शासनाने दिलेल्या मान्यतेची प्रत या मुद्दयावर माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीस गोर्डे पाटील समितीच्या अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी न्यायालयाकडून हस्तगत करुन जशीच्या तशी अपिलार्थीस दिनांक ०८-१०-२००८ रोजी पुरविली आहे. ती प्रत अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, जिल्हा परिषदेने जी सत्यशोधन समिती गठीत केली होती ती जिल्हा परिषदेच्या स्तरावर केली होती. ती समिती शासन स्तरावर गठीत केले गेली नव्हती अथवा यासंदर्भात जिल्हा परिषदेने शासनाची कोणतीही मान्यता घेतली नव्हती. त्यामुळे मूळात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारे अस्तित्वात असणे संभवत नाही. असे असतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास समर्पक उत्तर न दिल्यामुळे अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांच्याविषयी प्रतिकूल ग्रह झाला. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात वस्तुस्थितीदर्शक माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने माहिती दडविल्याचे सिध्द होत नसल्याने तसेच त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई आयोग आदेशित करत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित वस्तुस्थितीदर्शक माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर बापुदेव धर्माधिकारी, एल आय जी ९१, रामकृपा कॉलनी, म्हाडा वसाहत, शहानूरवाडी रोड, प्रतापनगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४३४
निर्णय दिनांक: ३०-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अशोक सुखदेव खेडकर,<br>रा.सोयगाव,जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>शाखा अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>सोयगाव,जि.औरंगाबाद<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>सोयगाव,जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
सोयगाव,जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
कन्नड,जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती न दिल्यामुळे व दिलेली माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे केले आहे.या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१२.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे शाखा अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित,सोयगाव यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -अपिलार्थीने त्यांच्याकडे दि.१०.०३.२००८ रोजी दिलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही,त्यांच्या कार्यालयातील सन २००७ ते दि.११.०४.२००८ पर्यंतच्या कालावधीतील हालचाल रजिस्टरच्या प्रती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने कलम ४ मधील १७ कामांची तयार केलेली माहिती व ही माहिती वरिष्ठांना किती तारखेला पाठविली, तो दिनांक - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये त्यांनी शाखा अभियंता यांच्याकडून ही माहिती कोणत्या माध्यमाद्वारे (व्यक्तिशः/पोस्टाद्वारे) त्यांना हवी आहे याचा कोणताही उल्लेख त्यांनी केलेला नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधितांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित,सोयगाव यांच्याकडे दि. २९.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा हा अपील अर्ज सहायक अभियंता,यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि. ११.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करण्यात आली असल्याचे अपिलार्थीस कळविले व तसेच ही माहिती अकरा पृष्ठांची असल्याचे अपिलार्थीस अवगत करुन अपिलार्थीस उपकोषागार कार्यालय, सोयगाव येथे चलनाद्वारे फी भरुन नंतर माहिती हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले व अंतिमतः दि. २५.०७.२००८ रोजी काही माहिती विनामूल्य पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांना शाखा अभियंता यांच्याकडून विलंबाने व अपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करावी व त्यांना अद्यापि देणे बाकी असलेली माहिती त्वरित पुरविण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती अपिलार्थीस दि. २५.०७.२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सोयगाव या कार्यालयामध्ये मूळात सहायक अभियंता यांची जन माहिती अधिकारी म्हणून व उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कन्नड यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहे. तथापि अपिलार्थीने या प्रकरणी सहायक अभियंता यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अपील अर्ज सादर केला, या प्रकरणी सहायक अभियंता यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तो अर्ज या प्रकरणी त्वरित जन अपिलीय अधिकारी म्हणजे, उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कन्नड यांच्याकडे पाठवावयास हवा होता. परंतु अशाप्रकारची कोणतीही कृती न करता त्यांनी अपिलार्थीस दि. २५.०७.२००८ रोजी काही माहिती पुरविली आहे.जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ४ प्रमाणे करावयाच्या १७ कामांची माहिती अपूर्ण स्वरुपात दिलेली आहे. अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी केलेल्या युक्तिवादामध्ये आयोगास असे अवगत केले की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयातील हालचाल रजिस्टरची प्रत, जी त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे मागितली होती, ती त्यांना शाखा अभियंता यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. या संदर्भात शाखा अभियंता यांनी असा खुलासा केला की, त्यांच्या कार्यालयात हालचाल रजिस्टर ठेवले जात नाही व तसा खुलासा त्यांनी दि. २५.०७.२००८ रोजी दिलेल्या माहितीमध्ये केलेला आहे. सदर खुलाशाचे अवलोकन करता अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२ च्या संदर्भातील माहिती मिळाल्याचे दिसून येते. आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी फक्त त्यांच्या कार्यालयातील अधिनियमातील कलम ४ प्रमाणे करावयाच्या १७ कामांची संपूर्ण माहिती देणे बाकी असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली या मुद्यावरील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सोयगाव, जि.औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली मुद्दा क्र. ३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये व आज रोजीच्या त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचे प्रतिपादन केले, या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दि. १२.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कशाप्रकारे माहिती आवश्यक आहे, यासंदर्भात माहितीसाठीच्या प्रथम अर्जाच्या विहित नमुन्यातील,मुद्दा क्र.४ च्या संदर्भात कोणतेही स्पष्ट अभिप्राय व्यक्त केलेले नाहीत व मूळ अर्ज पूर्णपणे भरला नाही. त्यामुळे अपिलार्थीस टपालाद्वारे माहिती आवश्यक होती की व्यक्तिशः माहिती आवश्यक होती, याचा आयोगास उलगडा होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती मिळण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे दिसून येते. मात्र या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती अपूर्ण दिली आहे आणि तसेच संबंधित शाखा अभियंता यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक)

प्रमाणे कार्यवाही केली नाही व सहायक अभियंता यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.कन्नड यांच्याकडे न पाठवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल ते नि:संशयपणे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाईस पात्र ठरले आहेत. सबब मुख्य अभियंता, औरंगाबाद परिमंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,औरंगाबाद यांना संबंधित शाखा अभियंता व सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,म.सोयगाव जि.औरंगाबाद यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, औरंगाबाद परिमंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,औरंगाबाद यांना संबंधित शाखा अभियंता व सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,म.सोयगाव जि.औरंगाबाद यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक सुखदेव खेडकर, मु. पो. नारळीबाग, सोयगांव, ता.सोयगाव,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

सोयगाव,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,कन्नड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, औरंगाबाद परिमंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,पोलीस आयुक्त कार्यालयासमोर, ज्युबिली पार्क,औरंगाबाद

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४३५
निर्णय दिनांकः ३०-०९-२००९

१. श्री. कय्यूम खान अहमद खान, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
पशुसंवर्धन अधिकारी,
महानगरपालिका,औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,
महानगरपालिका,औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : उपआयुक्त (प्र), महानगरपालिका,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही. त्यांना जन माहिती अधिकारी

यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाली व अनधिकृत मछली मार्केट, कोंबडा मार्केट व बकरा मार्केट उघडयावर,रस्त्यावर उघडल्यामुळे कुत्रे,डुकरे, कावळे व मांजरे जमा होऊन रहदारीस अडथळा होत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२६.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे घ.नं.५.९.६४ हमालवाडी सिटीएस नं.१९२६७ या घरांसंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - घ.नं.५.९.६४ या इमारतीमध्ये मटन विकण्याचा परवाना दिला आहे काय ? दिला असल्यास परवान्याची प्रत, दिला नसल्यास न देण्याचे कारण, हे बांधकाम रहिवाशीकरिता करण्यात आले आहे काय अथवा कमर्शियल आहे काय, याचा खुलासा, रेसीडेन्शीयल असल्यास कमर्शियलकरिता दुकाने परवाने दिले कसे ?, या इमारतीमध्ये एकूण १२ मटन शॉप व्यवहार चालू आहेत, त्यांना लायसन्स दिले काय?,कोंबडा मटन-४, बकरा-मटन-४, मच्छी दुकाने-४ चालू आहेत काय? आतापर्यंत यासंदर्भातील काय कार्यवाही केली ? केली नसल्यास त्याची कारणे द्यावीत, मच्छी मार्केट, मटन मार्केट नियमानुसार आहेत काय?, नियमानुसार नसल्यास काय कारवाई केली?, पशुहत्या कायद्याची (नियमांची) माहिती परवाना अटीनुसार द्यावी - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.११.२००८ रोजी आपला निर्णय पारित करुन, अपिलार्थीने प्राप्त झालेली माहिती अपुरी असल्याचे त्यांना सांगितल्यामुळे जन माहिती

अधिकाऱ्यास संबंधितांस आठ दिवसांच्या आत संपूर्ण माहिती द्यावी असे आदेशित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहितीपोटीचे शुल्क कळविले. परंतु या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न केल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली नाही. तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. २६.०९.२००८ रोजी आवश्यक ती, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस या अभिलेख्यांशी संबंधित सर्व कागदपत्रांच्या प्रती दिल्याचे त्यांना आढळून आले असून त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२७६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे दि. १८.१२.२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील एकूण सात मुद्यांपैकी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ मधील इमारत,घर क्र.५.९.६४ या इमारतीमध्ये मटन विकण्यास परवान्याची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही प्रत दि. २६.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेली आहे. त्याचबरोबर अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ मध्ये जन माहिती अधिकारी यांनी या इमारतीतील कोंबडी मार्केट, मटन मार्केट च्या संदर्भात केलेल्या कारवाईची आणि बेकायदेशीर मटन मार्केटच्या

संदर्भातील जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादाच्या प्रती देय होत आहेत. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी यासंदर्भात संबंधित मच्छी व मटन दुकानदारांना नोटीसा काढल्या आहेत व त्यांच्यावर कारवाई करण्याची प्रक्रिया चालू आहे. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या इमारत क्रमांक ५.९.६४ मधील मच्छी मार्केट,मटन मार्केट, कोंबडा मार्केट व बकरा मार्केट दुकाने यांच्यावर केलेल्या कारवाईची संपूर्ण प्रत त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.७ च्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२६.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पशुहत्या कायद्याची संपूर्ण प्रत अपिलार्थीस पुरविली आहे, हे पाहता, या मुद्यावर माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना कोणतेही प्रयोजन उरत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, वर नमूद केल्याप्रमाणे फक्त संबंधित दुकानांवर त्यांनी केलेल्या कारवाईची प्रत, एवढीच माहिती त्यांच्याकडून आता देय होत असल्याचे दिसून येते. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, या मुद्यांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबाबतची कारणे व स्पष्टीकरणे त्यांच्याकडून अपेक्षिली आहेत. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कय्युम अहमद खान, घर नं. ५.९.६६ हमालवाडी, हॉलीडे कॅम्प शेजारी, लतीफ मटन शॉपजवळ, रेल्वे स्टेशन रोड,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्र),महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४३६
निर्णय दिनांकः ३०-०९-२००९

१. श्री. गुलाबसिंग चिंतामण वाघ, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता (शहर विभाग-१),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा,
कार्यकारी अभियंता (शहर विभाग-१)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता (शहर विभाग-१),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी नियमांचे पालन न करता, सुनावणी घेतली असल्याचे व त्यांचे म्हणणे जन अपिलीय अधिकारी यांनी ऐकून न घेतल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केले असल्यामुळे त्यांच्यावर कायद्यानुसार दंड लावावा, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२४.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण अकरा मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०८.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि यासंदर्भात झालेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध नाही. परंतु या सुनावणीमध्ये अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी त्यांना संधी न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने त्यांच्या दि.२४.०६.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीची कारणे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे दिसून येते, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी पूर्णतः विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कार्यालयात ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती देण्याबाबत अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीमध्ये कार्यवाही करणे एवढीच प्रक्रिया अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशाप्रकारची स्पष्टीकरणे अथवा त्यांच्या कृतीबद्दलची कारणे विचारणे हे अनुज्ञेय नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत माहिती मागितल्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्जच माहिती देण्याच्या दृष्टीने अवैध असल्याचे सिध्द होत आहे. एवढे असूनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या निर्णयाचा खुलासा अपिलार्थीस केला आहे. आज रोजी सुनावणीसाठी अथवा तोंडी म्हणणे मांडण्यासाठी अपिलार्थी देखील आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.१४३६/०८, दि.२७.०८.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गुलाबसिंग चिंतामण वाघ, मोहंमद खान ताज खान यांचे घर, अराफत मस्जिद समोर, किराडपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (शहर विभाग-१),महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (शहर विभाग-१), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४३७
निर्णय दिनांक: ३०-०९-२००९

१. श्री. सरदार हरजीतसिंग सहानी, औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (औरंगाबाद परिमंडळ),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.,
औरंगाबाद : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा,
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.
(शहर विभाग-२),औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारीः उपकार्यकारी अभियंता,
शहर उपविभाग, क्रांतीचौक,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.,
औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची दि.०५.०१.२००९ रोजीची टिपणी आयोगास सादर केली आहे.

या टिपणमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने ते समाधानी आहेत व त्यांना पूर्ण माहिती संबंधितांच्याकडून मिळाली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १४३७/०८, दि. २३.०१.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सरदार हरजीतसिंग सहानी,घर नं.५-१-५५/१-पी १, उस्मानपूरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,शहर उपविभाग, क्रांतीचौक,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.(शहर विभाग-२),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४३८
निर्णय दिनांक: ३०-०९-२००९

१. श्री. अजित एम.देशमुख, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा माहिती अधिकारी,बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
संचालक (माहिती),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या दि. २६.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ८ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. यापैकी मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही व मुद्दा क्र.३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना अपूर्ण स्वरुपात प्राप्त झाली असून त्यांना बातम्यांची कात्रणे जन माहिती अधिकारी यांनी न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी हे अशाप्रकारे सकृतदर्शनी दोषी असल्यामुळे त्यांच्यावर

अधिनियमातील कलम २०(१) व २०(२)प्रमाणे कारवाई करण्याची अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२६.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण आठ मुद्यांच्यासंदर्भात त्यांच्या कार्यालयाविषयी काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीस अनुसरुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०१.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या आदेशानुसार माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दि.०४.०२.२००८ रोजी काही माहिती विनामूल्य दिली. तथापि या माहितीमध्ये देखील अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ शी संबंधित संपूर्ण माहितीचा समावेश नसल्यामुळे प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस प्रथम दि.२६.१२.२००७ रोजी व तदनंतर दि.०४.०२.२००८ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती त्यांनी आता त्यांच्या खात्यामधील अभिलेख्यावरुन प्राप्त करुन घेतली असून ही माहिती अपिलार्थीस ते पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२

च्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडून आवश्यक त्या परिपत्रकाची प्रत त्यांना आता प्राप्त झाली असून ही माहिती ते अपिलार्थीस याच मुदतीमध्ये देण्यास तयार आहेत. अपिलार्थीच्या मुद्दा क्र.३ व ४ च्या संदर्भात त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.३ द्वारे दैनिकांच्या कात्रणाच्या प्रती मागितल्या आहेत. तथापि त्यांच्याकडे प्रत्येक दैनिकांची दररोज फक्त एकच प्रत प्राप्त होत असते व या प्रतीमधून संबंधित विभागाची कात्रणे काढून ती कात्रणे मूळ स्वरुपात संबंधित विभागाच्या कार्यालयास पाठवून देण्यात येत असतात,त्यामुळे त्यांच्याकडे आता ही कात्रणे उपलब्ध नाहीत. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भातील आवश्यक ती आकडेवारी अपिलार्थीस त्यांनी दि.०४.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे विचाराधीन अपील त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१,२,३ व ४ च्या संदर्भात केलेले आहे. यापैकी मुद्दा क्र.१ व २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगास त्यांचे म्हणणे स्पष्ट केले आहे. जन माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे आयोग मान्य करीत असून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता मूळ कात्रणे उपलब्ध नसल्यामुळे त्या कात्रणाच्या छायाप्रती प्राप्त होऊ शकणार नाहीत. अपिलार्थीच्या अर्जातीत मुद्दा क्र.४ च्या संदर्भात त्यांना आवश्यक ती आकडेवारी दि. ०४.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. आता अपिलार्थीस फक्त त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ शी संबंधित माहिती देणे बाकी आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या

मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी हेतूतः माहिती दडविल्याचे अथवा त्यांना माहिती देण्याचे दुष्ट हेतूने टाळल्याचे, निःसंशयपणे सिध्द होत नसल्यामुळे, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे संबंधितांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ व २ शी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजित एम.देशमुख, द्वारा गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड, ता. जि. बीड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा माहिती अधिकारी,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (माहिती),माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४३९
निर्णय दिनांकः ३०-०९-२००९

१. श्री. केशव दत्तात्रय गव्हाणे, : अपिलार्थी
रा.डिकसळ,ता.कळंब,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, डिकसळ, ता.कळंब,जि.उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती, कळंब,जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०१.२००९ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१८.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे ग्राम पंचायत,डिकसळ, ता.कळंब हद्दीमधील सर्व मालमत्ता धारकांकडील सर्व प्रकारच्या करांच्या थकबाकीसंबंधी, बेबाकी प्रमाणपत्र आणि खर्चाबाबत जूलै,२००७ ते ऑगस्ट,२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण सहा मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागविली होती.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद निश्चितपणे कोणत्या तारखेस दिला हे कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा त्यांनी दि. २६.०९.२००८ रोजी भरणा करुनही त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले असल्याचे अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये नमूद केलेले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. २२.१०.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनाविलंब माहिती देण्याची सूचना केली. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यांचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी सूचित केलेल्या रकमेचा भरणा केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने याबाबतचा उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०९.२००८ रोजी केलेल्या अपील अर्जामध्ये केलेला आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.१०.२००८ रोजी दिलेल्या त्यांच्या आदेशामध्ये अपिलार्थीने आवश्यक त्या रकमेचा भरणा केलेल्या चलनाची मूळ प्रत त्यांना सादर केल्याचेही दिसून येत आहे.मात्र उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये अपिलार्थीने निश्चितपणे या प्रकरणी शासकीय कोषागारात किती रकमेचा भरणा केला, याचा कोठेही उल्लेख नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे

ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि.१७.०९.२००८ रोजी पर्यंत सशुल्क व तदनंतर विनामूल्य देय होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३०.०९.२००८ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये व जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.१०.२००८ रोजी निर्णय देईपर्यंत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून या प्रकरणी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत परत करावे. अपिलार्थीचे शासकीय कोषागारात त्यांनी भरलेले शुल्क अपिलार्थीस या मुदतीत परत केले जाईल, याची दक्षता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब यांनी व्यक्तिशः घ्यावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत त्यांच्या मूळ अर्जाद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही संबंधित जन माहती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत न दिल्यामुळे संबंधित माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास निःसंशयपणे पात्र होत आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना संबंधित ग्रामसेवक (दि. १८.०८.२००८ रोजी व तदनंतर एक महिन्यापर्यंत कार्यरत असलेले)ग्राम पंचायत, डिकसळ, ता. कळंब, जि.उस्मानाबाद यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना संबंधित ग्रामसेवक (दि. १८.०८.२००८ रोजी व तदनंतर एक महिन्यापर्यंत कार्यरत असलेले)ग्राम पंचायत,डिकसळ,ता.कळंब,जि.उस्मानाबाद यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. केशव दत्तात्रय गव्हाणे, ४५३, संभाजीनगर, डिकसळ, ता.कळंब, जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, डिकसळ, ता.कळंब,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, कळंब,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३३५
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

१ श्री.सुधाकर गोपाळ पाटील, : अपिलार्थी
१७, भाग्योदय सोसायटी, गणेश कॉलनी,
जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
व्यवस्थापक,
पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
शिरसोली, ता.जि.जळगांव
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रत्यक्षत: जन अपिलीय अधिकारी : अपर निबंधक (तपासणी व निवडणुका),
महाराष्ट्र राज्य, पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या पुणे येथील कार्यालयात दिनांक १८.०३.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक ३०.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या विनादिनांकाच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शिरसोली, ता.जि.जळगांव यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने सहकार आयुक्त व

निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १३.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलासंदर्भात संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक (तपासणी व निवडणुका), पुणे यांनी दि. १३.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी पतसंस्थांना लागू नसल्याचे अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकाऱ्यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील क्र. १३३५/०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.सुधाकर गोपाळ पाटील, १७, भाग्योदय सोसायटी, गणेश कॉलनी, जळगांव

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शिरसोली, ता.जि.जळगांव

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक (तपासणी व निवडणुका), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३३७
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

**१** श्री. किशोर भबुतमल शहा, : अपिलार्थी
प्लॉट नं. २० + २१ /३, पार्वती नगर,
जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहकार आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, केंद्रिय इमारत, पुणे.
२. जन अपिलीय अधिकारी,
सहकार आयुक्त,महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
पुणे.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपनिबंधक, सहकारी संस्था (नागरी बँका-२),
सहकारी आयुक्त कार्यालय, पुणे
जन अपिलीय अधिकारी : अपर निबंधक (तपासणी व निवडणूक),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०९.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक ३०.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक १२.०५.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे सहायक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सहकारमित्र चंद्रकांत हरी बडे सर को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. या संस्थेच्या कर्ज व ठेवीबाबत तसेच आर्थिक व्यवहाराबाबत एकूण चौदा मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था (नागरी बँका-२) यांनी दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी

केलेली माहिती ही संस्थेच्या दैनंदिन व्यवहाराशी संबंधित असून सदरची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे संकलित केली जात नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक (तपासणी व निवडणूक) यांनी दि. १४.०८.२००८ रोजी निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या प्रतिसादास सहमती दर्शवून, अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

या प्रकरणासंदर्भात उपस्थित जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु

अपिलार्थीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजेच, दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे संकलित केली जात नसल्याचे त्यांना कळविले आहे. संबंधित पतसंस्थेकडून त्यांच्याशी संबंधित मागणी केलेली माहिती मागवून ती जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस देणे हे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचेवर बंधनकारक नाही. याही पेक्षा महत्वाचे म्हणजे संबंधित पतसंस्थेस माहिती अधिकार अधिनियम, मा.उच्च न्यायालयाने वर नमूद केलेल्या निर्णयाच्या पार्श्वभुमीवर लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील क्र. १३३७/०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रतः

१. श्री. किशोर भबुतमल शहा, प्लॉट नं. २० + २१ /३, पार्वती नगर, जळगांव- ४२५ ००२

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था (नागरी बँका-२), सहकार आयुक्त कार्यालय, पुणे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक (तपासणी व निवडणूक), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३४०
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

| | | |
|---|---|---|
| १ व्यवस्थापक,<br>सिध्दी व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,<br>जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जळगांव | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०८.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक ३०.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने, श्री.विलासचंद्र शिवनारायण बसेर यांनी त्यांच्या दि. ०२.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे श्री. सिध्दी व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जळगांव या नागरी सहकारी पतसंस्थेकडे माहितीची मागणी केली असता, सदर प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०६.२००८ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या आदेशाद्वारे श्री. विलासचंद्र शिवनारायण बसेर यांना सशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, सिध्दी व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या. जळगांव यांना आदेशित केले होते. अपिलार्थीने विचाराधीन अपील, जन अपिलीय अधिकारी यांचे दि. १६.०६.२००८ रोजीचे आदेश स्थगित करण्यासंदर्भात, आयोगाकडे केले आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधींच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. १३४०/०८ मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. व्यवस्थापक, सिध्दी व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जळगांव

२. श्री. विलासचंद्र शिवनारायण बसेर, नर्मदा-सदन, ओम चेंबर मागे, कोर्टासमोर, जळगांव

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३४१
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.सुनिल शिवचरण बिर्ला,<br>व्यवस्थापक, श्री सिध्दी व्यंकटेश नागरी सहकारी<br>पतसंस्था मर्यादित, जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जळगांव | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक ३०.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने, श्री.वासुदेव जगन्नाथ अग्रवाल यांनी त्यांच्या दि. ११.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे श्री. सिध्दी व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जळगांव या नागरी सहकारी पतसंस्थेकडे माहितीची मागणी केली असता, सदर प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०९.२००८ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशाद्वारे श्री. वासुदेव जगन्नाथ अग्रवाल यांना सशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, श्री सिध्दी व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या. जळगांव यांना आदेशित केले होते. अपिलार्थीने विचाराधीन अपील, जन अपिलीय अधिकारी यांचे दि. २६.०९.२००८ रोजीचे आदेश स्थगित करण्यासंदर्भात, आयोगाकडे केले आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधींच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. १३४१/०८ मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिल शिवचरण बिर्ला, व्यवस्थापक, श्री सिध्दी व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जळगांव

२. श्री. वासुदेव जगन्नाथ अग्रवाल, गणेश बिल्डींग, १२२, नवीपेठ, जळगांव

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३४२
निर्णय दिनांक ३०/०९/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.सुनिल शिवचरण बिर्ला,<br>व्यवस्थापक, श्री सिध्दी व्यंकटेश नागरी सहकारी<br>पतसंस्था मर्यादित, जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जळगांव | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज दिनांक ३०.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने, श्री.वासुदेव जगन्नाथ अग्रवाल यांनी त्यांच्या दि. ११.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे श्री. सिध्दी व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जळगांव या नागरी सहकारी पतसंस्थेकडे माहितीची मागणी केली असता, सदर प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०९.२००८ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशाद्वारे श्री. वासुदेव जगन्नाथ अग्रवाल यांना सशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, श्री सिध्दी व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या. जळगांव यांना आदेशित केले होते. अपिलार्थीने विचाराधीन अपील, जन अपिलीय अधिकारी यांचे दि. २६.०९.२००८ रोजीचे आदेश स्थगित करण्यासंदर्भात, आयोगाकडे केले आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधींच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. १३४२/०८ मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०९/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिल शिवचरण बिर्ला, व्यवस्थापक, श्री सिध्दी व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जळगांव

२. श्री. वासुदेव जगन्नाथ अग्रवाल, गणेश बिल्डींग, १२२, नवीपेठ, जळगांव

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव